# रा. ब. विनायक जनार्दन कीर्तने

## यांचें चरित्र.

बाळकृष्ण नारायण देव

यांनीं लिहिलें

तें

पुणें येथें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

१९०८

in marathi - 11/1.11.

ग्रंथसमर्पण.

# कै. ती. मातुःश्री आनंदीबाई

ऊर्फ

# माई कीर्तने

ज्यांच्या सहवासांत प्रस्तुत चरित्रलेखकाच्या विद्यार्थिदशेंतला बराच भाग

वात्सल्य सुखाचा अमृतोपम अनुभव घेण्यांत गेला

व त्या काळीं त्याच्या

मातृहीन स्थितीचें स्मरण ज्यांनीं होऊं दिलें नाहीं.

आणि

हा ग्रंथ ज्यांच्या हयातींत प्रसिद्ध व्हावा अशी त्यांची अत्युत्कट

इच्छा असतां तारीख १९ डिसेंबर १९०३ रोजीं

ज्यांचा प्लेगनें अंत झाला

त्यांच्या संस्मरणार्थ हा अर्पण केला आहे.

लेखक.

# प्रस्तावना.

प्रस्तुत चरित्रनायक हे अर्वाचीन राजकारणी पुरुषांत बरेच प्रमुख असून त्यांनीं बडोदें व इंदूर या दोन संस्थानांत मोठीं कामें केलीं होतीं. तेव्हां त्यांचें आयुर्वृत्त बरेंच बोधप्रद होईल असें समजून मीं हें चरित्र लिहिलें आहे. त्यांत यश कितपत आलें आहे हें पाहणें वाचकांकडे आहे.

मीं चरित्रविषयावर बरेंच वाचलेलें आहे व कांहीं थोडेंसें लिहिलेलें आहे; पण चरित्रनायकाच्या सहवासांत राहून त्याचें गुणवर्णन करण्याचा हा पहिलाच प्रसंग होय. यांत मीं चरित्रनायकाचे यथार्थ गुणदोष आपल्या बुद्धीप्रमाणें निःपक्षपातानें प्रगट केले आहेत. मीं त्यांच्याविषयीं भाविकभक्ति आणि विरोधभक्ति या दोन्ही मनोहर वृत्ति जाहिर केल्या नाहींत, किंवा आपल्या मताप्रमाणें मी त्यास वश झालों नाहीं. मला जर हें चरित्र वाचकांस हितावह व अनुकरणीय होईल असें वाटलें नसतें, तर माझा चरित्रनायकाबद्दल कितीही आदर व पूज्यभाव असला तरी मीं त्यांचें चरित्र लिहिण्याचें काम कधीं पत्करलें नसतें. आतां तें लिहिण्यांत कदाचित् गैरसमजुतीनें कांहीं प्रकार अन्यथा झाला असेल; नसेल असें म्हणवत नाहीं. तर तथापि बाबतींत यथार्थ प्रकार उघड करणें त्यांचे अनेक विद्वान्

सहाध्यायी व स्नेही यांस शक्य आहे आणि तें ते करतील अशी आशा आहे.

अलीकडे रा० ब० कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, गोपाळराव हरी देशमुख, दादोबा पांडुरंग, आत्माराम पांडुरंग, ना. काशीनाथ त्र्यंबक तेलंग; श्रीपाद बाबाजी ठाकूर इत्यादि थोर, राजकारणी, व विद्वान् सुधारक पुरुष गत झाले, परंतु त्यांचें चरित्र किंवा यथार्थ गुणवर्णन त्यांच्या कोणीही परिचित विद्वान् लेख्यांनीं करण्याचें मनावर घेतलें नाहीं. ही चरितलेखनाविषयींची विन्मुख वृत्ति आमच्या राष्ट्राचीच आहे असा पाश्चात्य विद्वानांचा आह्मावर यथार्थ आरोप आहे. त्याचें निराकरण पाश्चात्य शिक्षणप्रसार बराच झालेल्या अशा प्रस्तुतकाळीं विशेष झालें आहे असें नाहीं. यास अपवादरूप विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें एक चरित्र असून दुसरें ना० विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र एक विद्वान चरित्रकार लिहून विविधज्ञानविस्तार मासिकपुस्तकांत छापीत आहेत तें, अशीं दोनच मुख्यतः होत. तथापि वरील महाशयांचीं यथार्थगुणदर्शक चरित्रें त्यांच्या देशबांधवांस अनेक प्रकारांनीं हितावह होणारीं आहेत. तीं त्यांच्या परिचयांतले मार्मिक विद्वान् प्रगट करण्याची कृपा करतील तर मराठी सारस्वताचें मोठें कल्याण होईल. या कामीं त्यांस सूचना देण्यासाठीं ह्मणून मीं अल्पमति असूनही हें काम हातीं घेतलें. चरित्रलेखन अनेक प्रकारांनीं मोठें नाजूक व बिकट काम आहे असें जॉनसननें ह्मटलें आहे. कारण चरित्रनायकच्या संबंधानें " अशेषसत्यप्रतिपादन " त्याच्या जीवनकालास निदान

चार पांच तपें लोटल्यावांचून निःपक्षपातानें करण्यास अनेक अडचणी असतात. बरें, इतका अवधि लोटूं दिला तर तें करण्याचीं साधनें म्हणजे त्यांबद्दलचें लोकमत, त्यांच्या परिचितांचा अनुभव, त्यांचें अंतर्गत गुणज्ञान इत्यादि गोष्टी कालवशानें मलिन, अस्पष्ट व अंधुक होतात. त्यामुळेंच डॉ० जॉनसननें आपल्या कविचरित्रांत अर्वाचीन व समकालीन चरित्रनायकांबद्दल जरी सत्यप्रकारच प्रगट केला आहे, तरी तें " अशेष व संपूर्ण सत्य " नाहीं असें स्पष्ट म्हटलें आहे. कारण तो मार्ग म्हणजे " विस्तव पूर्ण न विझलेल्या अशा फुपाट्यांतून चालण्यासारखा आहे " असें तो विद्वान चरित्रकार म्हणतो. परंतु अशी स्थिति असली तरी आणि " अशेष व संपूर्ण सत्य " निवेदन करण्याची वेळ आली नाहीं तरी पाश्चात्य पंडितांचीं व राजकीय महापुरुषांचीं चरित्रें त्यांच्या हयातींत व मागें देखील प्रसिद्ध होत नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ ग्लॅडस्टन, फॉसेट वगैरेंचीं चरित्रें पहा. तेव्हां हा मार्ग केवळ अनुल्लंघनीयच नाहीं आणि या दिशेनें जाणें सर्वथैव अशक्यच आहे असें नाहीं. कोणीही मनुष्य सर्वगुणसंपन्न किंवा सर्वदोषविवर्जित असतो असें नाहीं. थोर पुरुष तर आपले दोषही प्रांजलपणें कबूल करतात. मग त्यांच्या दिग्दर्शनापासून अपाय तो कोणता ! आपल्या थोर चरित्रनायकांचे दोष प्रगट करावे, आणि त्यावर आक्षेप घेतल्यावर त्यांचें निरसनही सयुक्तिक कारण दाखवूनच करावें हा श्लाघ्य मार्ग दिसतो. तोच आदरून मींही यांत गुणदोषांचें यथामति दिग्दर्शन केलें आहे.

आमचे चरित्रनायक स्वतः फारसे स्तुतिप्रिय नव्हते, तेव्हां त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यासही हा आपले विषयींचा गुणदोषविवेचनात्मक चरित्रलेख त्यांच्या एका आश्रित आप्तानें लिहिलेला पाहून आनंदच वाटेल अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे. कारण, 'Paint me as I am' हें क्रॉमवेलचें मत त्यांस फार प्रिय होतें हें मला माहीत आहे.

यांत दिलेली बरीच माहिती कागदपत्रांवरून मिळविलेली आणि चरित्रनायकाच्या अनेक वर्षांच्या सहवासानें मला स्वतःला कळलेली होती व तिजवरूनच हें चरित्र मुख्यतः लिहिलें आहे. त्यांचे आप्त व स्वकीय यांजकडून या कामीं फारच थोडी मदत झाली. याचें कारण, चरित्रनायकाच्या गुणांविषयीं अनभिज्ञता नव्हे, तर आमच्या लोकांची अशा कामीं अनास्था हें होय. असो. मला मिळालेली माहिती मी निःपक्षपातबुद्धीनें आणि सत्यभक्तीनें आपल्या समजुतीप्रमाणें प्रगट केली आहे.

हें चरित्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें श्रेय चरित्रनायकाचे चिरंजीव रा. रा. दामोदर विनायक कीर्तने, ब्यारिस्टर–ॲट–लॉ, इंदूर संस्थानांतील सदर कोर्टाचे दुसरे न्यायाधीश, यांचेकडे आहे. त्याचप्रमाणें त्याचीं प्रुफें तपासण्याच्या कामीं माझे सन्मान्य मित्र प्रोफेसर राजाराम शास्त्री भागवत व रा. रा. वासुदेव गोविंद आपटे या उभयतांनीं मनःपूर्वक मदत दिली आणि वेळोवेळीं अनेक सूचना केल्या याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहे.

इंदूर, ता. १६ एप्रिल स. १९०४ इ. } बा. ना. देव.

# विनायक जनार्दन कीर्तने.

पुणें जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांत राजुरी नांवाचें एक लहान खेडें आहे, तें प्रस्तुत चरित्रनायकाच्या पूर्वजांचें मूळ ठिकाण होय. कीर्तने हें नांव मराठ्यांच्या इंग्रजी इतिहासग्रंथांत किंवा मराठी बखरींत आढळत नाहीं, यावरून या घराण्यांतील पुरुषांनीं मराठी राज्याच्या घडामोडींत किंवा उलाढालींत कांहीं मोठासा कार्यभाग केला होता असें दिसत नाहीं. सन १८९६ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत कै. नीळकंठराव कीर्तने—ज्यांस इतिहासविषयाचा बराच व्यासंग असून त्यावर शोध करण्याचा फार नाद असे—यांच्याशीं प्रस्तुत लेखकाचें वरील संबंधांत बोलणें झालें तेव्हां त्यांनीं ही गोष्ट मान्य केली, आणि दंतकथेच्या आधारानें आपल्या घराण्याबद्दल पुढील माहिती सांगितली:—

थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दींत रामाजीपंत नांवाचा परम एकनिष्ठ विठ्ठलभक्त ब्राह्मण राजुरीस रहात होता. दर महिन्यास एकादशीला पंढरपुरीं वारी करण्यास तो पायीं जाई. त्याप्रमाणें एकदां तो वारीला निघाला असतां मार्गांत खरे उपनामक एका छोट्याशा जहागिरदाराचीं दोन मुलें एका तळ्यांत पोहत असतांना बुडूं लागलीं असें त्यानें पाहिलें, आणि पाण्यांत उडी घालून त्यांस वांचविलें. पुढें तो तसाच वारीस गेला. आपणांवर गुजरलेला घोर प्रसंग व त्यांतून

त्या उदार पुरुषाच्या हातानें झालेली अकल्पित सुटका, हीं त्या मुलांनीं आपल्या आईबापांस कळविलीं. या उपकाराची फेड अंशतः व्हावी म्हणून त्या जहागिरदारानें रामाजीपंतास रस्त्यांतच गांठून त्यास आपल्या घरीं नेण्याची पराकाष्ठा केली, पण व्यर्थ. वारीनिमित्त घर सोडल्यावर ती संपण्याचेपूर्वी परत पाऊल घेणें नाहीं अशा कृतनिश्चयानें रामाजीपंतानें खऱ्यांच्या अत्याग्रहास देखील मान दिला नाहीं. परंतु पुढें एखाद्या वेळीं त्यांच्या घरीं जाण्याचें त्यानें कबूल केलें आणि वारी आटोपल्यावर त्यानें आपलें वचन पाळलें. त्या जहागिरदाराच्या घरचा पाहुणचार व आदर अनुभविला, आणि त्याची इच्छा पुरविली. खरे व कीर्तने या घराण्यांच्या स्नेहसंबंधाचें हें मूळ होय.

उत्तरोत्तर हा ऋणानुबंध वाढत गेला. पेशव्यांच्या दरबारीं खऱ्यांचें वळण होतें. त्यायोगानें त्या राज्याच्या चाकरींत रामाजीपंतांचा शिरकाव झाला. पुढें त्यांस जुन्नर तालुक्याची मामलेदारी मिळाली. हें काम त्यांनीं पुष्कळ वर्षें केलें आणि बराच पैसा मिळविला.

अशा संपन्न स्थितींतही रामाजीपंतांची पंढरीची पायीं चालण्याची वारी सुटली नाहीं, इतकी त्यांची एकनिष्ठ विठ्ठलभक्ति होती. शेवटीं वार्धक्यांत पायीं जाण्याचे क्लेश होत, तरी त्यांचा निश्चय ढळेना. अशा स्थितींत एके रात्रीं त्यांस दृष्टांत झाला. त्यांत विठ्ठलानें त्यांस सांगितलें "मीच तुझ्या घरीं येतों. आतां पंढरपुरास पायीं जाण्याची दगदग तूं करूं नकोस." स्वप्नांत निर्दिष्ट केलेल्या

स्थळीं दुसरे दिवशीं त्यांस विठ्ठलमूर्ति सांपडली व तेव्हांपासून त्यांची पंढरीची वारी सुटली.

रामाजीपंतांचें मूळ आडनांव घनसरे असें होतें. त्यांस कीर्तनाचा व भजनाचा फार हव्यास होता. म्हणून " या कीर्तने " असें थट्टेनें ते येतांच पेशवे म्हणत, त्यावरून इतरही तसेंच म्हणूं लागले. असें होतां होतां लौकिकांत हेंच नांव या घराण्यास पडलें, आणि मूळचें होतें तें लोपलें. कीर्तनरंगांत ते तन्मय होत असत. एकदां त्यांचे वाड्यास आग लागली, तरी भजनांत निमग्न असल्यामुळें त्याचें त्यांस भान राहिलें नाहीं.

सध्याच्या विचिकित्सक व श्रद्धाहीन काळीं वरच्यासारख्या दंतकथांवर कितीकांचा विश्वास बसेल तो बसो. पण रामाजीपंत निस्सीम भक्त होते ही गोष्ट त्यावरून उघड दिसते. त्यांचे पुत्र धोंडोपंत हेही पेशव्यांच्या राज्यांत कामावर होते. त्यांचे पुत्र हरीपंत हे अव्वल इंग्रजींत नेवाशास शिरस्तेदार होते. त्यांनीं चाळिशी उलटल्यावर शेवडे उपनामक गृहस्थाच्या एका २।२॥ वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें.* मुलीच्या आईनेंच हें विवाहकार्य

---

* या मुलीच्या वडील बहिणीशीं त्यांचा तिसरा विवाह प्रथम झाला होता. तिच्या पाठराखणीस मुलीची आई आणि आईच्याबरोबर तिची धाकटी मुलगीही आली होती. लग्नास एक महिना होतो न होतो तों त्यांचें तिसरें कुटुंब वारलें, तेव्हां तिची धाकटी बहीण आईबरोबर पाठराखणीस आलेली गांवांतील लोकांच्या आग्रहावरून व पूज्य मनुष्यांच्या आशीर्वादावरून तिच्या आईनें हरीपंतास दिली. लग्नाचे वेळेस मुलीचा बाप तेथें नव्हता,

दुराग्रहानें उरकून घेतलें. त्यावेळीं तिचा पती घरीं नव्हता. त्याची तिनें संमति घेतली नव्हती, आणि त्यास तें मान्य होणार नाहीं, हें ती जाणत होती. या तिच्या धारिष्टाचें आणि अविचाराचें नवल वाटणें साहजिक आहे. अलीकडे विदेशी कल्पनांचा प्रसार झाल्यानें स्त्रियांच्या स्वातंत्र्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांविषयीं पुष्कळ सयुक्तिक आणि अयुक्तिक चर्चा होत असते. पण हा स्त्रीस्वातंत्र्याचा थोडासा मासला आश्चर्यजनक आहे. व्यक्तिमात्राचें स्वभावबळ सर्व काळीं या जगांत असाच प्रभाव गाजवीत असतें. त्याबद्दल जुन्या नव्या काळांस हंसण्यांत फारसा अर्थ नाहीं. वधूचें २।२॥ वर्षांचें वय व वर तिच्याहून चाळीस वर्षांनीं मोठा, असा विवाह मानवी दृष्टीनें विचित्र आहे. त्यांत सुज्ञतेचा फारच अल्पांश दिसतो.

---

मुलीच्या आईनेंच हें विवाहकार्य लोकांच्या आग्रहावरून उरकून घेतलें. लग्नप्रसंगीं तिनें आपल्या पतीची संमति घेतली नाहीं आणि त्यांस तें मान्य होणार नाहीं असें ती जाणत होती. या तिच्या धारिष्टाचें आणि अविचाराचें नवल वाटणें साहजिक आहे. मुलीच्या बापानें आपल्या बायकोचें नांव टाकून आपल्या या एकुलत्या एक मुलीस दोन मुलें झाल्याखेरीज बायकोचें तोंड पाहणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून तपासाठीं ते निघून गेले. ते सप्तशृंगीस तपश्चर्या करीत होते. मुलीस चार मुलगे झाल्यावर बायकोनें माणूस पाठवून त्यांस नातवंडांस पहाण्यास आणविलें. त्यांना ही बातमी कळल्याबरोबर त्यांनीं मुलीचे घरीं येऊन त्या नातवंडांस आनंदानें अवलोकन केलें. पुढें तेथेंच राहून त्या चार नातवांस थोडथोडी विद्या शिकविली व पुढें राजुरी मुक्कामीं ते मुलीच्या घरीं असतांना हें जग सोडून परलोकवासी झाले.

घरीं आल्यावर मुलीच्या बापास हा प्रकार कळला तेव्हां त्यांस फार दुःख झालें, आणि आपल्या एकुलत्या एका मुलीच्या भावी संसाराबद्दल त्यांस मोठी भीति वाटली. तिच्या भाळीं यावज्जन्म बालवैधव्यजन्य दुःसह यातना भोगणें लिहिलें आहे असें त्यांस दिसत होतें. आपल्या स्वेच्छाचारी स्त्रीबद्दल मोठा क्रोध येऊन त्यांस परम वैताग उत्पन्न झाला व त्यांत त्यांनीं तिचें नांव टाकलें. तात्काळ घर सोडून ते कोकणांत जाऊन राहिले. मग बारा वर्षें त्यांनीं आपल्या स्वेच्छ बायकोचें तोंड पाहिलें नाहीं.

जगदीशाच्या अतुळ दयेनें आपल्या दृष्टीनें असंभाव्य दिसणाऱ्या गोष्टीसुद्धां केव्हां केव्हां घडतात असें आपण पहातों. असाच प्रकार या विजोड वधुवरांचा झाला. त्यांचा संसाररूप वृक्ष चांगला वाढला. पल्लव, पत्र, पुष्प, फळ इत्यादिकांनीं तो बराच विस्तारला व त्यानें बराच भूपृष्ठभाग व्यापला. ही स्थिति विवाहकाळीं कोणीं कल्पिली असती तर त्याचें तें मनोराज्य पाहून त्यास सर्वांनीं वेडा म्हटलें असतें. पण या बालवधूची गोष्ट खरोखरच अशी झाली! लौकिकांत तिचा संसार चांगलाच थाटला, आणि तिलाही तो सुखदायक झाला. पण वैधव्यदशा तिला मुळींच भोगावी लागली नाहीं असें मात्र झालें नाहीं. चाळिशी उलटल्यानंतर पांच पुत्र आणि पांच कन्या होऊन व संसारसुखाचा अनुभव २५–३० वर्षें घेतल्यावर वैधव्यस्थिति तिला प्राप्त झाली. तेव्हां तशा स्थितींत या दुर्दशेचें अत्युग्र आणि यातनामय

स्वरूप जितकें सौम्य होणें शक्य आहे, तितकें तें झालें होतें. अर्थात् विजोड विवाहाचें जें नैसर्गिक फल तें या ठिकाणीं म्हणण्यासारखें दृष्टीस पडलें नाहीं. यावरून असे विवाहसंबंध अनिष्ट व निंद्य नव्हत, असें मात्र मानतां येत नाहीं.

या बाईचें पूर्ववय बरेंच गरिबींत गेलें होतें. पण पुढें तिला चांगली संपन्न स्थिति प्राप्त झाली आणि ती शेवटपर्यंत टिकली. तिचे पांचही पुत्र चांगले कर्ते आणि सदाचारसंपन्न निघाले व त्यांचा उत्कर्ष तिनें पाहिला. सर्व मुलांनीं तिचा बोज चांगला राखला. तिला दुःख होण्यासारखें कोणीं कांहीं केलें नाहीं.

तिचा तिसरा पुत्र जनार्दन हा प्रस्तुत चरित्रनायकाचा पिता होय. त्यांनीं प्रथम २ रुपयांची चाकरी धरून, वाढतां वाढतां ते कोल्हापूर संस्थानचे कारभारी झाले होते. त्या जागेवरून त्यांनीं पेनशन घेतलें. ते फार बुद्धिमान होते. कोणत्याही विषयावर चटकदार लिहिण्याची हातोटी त्यांस फार चांगली साधली होती, असें त्यांचे बंधु म्हणत असत. कर्तव्यदक्षता, व्यवहारज्ञान, राजकीय डावपेंच, टापटीप इत्यादि भाग्योदयास लागणारे गुण त्यांचे अंगीं चांगले होते. त्यांत परिस्थिति अनुकूल राहिली व त्यांस थोर पद मिळालें. शेवटचीं बरींच वर्षें त्यांनीं राजुरीस सुखासमाधानांत घालविलीं. उत्तरावस्थेंत त्यांनीं संस्कृताचा व्यासंग केला, आणि रामायण, महाभारत, इत्यादि काव्यें टीकेवरून लावण्याइतकी त्यांची त्यांत गतिही झाली होती. दुसरेही धर्मविषयक ग्रंथ व काव्यें अभिरुचीनें व

रस जाणून ते वाचीत असत आपल्या आईवर त्यांची मोठी भक्ति होती. तिची आज्ञा घेतल्यावांचून देवदर्शनासही ते जात नसत, असें म्हणतात. ते फार दयाशील होते. आपल्या कुटुंबांतील माणसांचा आणि आप्तांचा त्यांनीं चांगला परामर्ष घेतला, असा त्यांचा लौकिक आहे.

प्रस्तुत चरित्रनायकाचा जन्म राजुरी येथें भाद्रपद शुद्ध चतुर्थी शके १७६२ (सन १८४० इ.)या सालीं झाला, म्हणून त्याचें नांव विनायक असें ठेविलें. विनायक-राव चार वर्षांचे झाल्यावर ते आपल्या वडिलांकडे कोल्हा-पुरास गेले. पुढ एक वर्षाचे आंतच त्यांची आई प्रसूति-रोगानें तेथें वारली. बालपणीं आई मरणें म्हणजे या आयुष्यांतल्या तीन मोठ्या आपत्तींपैकीं पहिली होय. ती त्यांजवर येऊन कोसळली, आणि मातृवात्सल्याच्या अनुपम सुखास ते आंचवले; परंतु बालपणांत त्याबद्दल त्यांस विशेष खंती वाटणें शक्य नव्ह-तें. पण पुढें सज्ञान स्थितींत आपल्या मातृहीनतेबद्दल निराशेचे उद्गार कधीं कधीं यांच्या मुखाबाहेर पडत असत. त्यांच्या जयपाळ नाटकांत मातृवात्सल्य व पुत्रप्रेम या मनोवृत्तींचें अत्यंत मनोहर आणि हृदयद्रावक चित्र प्रभावती, चंद्रकेतु व जयपाळ यांच्या संभाषणांत उठलें आहे. तें वाचून मन तल्लीन होतें. तें काढणाऱ्या कुशल चित्रकाराच्या स्वतःच्या भाग्यीं तें सुख लाभलें नसावें, हा विचार मोठा विषादजनक आहे.

कोणतीही गोष्ट अप्राप्य असली, म्हणजे तिचें महत्त्व आणि अपरूपता हीं विशेष भासतात. दिसण्यांत आणि असण्यांत मोठें अंतर असतें. सारें चकचकणारें सोनेंच

असतें, असा नेम नाहीं. कोणत्याही स्थितीची निव्वळ कल्पना आणि तिचा अनुभव यांत फरक असावयाचाच. वरील पुत्रप्रेम आणि मातृवात्सल्य या सुखदायक मनोभावनांचा अनुभव आई विद्यमान असणाऱ्या किती थोड्या भाग्यवंत पुत्रांच्या प्राक्तनीं लाभत असेल बरें ? ही ऐहिक स्थिति अत्यंत विषम व उद्वेगजनक आहे. दोन स्वभावांत पूर्ण सारखेपण फारच क्वचित् आढळतें; किंबहुना मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. त्यास निरनिराळ्या वासना, आवडनावड, व्यवसायव्याप्तत्व आणि तज्जन्य रुचिवैचित्र्य, इत्यादिकांचा संस्कार मतीस जडला आणि इतर अनेक गोष्टींची भर पडली, म्हणजे मूळची प्रेमळ वृत्ति फार कलुषित होते. त्यामुळें कविवर्णित मातृप्रेम व व्यवहारांतलें मातृप्रेम यांत फार अंतर असतें यांत नवल नाहीं. हा प्रौढ वयांतला प्रकार झाला; पण मुलांच्याचसंबंधानें पाहिलें, तर आई लहानपणीं मरण्यासारखी त्यांस दुसरी मोठी हानि नाहीं. लहानपणीं आईचें आपल्या मुलावरचें प्रेम अपार असतें. पण त्याची थोरवी लहान वयांत कळत नाहीं. व पुढें जाणत्या वयांत भिन्न आणि स्वार्थपर मनोभावनांच्या फेऱ्यांत फिरतांना हें प्रेम फारसें जागृत राहतें असें नाहीं. तसेंच सारासार विचारशक्ति आणि गुणदोषदृष्टि आली म्हणजे तें अबाधित राहतेंच, असा नेम नाहीं. त्याचप्रमाणें पुढें पुत्रप्रेम, पत्नीप्रेम, महत्त्वाकांक्षा, द्रव्यार्जन, इत्यादिकांनीं हृदय व्याप्त केलें म्हणजे आईचें महत्त्व बरेंच कमी वाटूं लागतें, असें व्यवहारांत आढळतें. ह्याप्रमाणें कल्पनावस्थेंतल्या व व्यव-

झारांतल्या हरएक वस्तुस्थितींत असेंच अंतर असलेलें प्रत्ययास येतें. पहिलींतील मनोहरता व अपरूपता दुसऱ्यांत फारशी आढळत नाहीं. दुसरींत गुणदोषमय स्थिति अनुभवास येत. आई प्रौढ वयापर्यंत जगती, तर कदाचित् आमच्या चरित्रनायकास या मातृप्रेमाची इतकी महती वाटली नसती. मातृहीनतेमुळें या मनोवृत्तीचें महत्त्व आणि अपरूपता त्यांस विशेष भासली असावी.

विनायकरावांच्या बाल्यावस्थेबद्दल कांहीं विशेष लिहिण्यासारखें नाहीं. आपल्या घरच्या तरुण विद्यार्थ्यांस सदुपदेश करतांना आपल्या स्वतःच्या विद्यार्जनकाळीं आपणही या स्थितीचा करावा तितका चांगला उपयोग केला नाहीं, यासंबंधांत क्वचित् प्रसंगीं ते खेदोद्गार काढीत असत, असें मला स्मरतें. जॉन स्टुअर्ट मिल् यांस ज्याप्रमाणें बालकाच्या कोंवळ्या मनास चांगलें वळण लावण्यांत कुशल अशा उदारधी बापाचा सहवास लाभला होता, किंवा सर्वभूतानुकंपा मूर्तिमंत मनांत ठसविणारी वत्सल माता मलबारी शेटजीचें लालनपालन बालवयांत करीत होती, तशा प्रकारच्या मातापित्याचा समागम प्रस्तुत चरित्रनायकास मिळाला नव्हता. त्यामुळें बालवयाविषयीं विचार मनांत आले तर त्यांस फारसें समाधान वाटत नसे, यांत मोठेंसें नवल नाहीं. सुशिक्षित आणि सुविचारसंपन्न झाल्यावर प्रौढदशेंत असतां आपल्या विद्यार्थिदशेकडे पाहून पूर्ण समाधान पावण्याचें फारच थोड्यांच्या नशिबीं असतें. पुन्हां मार्मिक निरीक्षण केलें असतां पूर्ण समाधान देणारा असा आपल्या आयुष्यांतला

भाग फारच अल्प सांपडतो, याचा प्रत्यय कोणास येत नाहीं !

लहानपणीं विनायकरावांची शरीरप्रकृति फार अशक्त होती. त्यांचा स्वभाव तामसी व अतिशय संतापी असा होता. लहानमोठें न पाहतां प्रत्येकाच्या उत्तरास चापून प्रत्युत्तर देण्यास ते कमी करीत नसत. त्यांचें वाक्चापल्य पाहून सर्वजण मोठा अचंबा करीत, असें त्यांच्या घरचीं वडील माणसें सांगत. हें जर सत्य मानलें, तर पुढें प्रौढवयांत त्यांची ही वृत्ति फारशी दिसून येत नव्हती, हें आश्चर्य आहे. लहानपणीं त्यांची बुद्धि बरीच प्रखर होती, पण तिजहूनही त्यांची कल्पनाशक्ति अधिक तीव्र होती, असें दिसतें. याबद्दल त्यांच्या काकांनीं कांहीं माहिती मला दिली, ती खालीं देतों:-

" विनायकरावांस लहानपणीं शाळेंत घातल्यावर त्यांचे गुरु एकदां म्हणाले कीं ' त्याची बुद्धि फार तीव्र आहे, आणि पाठशक्तिही चांगली आहे, पण त्याची धारणाशक्ति कमी आहे. त्यास पाठ लवकर होतें, पण तो लवकरच विसरून जातो. त्याचा सोबती माधवराव ( न्या. रानडे ) याचें मात्र तसें नाहीं. त्यास पाठ होण्यास थोडा उशीर लागतो, पण एकदां झालें कीं मग तें वज्रलेप; पुन्हां दोन महिन्यांनीं पहिल्यासारखें पाहून घ्या. '

विनायकराव दहा वर्षांचे असतांना कोणीं एकानें एक श्लोक म्हटला, तो आतां माझ्या स्मरणांत नाहीं; पण त्यांत दोन व्यक्तींमध्यें १६ नातीं लागतात, असा कांहीं प्रकार होता. कीर्तने व रानडे या दोन घरांत

या श्लोकानें लहानमोठ्या माणसांत मोठी गडबड उडाली. मोठी उरस्फोड करून कोणीं आठ दहा नातीं लावलीं. पण सोळा नात्यांचा बरोबर मेळ कोणास बसवितां आला नाहीं. शेवटीं विनायकरावांनीं दहा दिवसांनंतर सोळा नात्यांचा वितंडात उलगडा केला आणि तो सर्व लहानथोरांस मानवला—"यावरून लहानपणींच त्यांची कल्पनाशक्ति किती विशाल होती याचें अनुमान होतें.

सन १८५१ सालीं त्यांनीं इंग्रजी शिकण्यास आरंभ केला. ते बारा वर्षांचे असतां त्यांचे शाळेंत प्रसिद्ध महाराष्ट्र वक्ते महादेवशास्त्री कोल्हटकर आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी हे दोघे आले होते. तेव्हां त्यांनीं लिहिलेला एक निबंध पाहून उभयतांनीं त्यांची फार वाहवा केली होती, असें त्यांचे बंधु रा. त्रिंबकराव कीर्तने यांनीं प्रस्तुत लेखकास कळविलें आहे. यावेळीं कोल्हापुरास इंग्रजी शाळा नवीनच स्थापन झाली होती. तींत त्यांनीं सन १८५६ इ.पर्यंत अभ्यास केला. आत्माराम नारायण आणि कृष्णाजी चापाजी हे दोघे यावेळीं त्यांचे इंग्रजी शिक्षक होते. या उभयतांबद्दल चांगला किंवा वाईट उद्गार काढतांना मीं त्यांस कधींही ऐकलें नाहीं. त्यांची गुरुभक्ति अंध नव्हती, तर ती जागृत असे. सन १८८३ सालीं बडोद्यांत नायब दिवाणाच्या कामावर असतांना राजवैभवासह बड्या कामगार मंडळींत बसले असतां, सकाळीं ८ वाजण्याचे सुमारास त्यांचे लहानपणचे मराठी दमेकरी पंतोजी वयानें सुमारें ७६ वर्षांचे, वार्धक्यानें वाकलेले, गरी-

वसा पोषाख करून त्यांच्या भेटीस आले होते. दर वाज्याशींच त्यांस मज्जाव झाला. तितक्यांत त्यांस दम्याचा ठसका लागला. पुढें कांहीं वेळानें तो शांत झाल्यावर त्यांची आंत वर्दी लागली, तेव्हां त्यांस आंत बोलाविलें. ते आल्यावर विनायकरावांनीं उठून त्यांस अग्रस्थान दिलें आणि त्यांच्याशीं घटकाभर सन्मानपुरःसर भाषण करून नंतर त्यांस निरोप दिला, हा प्रकार मीं पाहिला आहे.

विनायकराव १३।१४ वर्षांचे असतां त्यांची प्रकृति क्षीण व्हावयास लागली होती. तेव्हां काशिनाथपंत ऊर्फ अण्णासाहेब गाडगीळ नामक कोल्हापुरच्या कामगारानें सहा महिने त्यांस आपल्या घरीं ठेवून कांहीं अंशीं औषधोपचारानें पण पुष्कळ अंशीं त्यांजकडून व्यायाम करवून त्यांची तब्यत दुरुस्त केली. आतां त्यांचें शरीर बरेंच सशक्त झालें होतें. या गृहस्थाच्या विधवा स्त्रीस त्यांनीं इसवी सन १८७५ सालीं इंदुरास आणिलें होतें. तिजबद्दल त्यांच्या ठायीं मोठा पूज्यभाव वसत होता. तिच्याशीं ते मोठ्या बहुमानपूर्वक आणि भक्तिपुरःसर बोलत असतांना मीं पाहिलें आहे. इतका पूज्यभाव आपल्या इतर आप्तस्त्रीजनांच्यासंबंधानें त्यांनीं दाखवितांना मला कधीं दिसलें नाहीं.

आपल्या तामसी आणि अनियंत्रित वर्तनास आळा घालण्यास त्यांनीं आपल्या वयाच्या बाराव्या वर्षापासून आरंभ केला. त्याबद्दल त्यांनीं पुढील प्रसंग एकदां सांगितला–" बाराव्या वर्षी माझ्या आजीबाईबरोबर एकदां मी पंढरपुरास गेलों होतों. तेथें चंद्रभागेंत

स्नानाचे वेळीं संकल्प सोडतांना आजी म्हणाली 'आजपासून हटवादीपणा, हूडपणा, संताप इत्यादि दुर्गुण सोडण्याचा संकल्प करून चंद्रभागेंत तूं पाणी सोड' त्याप्रमाणें मीं विशेष विचार न करतां गमतीनें पाणी सोडलें. यापुढें संताप चढला कीं मला या कराराची आठवण होई आणि मी आत्मसंयमन करण्याचा यत्न करी. एव्हांपासून माझा वर्तनक्रम सुधारण्याचा आरंभ झाला." त्यांची आजी त्यांस प्रसंगोपात्त उपदेश करीत असे आणि तिच्या ठायीं त्यांची बरीच पूज्यबुद्धि वसत होती.

सन १८९१ सालीं कागल संस्थानच्या खेर उपनामक एका कुलीन गृहस्थाच्या मुलीशीं त्यांचा विवाह झाला. वधूचें वय वराच्या वयापेक्षां सव्वा वर्षानें लहान होतें आणि ती चांगली सशक्त, सुस्वरूप आणि सद्गुणसंपन्न अशी होती. दिसण्यांत हा विवाह योग्य होता असें वाटणार नाहीं. कारण, पूर्व वयांत विनायकरावांची शरीरप्रकृति अशक्त होती. तशांत त्यांची वृत्तिही स्वच्छंदी आणि अनियंत्रित होती. अशा स्थितींत त्यांचा विवाह सुखावह आणि कुशलपरिणामी होणें फारसें संभवनीय दिसत नव्हतें. तशांत वधू सशक्त व वर अशक्त; उभयतांचें केवळ सवा वर्षाचें वडीलधाकटेपण; रूढींतल्या म्हणीप्रमाणें वरणभाताचा प्रकार होण्याचा संभव. असा विवाहयोग जुळवून आणणें मोठें धोक्याचें आणि जबाबदारीचें काम होय. या सर्व गोष्टींचा त्या वेळीं योग्य विचार झाला नाहीं, हें उघड दिसतें. विवाहसंबंधीं आमच्या लोकांच्या समजुती फार

कोत्या व अविचारमूलक आहेत. विवाह म्हणजे एक अत्यावश्यक बाब होऊन बसली आहे. त्या स्थितीची जबाबदारी पत्करण्यास लागणारी कर्तृत्वशक्ति वराच्या अंगांत आहे किंवा कसें याचा यत्किंचितही विचार कोणी करीत नाहीं. वस्त्रपात्रादि आवश्यक गोष्टींप्रमाणें बायको होऊन बसली आहे. जनप्रवाहाबरोबर वाहत जाणारे लोक फार. गतानुगतिकत्वाचा पगडा लोकांवर जबरदस्त बसला आहे. तेव्हां विनायकरावांचे वडील या गोष्टीस अपवाद झाले नाहींत, यांत नवल नाहीं. ते तसे झाले असते, तर मात्र नवल झालें असतें.

आतां विनायकरावांबद्दल हा संभवनीय दिसणारा प्रकार घडून आला नाहीं, हें खरें आहे. " सानुकूलो जगन्नाथो विपरीतः सुपरीतो भवेत् " ॥ मानवदृष्टीनें संभवनीय दिसणाऱ्या गोष्टी कधीं विपरीत होतात, आणि असंभवनीय वाटणाऱ्या गोष्टी घडून येतात, असें पुष्कळ वेळां अनुभवास येतें. तथापि अशा स्थितींतही योजकांचा दोष कमी गणतां येत नाहीं.

पूर्व वयांत विनायकराव आपला अभ्यास लक्ष्यपूर्वक मेहनत घेऊन व काळजीनें करीत नसत, असें त्यांचे सहाध्यायी म्हणतात, आणि त्यांच्या अंतर्गत गुणांचा विचार केला तर ही गोष्ट संभवनीय दिसते. व्यासंगप्रिय असा त्यांच्या मनाचा कल नव्हता. जिज्ञासावृत्तीकडे त्यांची धांव फार होती, त्यामुळें शाळेंतला अभ्यास त्यांस प्रिय होण्यासारखा नव्हता.

इ. स १८५६ पर्यंत विनायकरावांनीं कोल्हापुरच्या शाळेंत अभ्यास केला. त्यांत त्यांनीं कोणकोणते ग्रंथ

घाचले, त्यांपासून त्यांच्या मनावर कसकसे परिणाम झाले, शाळेतल्या शिक्षणपद्धतीबद्दल त्यांचीं मतें काय होतीं, इत्यादि गोष्टींबद्दल माहिती मिळण्यास साधन नाहीं याबद्दल वाईट वाटतें. या संबंधांत त्यांस कांहीं बोलतांना मीं ऐकलें नाहीं. फक्त या स्थितींत करावा तितका झटून अभ्यास केला नाहीं, म्हणून खेदोद्गार काढतांना मात्र त्यांस पाहिलेलें आठवतें; पण याहून जास्त माहिती त्यांच्या मुखांतून फार करून कधीं मिळाली नाहीं, किंवा त्याबद्दल कांहीं अनुमान काढतां येईल असेंही साधन नाहीं.

सन १८५६ इसवींत रानडे आणि इतर सहाध्यायी वर्ग याबरोबर विनायकराव मुंबईस आपला अभ्यास पुढें चालविण्याकरितां आले, आणि एलफिन्स्टन नामक विद्यालयांत प्रविष्ट झाले. पुढें ३।४ महिन्यांनीं ते पहिल्या वर्गांत दाखल झाले. तेथें पार्शी शिक्षक कैखुस्रु अल्पईवाला, वेस्ट, आणि स्मिथ् हे गृहस्थ त्यांचे शिक्षक होते. या गुरुसंबंधानेंही ते पुढें बरा किंवा वाईट उद्गार कधीं काढीत नसत.

त्या काळचे इंग्रजी शिक्षक आपल्या शिष्यवर्गाबद्दल फार कळकळ बाळगीत असत, आणि ते मोठे उदार विचाराचे व सहृदय असत. त्या काळच्या ५७ सालच्या बंडासारख्या नाजूक प्रकरणावरही आपले निर्भीड आणि न्यायपरिपूर्ण उद्गार ते आपल्या वर्गांत शिष्यांसमोर काढीत असत. इतका मनाचा मोकळेपणा त्यांच्यांत वसत असे, असें तत्कालीन मंडळी सांगते. स्वदेशाभिमान, परराज्य, पारतंत्र्य, परदास्य इत्यादिक वि-

षयावर त्याचे विचार फार उदार असत, आणि ते आपल्या वर्गांत काढण्यास त्यांस शंका वाटत नसे.

सन १८५८ सालांत सांप्रतचे कॉलेजांतले अभ्यास या शाळेंत सुरू झाले आणि या वर्षी पगारी विद्यार्थी होऊन त्यांस १० रुपये महिना मिळूं लागला, आणि दुसऱ्या सालीं तो पंधरा रुपयेपर्यंत वाढला. स. १८५७ सालांत युनिव्हर्सिटीचा कायदा पसार होऊन सन १८५९ सालीं पहिली प्रवेश-परीक्षा झाली. त्यावेळीं परीक्षेंत एकंदर १२० विद्यार्थी बसून, २० इसम पसार झाले, त्यांत ते होते. यानंतर त्यांस २० रुपयांची स्कॉलरशिप मिळूं लागली व ती दोन वर्षे टिकली. सन १८६१ सालीं ते दुसऱ्या परीक्षेस बसले होते, पण यांत त्यांस यश आलें नाहीं. यापुढें त्यांस स्कॉलरशीष (शिष्यवृत्ति) सुरू होती, म्हणन आणखी एक वर्ष ते कॉलेजांत राहिले. परंतु या सालीं व्हावी तशी परीक्षेची तयारी झाली नव्हती, म्हणून ते परीक्षेस बसले नाहींत आणि त्यामुळें ती शिष्यवृत्ति बंद होतांच त्यांनीं कॉलेज सोडलें.

यानंतर सन १८६२ सालीं प्रथम ६० रुपये पगाराची हायस्कुलांत शिक्षकाची जागा त्यांस मिळाली.

विद्यालयांतला अभ्यास त्यांच्या हातून लक्ष्यपूर्वक काळजीनें झाला नाहीं. गणित विषयाकडे त्यांचें दुर्लक्ष्य असे, म्हणून तो विषय फार कच्चा होता. आणि तिकडे त्यांच्या मनाचा कल नव्हता, म्हणून शेवटपर्यंत तो तसाच राहिला. गणित विषय त्यांस प्रिय नसे, ही गोष्ट खरी आहे; परंतु त्याचें आकलन करण्यास त्यांची बुद्धि

असमर्थ होती असें मात्र नाहीं. तिकडे त्यांचें दुर्लक्ष झालें, ह्मणून त्यांस पदवीधर बनण्यास प्रत्यवाय आला. घरांतल्या विद्यार्थ्यांस बीजगणित, सिद्धांत इत्यादि विषयांवर प्रश्न विचारतांना, एखादी शंका कोणी काढली तर विचारपूर्वक तिचें निराकरण करतांना मीं त्यांस पाहिलें आहे. गणित विषयांत निष्णात असलेले त्यांचे चुलत बंधु विठ्ठलराव एकदां ह्मणाले " गणित विषयांतल्या कच्चेपणामुळें बाबांना कॉलेज सोडावें लागलें ह्मणतात; पण तो विषय त्यांस अवगत नाहीं असें दिसत नाहीं. त्यांत डोकें घातलें ह्मणजे आह्मांलाही ते कुंठित करितात आणि घोटाळ्यांत पाडतात."

विनायकरावांच्या कॉलेजांतील शिक्षणक्रमाचा याप्रमाणें जो असमाधानकारक परिणाम झाला, त्यास दुसरींही कारणें आहेत. प्रथमतः इ. स. १८६० सालांत त्यांच्या जिवावरचें मोठें दुखणें गेलें. याच सुमारास त्यांस पुनः क्षीणता वाटावयास लागली, आणि ती दिवसानुदिवस वाढूं लागली. इ. स. १८८२ सालीं फार आजारी असतां डा. तळवळकर यांस वरील प्रसंगाचें स्मरण करून ते ह्मणाले " डाक्टर, मला शरीरसंपत्तीचें सुख फारच कमी लाभलें. मला सांप्रत ४४ वें वर्ष आहे. मी इतकीं वर्षें जगेन, अशी मला मुळींच आशा नव्हती. मी २१ वर्षांचा होतों, तेव्हां मला मोठें दुखणें झालें. एका रात्रीं माझी अत्यवस्था झाली. ती रात्र पार पडेल असें वाटेना. त्याच सुमारास सर जमशेटजी जिजभाई आपल्या ७६ व्या वर्षी आपलीं ऐहिक कर्तव्यें यथास्थितपणें संपवून वारले

होते, त्याचें स्मरण होऊन मला फार वाईट वाटलें. कारण माझी अवस्था त्यांच्या अगदीं उलट होती. माझी विशीही पार पडली नव्हती. मीं आपलीं कर्तव्यें करण्यास नुसता आरंभही केला नव्हता. अशा स्थितींत हें जग सोडावें लागणार, हा विचार मनांत येऊन मला परमावधीची खिन्नता प्राप्त झाली. " असो. त्या रात्रीनंतर त्यांस आराम होऊन बरें वाटूं लागलें, आणि हें अरिष्ट टळलें. याच सुमारास त्यांच्या संसारक्रमास प्रारंभ झाला आणि ते अपत्यवान् झाले. विद्यार्थिदशा आणि वैवाहिक स्थिति हीं परस्परविरुद्ध आणि विसंवादी अशीं आहेत, हा अनुभव सर्वत्र आहे. विद्यार्थिदशेंत आपलें मन अभ्यासांत पूर्णपणें संलग्न ठेवण्याचें सोडून आपली अनिवार जिज्ञासावृत्ति तृप्त करण्याकडे त्यांनीं घातलें. याच सुमारास त्यांनीं आपलें सर्वप्रसिद्ध आणि सर्वमान्य " थोरले माधवरावांचें नाटक " लिहिलें. या नाटकावरून त्यांनीं ग्रांट डफकृत मराठ्यांचा इतिहास या वेळीं फार मार्मिकतेनें वाचला होता, ही गोष्ट शोधक पुरुषांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. हें नाटक त्यांनीं केवळ आपल्या विसाव्या वर्षी लिहिलें, ही गोष्ट मनांत आणली ह्मणजे त्यांच्या विशाल नाटकरचनाशक्तीचें आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं.

सन १८५९ सालीं इंग्लंडांत सोळाव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या राज्यक्रांतीवर त्यांनीं एक निबंध लिहून तो मुंबईच्या नामांकित "ज्ञानप्रसारक" सभेपुढें वाचला. पुढच्या वर्षी " हिंदुस्थानांतल्या प्राचीन

विद्या " या विषयावर त्यांनीं एक निबंध लिहिला, तो त्या सभेच्या मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झाला होता. थोर मनाचा विकास कसा होत जातो हें पाहण्याची ज्यांस हौस वाटते त्यानीं वरील लेख वाचले तर आपले श्रम व्यर्थ गेले असें त्यांस खास वाटणार नाहीं. त्यांत विशेष नांवाजण्यासारखें कांहीं आहे असें नाहीं. एकंदर विषयाच्या स्वरूपाचें दिग्दर्शन ठीक केलें आहे. भापा बरी आहे, पण कोठें कोठें इंग्रजी वळणावर गेली आहे. माहिती बरीच विस्तृत आहे; ती त्यांनीं मूळ संस्कृत ग्रंथ वाचून मिळविली असेल हें संभवनीय नाहीं. संस्कृत ग्रंथ समजण्याइतकें त्या भाषेचें ज्ञान त्यांस नव्हतें. होरेस हेमन विल्सनकृत " प्राचीन संस्कृत विद्या " हा ग्रंथ वाचून त्यांनीं हा ग्रंथ लिहिला असावा, असें अनुमान आहे. याच सुमारास संस्कृत नाटकांचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध होण्यास प्रारंभ झाला होता, तीं त्यांनीं वाचलीं होतीं. त्यांचा उल्लेख या लेखांत जागोजाग आला आहे, आणि त्याबद्दलचे त्यांचे विचार मार्मिक आणि विचारणीय आहेत.

वरील सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतल्यावर त्यांस पदवीधर होतां आलें नाहीं, याचें आश्चर्य वाटणार नाहीं. अशा स्थितींत ते पदवीधर झाले असते, तर मात्र नवल होतें.

पुढें राजकारणासारख्या बिकट व्यवसायांत व्यापृत झाल्यावर मात्र त्यांनीं अशा प्रकारच्या चुका केल्या नाहींत. पहिल्या उमरींत आणि तारुण्याच्या बहारींत स्वदेशसुधारणा, स्वदेशाभिमान, स्वातंत्र्य, प्रजेचे हक्क

त्यादि मनोभावांची मोठी स्फूर्ति होऊन, भांडें फार भरलें कीं तें सांडावयास लागतें, त्याप्रमाणें त्यांस आपले विचार प्रदर्शित केल्यावांचून राहवलें नाहीं.

विनायकराव पदवीधर झाले नाहींत ह्मणून त्यांचा उत्कर्ष होण्यास आडकाठी आली असें मात्र झालें नाहीं. परिस्थिति आणि अदृष्ट यांच्या अनुकूलतेनें कित्येक सुप्रसिद्ध व्यक्तींच्या आयुर्मार्गास अनपेक्षित आणि कधीं कधीं कल्पनातीत असें वळण लागलेलें दिसन येतें. संपत्ति, वैभव व राज्याधिकार यासंबंधांत त्यांनीं आपल्या सर्व सहाध्यायी पदवीवाल्यांस फार मागें टाकलें. त्यांच्या बरोबरच्या लोकांतून त्यांच्या हयातींत एकाचाही त्यांच्याइतका उत्कर्ष झाला नाहीं. या सर्व गोष्टी यदृच्छेनें त्यांच्या घरीं चालत आल्या, तेव्हां त्यांनीं त्यांचा अव्हेर केला नाहीं, किंबहुना आनंदानें त्या स्वीकारल्या, हें ह्मणणें अयथार्थ होणार नाहीं [ त्यांचा स्वीकार न करणारे किती हरीचे लाल सांपडतील बरें ? ] परंतु सत्यरक्षणार्थ आणि स्वाभिमानामुळें जेव्हां हीं वैभवादि बाह्यांगें सोडण्याची वेळ आली, तेव्हां जितक्या आनंदानें तीं प्रथम स्वीकारलीं होतीं तितक्याच तिरस्कारानें व निस्पृहतेनें त्यांनीं त्यांचा त्याग केला, ही गोष्ट फार महत्वाची आहे. यासंबंधांत विनायकरावांचें मत त्यांच्या इंग्रजी लेखांत दिलेलें येथें सादर करणें अप्रासंगिक होणार नाहीं. " ग़रीब बिचारा विठ्ठलपंत ! तो पंचवीस वर्षांचा होता तेव्हां त्यास पंचवीसच रुपये मिळत होते आणि सत्तर वर्षांचा झाला तरी ते तितकेच राहिले. तो ऐहिक

स्थितींत मात्र गरीब होता. परंतु तीहून मौल्यवान् अशी जी पारलौकिक संपत्ति तिच्यासंबंधानें मात्र तो गरीब नव्हता. " बाह्य वैभवानें परिवेष्टित असण्यापेक्षां आत्मिक आणि सात्विक संपत्तीनें युक्त असणें श्रेष्ठतर आहे, ही गोष्ट सदोदित विनायकरावांच्या मनांत वागत होती. वैभवमंडित असतां आपली मानसिक संपत्ति आणि ज्ञान वाढविण्यांत ते सदा निमग्न असत. त्यांचें ग्रंथवाचन कधीं खळलें नाहीं.

सन १८६२ च्या नोव्हेंबर महिन्यांत प्रथम ६० रुपये दरमहाची एका शिक्षकाची जागा त्यांस मिळाली. पुढें थोडक्याच महिन्यांत धुळें येथील इंग्रजी शाळेवर मुख्य अध्यापकाच्या जागीं त्यांची बदली झाली. तेव्हां त्यांस १०० रुपये पगार झाला. या ठिकाणीं त्यांनीं एक वर्ष काम करून बऱ्याच सुधारणा केल्या व एक पुस्तकालय स्थापलें. या ठिकाणीं असतांना तेथले डेप्युटी कलेक्टर रा. ब. नाना मोरोजी यांशीं त्यांचा परिचय आणि स्नेह जडला. रा. ब. नानासाहेब कोल्हापुरीं असतांना त्यांनीं तेथें इंग्रजी शाळा स्थापन केली होती, त्यावेळीं विनायकराव फार लहान असून त्यांच्या इंग्रजी अभ्यासास नुकताच आरंभ मात्र झाला होता. आतां १०।१२ वर्षांचे अवधींत ते विद्वान होऊन दोघांच्या समागमाचा सुयोग अनायासें जमून आला. दोघेही सारखेच विद्याव्यासंगी, सात्विक वृत्तीचे आणि रसिक असल्यामुळें " समानशीलव्यसनेषु

सख्यं " या ह्मणीप्रमाणें त्यांचा समागम परस्परांस फार सुखदायक झाला असेल, यांत संशय नाहीं. ते वारंवार नानासाहेबांचे घरीं जात असत आणि कधीं कधीं दोघे बुद्धिबळांचा डाव खेळत असत, असें त्या वेळीं धुळ्यास असलेल्या एका गृहस्थानें मला सांगितलें आहे.

या ठिकाणीं असतां त्यांनीं आपलें दुसरें सर्वमान्य " जयपाळ नाटक " रचिलें आणि तें आपल्या वरील सर्वमान्य मित्रास नजर केलें. यावरून नानासाहेबांविषयीं त्यांच्या मनांत फार आदर वसत होता, असें दिसतें. दोघांचेंही स्थलांतर झाल्यावर त्यांचा पत्रव्यवहार पुढें कांहीं वर्षें होत असे. बडोद्यास गेल्यावर मात्र तो बंद पडल्यासारखा झाला. दोन तुल्यस्वभाव, आणि तुल्यगुण सत्पुरुषांचा योग फार क्वचित् होतो; आणि झाला तरी तो फार काळ टिकणेंही दुष्करच असतें. भिन्न व्यवसायांचे लोक दुपारीं उन्हाच्या तापानें तापले म्हणजे एकाद्या वृक्षछायेंत विसावा घेऊन आणि क्षणमात्र दुसऱ्याचें समागमसुख अनुभवून लागलीच आपआपल्या कामाच्यामागें चारी दिशांना जातात, तशीच कांहींशी सत्समागमाची गोष्ट आहे.

आमच्या चरित्रनायकाचें प्रथम दर्शन प्रस्तुत लेखकाला घडलें, त्याचें स्मरण त्यास आहे. या समयीं त्यांची मुद्रा फार गंभीर, विचारमग्न आणि उग्र अशी भासली. ते बहुतकरून घरीं पुस्तक वाचण्यांत निमग्न असत. अल्पवयस्कांस तर त्यांच्या वाऱ्यासही उभें राहूं नये, असें वाटावें. पांचव्या पुस्तकांतल्या

" तीन राक्षसांच्या " गोष्टींतील एका राक्षसास जसें एका मुलानें कानोसा घेऊन लपत लपत पाहिलें, तसाच बहुतेक प्रसंग त्यांस पाहणाऱ्या मुलावर येत असे.

त्यांच्या पत्नीच्या संबंधानें पाहिलें तर उलट प्रकार अनुभवास येई. या संबंधांत त्यांच्या एका आप्तानें पुढील वर्णन दिलें आहे:—तिलाही मीं प्रथम धुळ्यास पाहिलें. यापूर्वीं तिच्याइतकी श्रीमान, रूपवती, वस्त्रालंकारांनीं देदीप्यमान अशी स्त्री माझ्या अवलोकनांत आली नव्हती. त्यामुळें प्रथमदर्शनीं तिचेबद्दल दिव्य देवांगनेची किंवा अप्सरेची कल्पना मनांत आली. डा० जॉन्सननें बालवयांत ऍन राणीस प्रथम पाहिलें, त्याबरोबर आश्चर्यभरित होत्साता " रत्नांनीं मढवलेली व काळा झगा घातलेली देवांगना " असे त्यानें उद्गार काढले, तशीच कांहींशी भावना त्यांच्या पत्नीस प्रथम पाहणाऱ्या गरीब मुलाची होत असे. निदान मला तर या डॉक्टराच्या चरित्रांतला हा प्रसंग वाचतांच वरील प्रथमदर्शनाचें स्मरण झालें. परंतु हा विस्मयजनक परिणाम क्षणमात्र मनावर टिके. अत्यंत सौम्य आणि मोहक असें तिचें वर्तन, दुसऱ्याचें आदरातिथ्य करण्याविषयींची आतुरता, आस्था इत्यादि प्रकार पुढें प्रत्ययास येऊन तिच्याबद्दल प्रथमदर्शनीं उत्पन्न होणारा संकोचभाव लवकरच लय पावे, आणि तिची भीति यत्किंचितही वाटेनासें होई. अल्लड आणि प्रेमळ मुलांची प्रीति आणि स्नेह संपादन करण्याची तिची हातोटी कांहीं अप्रतिम होती. नुसत्या ममतेच्या भाषणानेंच इतकें कार्य घडत असे. तिचें सौजन्य आणि

चांगुलपणा यांचा ठसा कोमल मनावर उमटल्याशिवाय राहणें केवळ अशक्य होतें.

धुळ्यांतील विनायकरावांची कारकीर्द वरीच लोकप्रिय झाली, आणि त्यांच्या हातून शिक्षणक्रमांत कांहीं सुधारणा झाल्या. तें ठिकाण सोडतांना त्यांस तेथील प्रमुख लोकांनीं एक मानपत्र दिलें व त्यांचा मोटा सत्कार केला. त्यांच्या वियोगामुळें लोकांस फार दुःख झालें. जेथें जेथें त्यांनीं काम केलें, तेथें तेथें ते असेच लोकप्रिय होत गेले.

त्यांचें वर्तन परक्यास प्रिय वाटण्यासारखें साधारणपणें नव्हतें. किंबहुना पुष्कळांस तें नीरस आणि अनास्थेचें असें वाटण्याचा संभव विशेष होता. खुशामत त्यांस मुळींच आवडत नसे, आणि दुसऱ्याची मनधरणी करण्यांत ते फारसे कुशल होते असें नाहीं. फाजील आदरातिथ्याचा त्यांस तिरस्कार होता. राजेलोकांशीं त्यांचें वर्तन उन्मत्तपणाचें जरी नव्हतें, तरी त्यांत विशेष नम्रभावही दिसून येत नव्हता. आदरयुक्त पण स्वाभिमानास अनुरूप असा वरिष्ठांशीं त्यांचा वर्तनक्रम होता. निस्पृहपणानें आणि मेहनतीनें ते आपलें काम करीत असत, त्यामुळें त्यांचे अंतर्गुण ओळखून कांहीं गुणज्ञ आणि ज्ञाते लोक त्यांस चाहत असत. परंतु वर्तनाचीं लोकप्रिय बाह्यांगें त्यांच्या ठायीं फार कमी, किंबहुना मुळींच नव्हतीं, असें ह्मटलें तरी चालेल. अशा स्थितींत त्यांच्या लोकप्रियतेची मीमांसा करणें सोपें नाहीं. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेंतच तिचें खरें बीज सांपडेल.

सन १८६४ सालीं विनायकरावांची बदली कारवार येथील इंग्रजी शाळेच्या मुख्य अध्यापकाच्या जागीं रु. १५० दरमहावर झाली. तेथें त्यांनीं सुमारें दीड वर्ष काम केलें आणि ती शाळा बरीच सुस्थितीस आणली. त्यांची हुशारी पाहून तेथले कलेक्टर मि. स्टुअर्डसाहेब त्यांस मामलेदारीची असामी देण्यास तयार होते; परंतु त्यांस कारवारची हवा मानवेना, म्हणून त्यांनीं ती पत्करली नाहीं आणि तेथून बदली करून घेण्याच्या खटपटीस ते लागले. मेहेरबान हावर्डसाहेब तेव्हांचे विद्याखात्याचे अधिपति यांस त्याबद्दल त्यांनीं अर्जही केला, परंतु तो मंजूर झाला नाहीं, त्यामुळें त्यांस त्या नौकरीचा फार कंटाळा आला.

या सुमारास होळकर सरकारच्या रियासतीच्या विद्याखात्यावरच्या मुख्य अधिकाऱ्याची जागा रिकामी होऊन ती पत्करण्याबद्दल त्यांच्या एका आप्तामार्फत त्यांस विचारण्यांत आलें. त्यासरसा फारसा विचार न करतां तात्कालिक स्फूर्तीनें आपल्या जागेचा राजीनामा देऊन, ते इंदुरास निघून गेले. हें कळल्यावर त्यांच्या वडिलांस फार वाईट वाटलें आणि खुद्द विनायकरावांसही त्याबद्दल पुढें कांहीं वर्षे पश्चात्ताप होत होता. सुव्यवस्थित इंग्रजी राज्यांतली १५० रुपयांची जागा सोडून तितक्याच होळकरशाही रुपयांची अव्यवस्थित संस्थानांतली चाकरी पत्करणें कोणासही योग्य वाटणार नाहीं; कारवार केव्हां सुटेल असें झाल्यामुळें उतावीळपणानें त्यांच्या हातून ही चूक घडली होती.

ता. १५ माहे सप्टेंबर सन १८६५ रोजीं विनायक-

राव इंदूर संस्थानांतल्या आपल्या नव्या कामावर रुजू झाले. त्यापूर्वीं या संस्थानांत तेथल्या बड्या कामगारांची एक विद्याप्रसारक मंडळी होती, ती विनायकराव काम करूं लागल्यावर मोडली, आणि शिक्षणप्रसाराची सर्व जबाबदारी त्यांच्या एकट्यावरच राहिली. यापूर्वीं संस्थानच्या शाळेचे विद्यार्थी प्रवेशपरीक्षेत धाडण्याचा प्रघात नव्हता. तो विनायकरावांनीं नवीन सुरू केला आणि त्या शाळेस हायस्कूलच्या पायरीस आणलें. सन १८६७ सालीं दोन विद्यार्थी प्रथमच हायस्कुलांतून प्रवेश परीक्षेस पाठविण्यांत आले; परंतु त्यांपैकीं कोणीच पसार झाला नाहीं. दुसऱ्या सालीं दोन मुलें या परीक्षेंत उतरलीं. हें वर्तमान आलें तेव्हां तो दिवस त्या शाळेस मोठ्या विजयोत्सवाचा वाटला. यशस्वी विद्यार्थ्यांचा चोहोंकडे मोठा जयजयकार झाला आणि होळकरमहाराजांस आणि विनायकरावांस मोठी धन्यता वाटली. आपल्या परिश्रमांची सार्थकता झाली, असें विनायकरावांस वाटून त्या वेळीं महाराज दौऱ्यावर बेटमे महालीं होते तेथें हें आनंददायक वर्तमान यजमानांस कळविण्याकरितां ते गेले. हरएक गोष्टीच्या नवीनपणांत अशी मौज असते. सांप्रत ही परीक्षा दरसाल होते व या शाळेंतून अनेक विद्यार्थी पसार होतात, पण त्याचें कोणास कांहीं वाटत नाहीं.

हें काम विनायकरावांनीं पावणेसहा वर्षें केलें. या काळांत या शाळेची स्थिति पुष्कळ सुधारून ती शाळा भरभराटली. आपल्या खाजगी वेळांतही ते आपल्या विद्यार्थ्यांस

शिकवीत असत. उत्तम रीतीनें शिकविण्याबद्दल त्यांचा मोठा लौकिक होता, तो या काळांत विशेष वाढला. शाळेची सुव्यवस्था ठेवण्याच्या कामांतही ते फार पटाईत होते. त्यांचा दरारा शाळेंत फार मोठा होता. हाताखालच्या शिक्षकांसही त्यांचा मोठा धाक वाटत असे. शाळेंत कितीही गलबला किंवा गोंधळ चालला असला, तरी ते शाळेजवळ येत आहेत अशी वर्दी शिपायानें देतांच ताबडतोब जिकडे तिकडे शांतता होत असे. हा चमत्कार मीं पुष्कळ वेळां पाहिला आहे. प्रारंभीं छडीचा उपयोगही प्रसंगविशेषीं ते करीत असत, असें सांगतात. श्रीमंत—गरीब, लहान–मोठा, आवड—नावड, असा पंक्तिभेद या शिक्षाप्रकारांत घडत नसे. दुर्गुणी, सुस्त, बंडखोर अशा मुलांवर हा कडक शिक्षेचा प्रयोग होत असे. एकदां अशाच कडक शिक्षेवरून कांहीं श्रीमान आणि मानकरी लोकांच्या मुलांनीं कट करून त्यांत गरीब मुलांसही ओढलें आणि सर्वांनीं एकदम शाळा सोडली. एक वर्ग अगदीं रिकामा पडला. या प्रसंगीं वरिष्ठ प्रतीच्या लोकांत आणि दरबारी कामगारांत मोठी गडबड उडाली आणि कांहींशी असंतुष्टता उत्पन्न झाली; परंतु चौकशीअंतीं खरा प्रकार जाहिर झाल्यावर आपल्या आडदांड, उद्धट आणि बंडखोर मुलांची कानउघाडणी करून त्यांच्या पालकांनीं त्यांस परत शाळेंत धाडलें. इतकें घडून येण्यास कांहीं दिवस लागले. तोंपर्यंत विनाप्रकराव बिलकूल न डगमगतां स्वस्थ होते. या बड्या दरबारी लोकांच्या मर्जीची त्यांनीं पर्वा बाळ-

गली नाहीं. कोणत्याही विकट प्रसंगीं ते घाबरत नसत.

विनायकरावांच्या अध्यापनकौशल्याचें वर्णन त्यांचे सुप्रसिद्ध शिष्य रा० ब० कृष्णराव मुळे धार संस्थानचे सुपरिंटेंडेंट यांनीं इंग्रजी निबंधांत केलें आहे, तें येथें भाषांतररूपानें दिलें तर अप्रासंगिक वाटणार नाहीं.

" आमच्या विद्यार्थिदशेचें स्मरण झालें म्हणजे एलफिन्स्टन विद्यालयीन विद्वान सर अलेग्झांडर ग्रांट यांचे शिष्य, सर्वोत्तम अशा दोन मराठी नाटकांचे कर्ते, रावबहादुर विनायकराव कीर्तने यांची आठवण होते. जुन्या तोफखान्यांतल्या आपल्या बिऱ्हाडापासून बरोबर दोन शिपाई घेऊन मंदमंद पावलांनीं चालत ते शाळेंत येत असत. त्यांचें उपवस्त्र त्यांच्या गळ्याभोंवतीं माळेप्रमाणें वेष्टिलेलें असे. त्यांचा पोषाख फार साधा आणि संभावित असा असे. बाह्य स्वरूपाकडे त्यांचें मुळींच लक्ष नसे. पोषाखाचा थाट किंवा ऐट त्यांच्यांत अगदीं नव्हती. सर्वतोपरी अंतर्गत स्वरूपाकडे त्यांची दृष्टि होती आणि त्याचीच चहा त्यांच्या ठायीं होती. त्यांनीं एकदां शिकविण्यास आरंभ केला कीं तो विषय तेव्हांच सुगम होत असे. ग्रंथकाराचें हृद्गत पूर्णपणें आणि यथासांग मनांत बिंबवून देण्याची त्यांची हद्द असे, त्यामुळें त्यांचे विद्यार्थी त्यांजवर सुप्रसन्न राहून आपल्या गुरूबद्दल त्यांच्याठायीं पराकाष्ठेचा बहुमान, अभिमान आणि पूज्यभाव सदैव जागृत रहात असे. "

सन १८७१ च्या आगस्ट महिन्यांत सार्वभौम सर-

कारचे इंदुरचे प्रतिनिधि सर हेन्री डेलीसाहेब यांच्या सूचनेवरून विनायकरावांस महाराज होळकर यांनीं युवराजाचे शिक्षक नेमिलें. मेहनतीनें, निस्पृहपणानें आणि जीव लावून त्यांनीं हें काम सुमारें अडीच वर्षे केलें. त्याबद्दल त्यांस १५० रुपये पगार झाला. याशिवाय शाळेची देखरेख करण्याचें कामही त्यांच्याच कडे होतें. त्यांचे राजशिष्य श्री शिवाजीराव होळकर यांची इंग्रजी ज्ञानांत बरीच चांगली गति झाली. त्या संबंधांत प्रसिद्ध धर्मोपदेशक बाबू केशव चंद्रसेन यांनीं त्यांच्या इंग्रजी उच्चाराबद्दल फार तारीफ करून " थोर पित्याचे सुपुत्र " ( Worthy son of a worthy father ) या शब्दांत त्यांच्या पूज्य पित्याविषयीं बहुमानसूचक असा युवराजाचा धन्यवाद केला होता. त्यावेळीं त्यासंबंधाचें श्रेय आपल्या गुरूस मिळावें या हेतूनें युवराज बोलले, " सद्गुरूचे सच्छिष्य " असें म्हणणें अधिक रास्त होईल. यावेळीं त्यांच्या राजशिष्याच्या मनांत आपल्या गुरूबद्दल अत्यंत पूज्यभाव वसत होता यांत संशय नाहीं. याचें कारण विनायकरावांनीं हें काम फार मनोभावानें केलें होतें. परंतु त्याबद्दल अपेक्षित बढती आपल्यास मिळाली नाहीं म्हणून ते फार निराश झाले आणि त्या कामाचा शेवटीं त्यांस कंटाळा आला.

या प्रकरणावर विशेष लिहिण्यास मार्ग नाहीं. इतर गोष्टींप्रमाणेंच या विषयावरही ते आपलीं मतें उघड बोलून दाखवीत नसत. या कामाची योग्यता ते जाणत होते. युवराजाच्या मनास चांगलें वळण लावून त्याच

आपल्या भावी महत्पदास अनुरूप करण्यांत त्यांनीं हयगय केली असेल हें संभवत नाहीं. युवराजही गुणज्ञ नव्हते असें नाहीं. सद्गुणांचें आणि सद्विद्येचें बीजारोपण प्रकृत व्यक्तींत झालें होतें असें दिसतें. हा कार्यभाग करतांना अडथळे आणि अडचणी किती येत असत याचें यथातथ्य वर्णन देणें फार कठीण आहे. या कामीं थोरल्या महाराजांचें पूर्ण पाठबळ नसतें तर तें निस्पृहपणानें पार पाडणें फारच मुष्किल होतें; परंतु राजकीय परिस्थितीवर यथास्थित दाब राहणें परम दुर्घट होतें, त्या कारणानें त्यांच्या मनासारखा हा कार्यभाग पार पडला नाहीं ही गोष्ट त्यांस विषाददायक वाटत असे.

थोरल्या महाराजांचे गुरु मुनशी उमेदसिंग यांस ज्याप्रमाणें जहागीर मिळाली तशी आपल्यास मिळून आपणही या संस्थानचे छोटेसे जहागीरदार होऊं अशीही त्यांस प्रथम आशा होती, पण ती केवळ व्यर्थ आहे अशी खात्री होण्यास फार काळ लागला नाहीं. त्यामुळें शेवटीं त्यांस या कामीं उत्साह राहिला नव्हता.

यावेळीं त्यांचा स्वभाव बराच दिलदार होता. ते आपल्या परिचितांशीं बरेच बोलत असत. त्यांच्या राहत्या घरांत इतर बिऱ्हाडकरी होते, त्यांच्याबरोबर ते भोजनोत्तर कधीं कधीं गंजिफा, सोंगट्या, बुदबळें वगैरे खेळ खेळत असत, आणि वेळेनुसार गप्पाही मारीत बसत असत. परंतु त्यांचा फुरसतीचा बहुतेक वेळ वाचनांत आणि पत्निसमागमांत जात असे. याचवेळीं

ते मुन्सफीच्या परीक्षेचा अभ्यास करीत असत. ती परीक्षा देण्यास एकदां ते मुंबईस गेलेही होते, पण तींत बसले नाहींत. कायद्याच्या पुस्तकांशिवाय त्यांचा वाचनाचा भर शेक्सपियरचीं नाटकें, सर वाल्टर स्कॉटच्या कादंबऱ्या, डिकिन्सच्या कादंबऱ्या, मेकॉलेचे निबंध, गोल्डस्मिथचे ग्रंथ इत्यादिकांवर मुख्यतः असे. या ग्रंथकारांच्या मनांशीं त्यांचें पूर्ण तादात्म्य होत असे. त्यामुळें अशा कृतींशीं सहवास करण्यांत ते तल्लीन होत असत, यांत नवल नाहीं. त्यांच्या ग्रंथांचीं पारायणें त्यांनीं कितीदां केलीं असतील याचा नेम नाहीं. त्या ग्रंथकारांचें इंगित फार मार्मिकपणें आपल्या शिष्यवर्गाच्या मनांत तें उतरून देत असत. या कामीं त्यांचा हातखंडा होता आणि त्यांच्याइतके पटाईत शिक्षक फार थोडे आढळतील.

याकाळीं त्यांच्या मित्रमंडळींत रामजी विठ्ठल, वासुदेव महादाजी, गणेशशास्त्री गोळवलकर, बक्षी खुमानसिंग वगैरे कांहीं थोर कामगार होते. ते त्यांच्या घरीं कधीं कधीं येत असत. हे लोक अनेक कारणांनीं उल्लेख करण्याच्या लायक आणि उदाहरणीय असे होते. इंग्रजी ज्ञानाचा प्रसार होऊं लागल्यावर या लोकांनीं त्या विद्येचा व्यासंग पहिल्या प्रथम केला होता. सरासरी प्रवेशपरीक्षेपर्यंत होणारें इंग्रजी भाषेचें अध्ययन त्यांचें झालें होतें असें दिसे. ते सर्व बहुश्रुत आणि जिज्ञासु होते. हे सर्व मूळ गरीब स्थितींतले पण या संस्थानचीं मोठीं जोखमीचीं, अडचणीचीं आणि जबाबदारीचीं कामें निःपक्षपातानें

आणि चातुर्यानें करून मान्यतेस चढलेले होते. इंग्रजांचा प्रतिनिधी इंदूर येथें होता. त्याच्यापाशीं वजन राखून संस्थानच्या हिताकडे दृष्टि देऊन प्रसंगविशेषीं आपल्या यजमानासही अप्रिय पण सत्य सांगण्यास न भितां त्यांनीं आपला आयुष्यक्रम अनुकरणीय असा केला होता. याचें कारण त्यांचे यजमान राजकार्यनिष्णात, न्यायप्रिय, शांत, बहुश्रुत, धोरणी आणि स्वराज्याभिमानी असे होते. तेव्हां " यथा राजा तथा मंत्री " या न्यायानें त्यांचे मंत्रीही त्यांस अनुरूप होते यांत नवल नाहीं. या लोकांपैकीं गणेशशास्त्री यांचा स्वभाव मोठा विनोदी आणि लोकप्रिय, रामजीचा बाणेदार व वासुदेव महादाजी नाशीम यांचा निस्पृह आणि स्वकार्यदक्ष असा होता. या सर्वांमध्यें इंग्रजीभाषाज्ञानांत विनायकरावांचें वर्चस्व दरबारांत अधिक असे. रेसिडेन्सींत जो बहुतेक इंग्रजी पत्रव्यवहार चाले तो त्यांच्या संमतीनेंच होई.

मध्य हिंदुस्थानचे एजंट सर रिचर्ड मीड विलायतेस जाऊं लागले त्यावेळीं त्यांस मानपत्र दिलें तें विनायकरावांनीं लिहिलें होतें. त्यांतले विचार प्रयाणप्रसंगास अत्यंत अनुरूप आणि फार मार्मिक आहेत. महाराजांचा राणीसरकारास जो निरोप म्हणून प्रतिनिधींच्या द्वारें कळविलेला या मानपत्रांत निर्दिष्ट केलेला आहे, तो मोठा खोल, मजेचा आणि गूढ असा आहे. असा हा निरोप संस्थानिकांच्या वतीनें महाराणीस निवेदन करण्याची विज्ञप्ति प्रतिनिधीस या मानपत्रांत केलेली आहे. एकंदरींत या मानपत्रांत विना-

यकरावांचें लेखनस्वातंत्र्य, विचारसौष्ठव, भाषा-प्रभुत्व आणि कल्पनाशक्ति हीं पूर्णपणें निदर्शनास येतात, असा हा लेख वाचून माझा ग्रह झाला. या मानपत्रास उत्तर देतांना मीडसाहेब म्हणाले "या झोंकदार भाषेत लिहिलेल्या मानपत्रास यथायोग्य उत्तर देण्यास लागणारा शब्दसंग्रह माझ्यापाशीं यावेळीं शिल्लक राहिलेला नाहीं." झोंकदार भाषेच्या ओघानें वाहवत गेलेल्या अंतःकरणाच्या लहरींत त्यांच्या मुखांतून हे असे उद्गार निघाले असावे असा ग्रह हें उत्तर वाचल्यावर झाल्यावांचून राहत नाहीं.

सन १८७३ सालीं सर टी. माधवराव इंदूर संस्थानचे दिवाण होऊन आले, तेव्हां त्यांचा आणि विनायकरावांचा संबंध आणि स्नेह जुळून येण्याचा सुयोग अनायासें जमून आला. माधवरावांस विनायकरावांची योग्यता कळण्यास फार वेळ लागला नाहीं. त्यांस या संस्थानचा कारभार सुव्यवस्थित करावयाचा होता. या ठिकाणीं ते अगदीं नवीन आणि हरएक बाबतींत अजाण असे होते. तेथल्या चांगल्या वाकबगार माणसांच्या मदतीची त्यांस फार जरूर होती. या कामीं विनायकराव माधवरावांच्या फार उपयोगीं पडले. त्यांनीं माधवरावांस त्या संस्थानची सर्व प्रकारची माहिती आणि सल्लामसलत वगैरे इतक्या उत्तम रीतीनें, मोकळ्या मनानें आणि पोक्तपणानें दिली कीं त्यापासून दिवाणाच्या मनावर उत्तम परिणाम होऊन तो आमरणांत कायम राहिला. माधव-

रावांनीं इंदूर संस्थानाची फार उत्तम व्यवस्था केली. न्यायखातें, विद्याखातें, पोलिस, पोस्ट, इत्यादिकांत पुष्कळ सुधारणा केली. या कारकीर्दीत विनायकरावांस सन १८७३ सालीं सदर कोर्टाच्या दुसऱ्या न्यायाधिशाची जागा मिळाली, आणि त्यांस ५०० रुपये पगार झाला. तें काम मेहनतीनें, निःपक्षपातानें आणि निस्पृहपणानें त्यांनीं दोन वर्षे केलें.

याप्रमाणें त्यांचें विद्याखातें सुटलें आणि न्यायखात्यांत त्यांची बदली झाली. त्यांची कर्तृत्वशक्ति, स्वभाव, बुद्धि आणि इतर मानसिक गुण यांस पहिलेंच खातें जास्त अनुरूप होतें; परंतु तें सोडून प्रथम न्यायखात्यांत आणि नंतर राजकीय खात्यांत ते शिरले, त्यामुळें त्यांचा ऐहिक आणि भौतिक उत्कर्ष पुष्कळ झाला खरा; पण त्यांचे अंतर्गत वाङ्मय विषयक गुण नीट रीतीनें विकास पावले नाहींत असें दिसतें. स्विफ्ट नामक विख्यात ग्रंथकारानें म्हटलें आहे "आपली बुद्धि, कर्तृत्वशक्ति, अभिरुचि, कार्यक्षमता व मनाचा कल हीं सर्व नीट ओळखून त्यांची पोंच पाहून त्यांस अनुरूप कार्यभाग करण्यास जो झटतो त्याच्याच हातून उत्तम प्रकारें तो तडीस लागेल, आणि त्यापासून पुष्कळ समाजहित होईल. अशा पुरुषाचा आयुष्यक्रम प्रशंसनीय व अनुकरणीय असा झाल्यावांचून कधीं राहत नाहीं. तसेंच अशा स्थितीच्या विरुद्ध असा आयुष्यक्रम कधींही इतका नांवारूपास येण्याचा संभव नाहीं, हें अप्रतिहत सत्य आहे. त्यास

कालत्रयींही बाध येण्याचा संभव नाहीं." शेक्सपियर राजकारणांत पडता, जानूसन चित्रकार बनता, रेनाल्ड व्यापारी होता, किंवा बर्क गायक बनता, तर त्यांचा कार्यभाग इतका वर्णनीय झाला असता काय ? ज्यानें विसाव्या वर्षी " थोरले माधवराव " व पंचविसाव्या वर्षी " जयपाळ " हीं सर्वमान्य व मराठी भाषेस चिरस्मरणीय व अलंकारभूत अशीं नाटकें रचलीं त्यास शेवटपर्यंत याच दिशेनें अव्याहत परिश्रम करण्याचा योग येता व अवकाश मिळता तर मराठींत शेक्सपियर, कालिदास, दंडी, स्कॉट अशासारख्यांच्या कृतींचा लाभ होऊन ती भाषा समृद्ध, सालंकृत आणि आनंददात्री झाली असती यांत संशय नाहीं. हें विधान प्रस्तुत विषयनायकाच्यासंबंधानें अयथार्थ आहे असें कोणाही विचारी पुरुषास खास ह्मणतां येणार नाहीं. परंतु दुर्दैवानें या दिशेनें सतत परिश्रम करण्यास त्यांस वेळ मिळाला नाहीं. त्यामुळें त्यांच्या स्वाभाविक मानसिक शक्तीचा विकास आणि प्रभाव जसा आणि जितका व्हावा तितका झाला नाहीं, आणि त्यांच्या मनोरूप जमिनींत गुप्त असलेली संपत्ति बाहेर पडली नाहीं. त्यांच्या मनोहर मानसिक गुणांचें चित्र भाषारूप पटावर नीट उमटलें नाहीं. खऱ्या कवीचे गुण त्यांच्यांत निःसंशय वसत होते. त्यांनीं काढलेलीं मनुष्यांचीं अंतर्गत स्वभावाचीं चित्रें थोडींच आहेत; पण तीं अत्यंत हृदयंगम अशीं वठलीं आहेत ही गोष्ट रसिक जनांस मान्य आहे. न्याय खातें व राजकीय खातें यांत त्यांच्या मानसिक शक्तीचा योग्य प्रकाश पडण्यासारखा

नव्हता. तीं खातीं त्यांच्या मानसिक गुणास अनुरूप नव्हतीं. काव्यसृष्टि आणि मानवस्वभावांचें अंतरंग हींच ज्यांना विहार करण्यास योग्य अशा त्यांच्या मानसिक शक्ति होत्या. राजकीय कंटकमय प्रदेशांत संचार करणारांचें कसब, क्षणोक्षणीं अंग चुकविण्याचें कौशल्य, शिताफी, युक्त्या, टापटीप, धोरण, संधान, डावपेंच, इत्यादि प्रयोगांत निष्णात होण्यासारखा त्यांच्या मनाचा कल नव्हता. त्यांच्या अत्युत्तम मानसिक शक्तींचा उत्तम प्रभाव ज्या प्रदेशांत प्रगट होण्यासारखा होता तो सोडून जो प्रांत त्यांस मनापासून आवडत नव्हता, ज्यांत अवश्यक लागणारे कावे, कौशल्य, रंगबदलेपणा इत्यादि सामुग्रीही त्यांजपाशीं पुरेशी नव्हती, त्यांत कार्यभाग करणें त्यांच्या वाट्यास आलें. त्यामुळें ॥ इदं च नास्ति परं च न लभ्यते ॥ असा प्रकार निरुपायानें झाला. चांगलें होणारें काम तर एकीकडे पडलें आणि जें कष्टदायक, अवघड काम हातीं आलें तें जितकें चांगलें व्हावें तितकें झालें नाहीं असें दिसतें. पण तें करण्यांत विनायकरावांनीं आपल्याकडून हयगय किंवा कसर केली असें मात्र समजावयाचें नाहीं. त्यांनीं कायावाचामनेंकरून आपल्याकडून होईल तितक्या प्रकारांनीं तें चागल्या रीतीनें शेवटास नेण्याची शिकस्त केली यांत संशय नाहीं.

विनायकरावांनीं एकंदर तिघा संपन्न सत्ताधीश राजपुरुषांची सेवा केली. हे सर्व राजपुरुष विद्वान, बहुश्रुत आणि ज्ञाते असे होते; तरी त्यांपैकीं एकासही आपल्या सेवकाच्या अंतर्गत खऱ्या गुणांची पारख

झाली नाहीं किंवा ती होऊन त्याचें करावें तसें चाज त्यांनीं केलें नाहीं असें दिसतें. विनायकरावांच्या समागमाचा लाभ झाल्यावर आणि त्यांच्या कृतीचें पर्यालोचन केल्यावर त्यांच्या बुद्धीचा प्रवाह कोणत्या दिशेनें वाहत होता हें कळणें कठीण नव्हतें आणि त्या दिशेनेंच त्यांचें कर्तव्य नेमलें जातें तर त्यांचा कार्यभाग चिरस्मरणीय झाला असता व त्यास उत्तम फळ आलें असतें. पण इतकी दूरवर दृष्टि कोणाची जाऊं नये हें आमच्या देशाच्या दुःस्थितीचें आणि मतिमंदतेचें उत्तम प्रमाण आहे असें वाटतें. पूर्वकाळच्या बऱ्याच सर्वमान्य कवींस आणि ग्रंथकारांस केवळ सरस्वतिसेवेंत त्यांनीं निमग्न राहावें म्हणून राजाश्रय होता ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. परदेशांतही हा प्रकार आढळतो. सध्या संस्थानांत गवयी, वाद्यकार भाट, चारण अशांच्या असाम्या आहेत व त्यांस राजाश्रयही मिळतो, त्याचप्रमाणें एखाद्या सरस्वतिभक्तासही आश्रय देणें व्यर्थ होणार नाहीं. विलायतेंतही पोएट लॅरिएटासारख्या जागा नाहींत असें नाहीं.

दुसऱ्यापक्षीं पाहिलें तर या राजाश्रयाची आशा न धरतां व लोकाश्रयही चांगला नसतां केवळ पुढील काळावर दृष्टी देऊन व आपल्या कर्तृत्वशक्तीवरच पूर्ण भिस्त ठेऊन आपली कृति जगासमोर आणणारेही महात्मे या भूपृष्ठावर आढळतात. पण अशा आयुष्यक्रमास लागणारी निरपेक्षता व निःस्वार्थता फारच दुर्मिळ असते. " बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते, पिपासितैः काव्यरसं न पीयते " हें तत्त्व सामान्य मनुष्यास फार

पडतें. स्वार्थ हा अनादि काळापासून मनुष्यमात्राच्या-मागे एकसारखा हात धुऊन लागलेला आहे. त्याच्या कचाटींतून सुटणें फार कठीण आहे. पण मनास पुरे वाटेल इतकी संपत्ति आपणांस मिळाली आहे असें बहुधा अशा विषम राजमार्गांत संचारणारांना कधींच वाटत नाहीं. द्रव्यार्जन, सत्ताधिकार, ऐहिक विषयभोगेच्छा हीं कोणास पुरेशीं होत नाहींत. या विषयावर बोलतांना चरित्रनायकाच्या ज्येष्ठ चिरंजिवांनीं वरील वस्तुस्थिति कबूल केली; पण त्यांनीं पुढें विनोदानें ह्मटलें "आमच्या पूज्य वडिलांनीं नुसती सरस्वतिसेवाच केली असती तर त्यांचें नांव कदाचित अजरामर झालें असतें; पण मग आह्मांला या गाड्या, घोडे, बागबगीचे, बग्या, वाडे, इत्यादि सुखोपभोगाचीं साधनें कशीं मिळतीं ! त्यांनीं आपल्या खऱ्या स्वार्थाकडे दुर्लक्ष केलें त्यांत आमचा मात्र अर्थ चांगला साधला. ह्मणून या प्रकारालाही परोपकार ह्मणतां येईल आणि या दृष्टीनें त्यांचा आयुष्यमार्ग विहित व वंद्यच कां ह्मणूं नये ?"

वरील विवेचनावरून विनायकराव राजमार्गांत केवळ द्रव्य, सत्ता, वैभव, राज्याधिकार, डामडौल, थाटमाट, आपल्या कुटुंबाची चैन, चंगळ इत्यादि बालिश, पोरकट व ऐहिक गोष्टींच्या प्राप्तीकरितां म्हणून शिरले होते असें मात्र कोणी समजूं नये. वरील गोष्टी त्यांस या मार्गांत प्रवास करतांना अनायासें सहज आणि आपोआप मिळाल्या हें नाकबूल करतां येत नाहीं; पण त्याविषयीं ते केवळ निरिच्छ होते व

जन्म १८७० – [illegible]

– पंधराव्या वर्षी आई वारली –

– [illegible]

विवाह – १८८९ – [illegible]

[illegible]

पुण्यात आले १८८८ – [illegible]

– १८ –

१८८८ – [illegible]

१८८८ [illegible] परीक्षा –

१२० विद्यार्थी — २० पास –

१८८९ [illegible] नाटक

– [illegible]

१८९२ – [illegible]

१८९१-९२ — पहिले नाटक

– [illegible] — (१८)

[illegible]

१८-१९

[illegible]

— २१ — २२

[illegible]

त्यांची त्यांनीं कधीं विशेष पर्वा बाळगिली नाहीं याबद्दल त्यांच्या कारकीर्दीचा रोख ज्यानें निःपक्षपातानें पाहिला असेल त्यास तरी शंका येणार नाहीं. राजकारणांत पडण्यांत त्यांचा हेतु याहून अधिक महत्वाचा होता; त्याबद्दलचा खुलासा त्यांचे सहाध्यायी व बाळमित्र नामदार न्यायमूर्ति **माधवराव रानडे** यांनीं आपल्या एका लेखांत केला आहे. तो त्यांच्याच शब्दांत देणें रास्त आहे. " राजकारणांत जीं माणसें पडतात तीं केवळ पैशाचे लोभानें मोहांत पडतात असें समजणें ह्मणजे विनायकरावासारख्यांची खरी योग्यता न ओळखणें असेंच म्हणावें लागतें." विनायकरावांची कारकीर्द प्रसिद्धीस आली तिचें खरें स्वरूप त्यांच्या थोड्याच मित्रमंडळीस कळलें असें ह्मणावें लागतें. राज्यसुधारणा, धर्मसुधारणा, नीतिसुधारणा इत्यादि गोष्टींकडे त्यांचें लक्ष होतें; परंतु देशाच्या संपत्तीची वृद्धि व्हावी याविषयीं विनायकरावांस जितकी आस्था होती तितकी दुसरे कोणत्याही बाबतींत नव्हती, असें माझे माहितीवरून खात्रीनें सांगता येतें. ही संपत्तीची सुधारणा नवीन तऱ्हेच्या कलाकौशल्याचे वर्धनानें होणार, त्यास दुसरा मार्ग नाहीं व हें वर्धनसामर्थ्य आपल्या देशांतील मोठ्या संस्थानिकांच्या हातून मात्र उदयास येईल, केवळ लोकसमाजाचे मदतीनें ही गोष्ट सिद्धीस जाणार नाहीं म्हणून लोकसमाजास संस्थानिकांच्या उद्योगानें वळण लागलें पाहिजे, इत्यादि त्यांचे सिद्धांत ठाम झाले असून संस्थानांत नौकरी करण्याची

हौसही याचमुळें इंग्रजींतील नौकरीपेक्षां जास्त वाढली. बडोद्यांतील गिरणी, साखरेचा कारखाना, सावकारांची पेढी, देशी भाषेंतून शास्त्रांचें पठण पाठण इत्यादि उत्कृष्ट विषयांस त्यांच्या कारकीर्दींत थोडेंसें कृतीचें रूप आलें. यावरून विनायकरावांचा राजकारणांत शिरण्याचा व संस्थानाची चाकरी करण्याचा किती उन्नत व उदात्त हेतु होता याची कल्पना येईल. या राजकारणांत आपला कार्यभाग करतांना पूर्वोक्त काहीं व्यंगांमुळें त्यांच्या हातून तो चांगलासा तडीस लागला नाहीं ही गोष्ट निराळी. त्यांत ह्मणजे विनायकरावांकडे दोष येतो असें नाहीं. त्यांची कारकीर्द वाईट, निंद्य किंवा अहितकारक झाली असें मुळींच नाहीं. तिची वास्तविक पायरी कोणती लागेल हें पुढें यथास्थळीं विदित करूं.

विनायकराव यांनीं इंदूरच्या सदर कोर्टाच्या न्यायाधिशाचें काम दोन वर्षें केलें. पुढें इंदूर दरबारांत माधवरावांच्या वशिल्यानें त्यांस न्यायखात्याच्या चिटणिसाचें काम मिळालें. हें काम त्यांनीं सहा महिने केलें. त्यावेळीं न्यायखातें, विद्याखातें, पोलीसखातें हीं त्यांच्या देखरेखीखालीं होतीं. त्यांत बरीच सुव्यवस्था झाली. दिवाण आणि महाराज या उभयतांसही विनायकरावांचें काम मान्य झालें व दोघेही खुष झाले. जीं जीं कामें विनायकरावांनीं केलीं त्यांत अपयश फारसें आलें नाहीं. एकंदरींत सर्व कामें त्यांच्या हातून बऱ्याच चांगल्या रीतीनें तडीस लागलीं.

सन १८७५ सालीं माधवराव बडोद्यास दिवाण

होऊन त्यांनीं इंदूर सोडिलें. त्यांची कृपा विनायकरावांवर फार होती. उभयतांचा विशेष संबंध झाल्यावर होळकर महाराजांच्या मनांतून विनायकराव उतरत चालले. या संधींत त्यांच्या कांहीं प्रतिपक्ष्यांनीं महाराजांचें मन त्यांच्याविषयीं अधिक कलुषित करण्यांत आपली पुण्याई खर्चिली. मुळीं या यजमान व सेवकांत पूर्ण ऐक्य असें प्रथमपासूनच नव्हतें. प्रसंगानुसार उभयतांत रुसवा-फुगवी होत असे. परंतु दोघे एकमेकांचे गुणावगुण ओळखून होते. असा योग्य, ज्ञानी, गरीब, विद्वान व एकनिष्ठ सेवक इतक्या थोड्या पगारांत मिळणार नाहीं, हें यजमान जाणत असत. तसेंच अधिक प्राप्तीची आणि सुखाची जागा सेवकासही मिळत नव्हती; परंतु सेवकाचा स्वाभिमान यजमानास आवडत नसे, आणि यजमानास अपेक्षित विनम्र वृत्ति आणि अविरुद्ध आज्ञाधारकत्व हीं सेवकास संमत नव्हतीं. मध्यंतरीं या दोघांत बेबनाव झाला होता. विनायकराव रागानें मुंबईस निघून गेले. परंतु अनन्यगतिक जनाप्रमाणें पुन्हा उभयतांत कांहीं महिने मेळ झाला आणि ते फिरून आपल्या कामावर इंदुरास आले. पुढें त्यांचें बऱ्याच चांगल्या रीतीनें चाललें होतें; पण माधवरावांशीं त्यांचें सख्य झालें तें या स्थितीस बाधक झालें. महाराज आपली नीट कदर करीत नाहींत असें जाणून विनायकरावांनीं माधवरावांच्या द्वारें आपली बदली करून घेतली. पुढें उभयतांत चांगला स्नेह जमून आला. विनायकरावांसारखा साथी राज्यकारभारांत असणें अवश्य आहे, असा माधवरावांचा ग्रह

झाला. बडोद्यास पोंचून आठ दिवसांनींच " ताबड-तोब येथें निघून यावें " अशी त्यांनीं विनायकरावांस तार केली.

याच प्रसंगीं विनायकरावांचे वडील ६० वर्षांच्या वयांत वारले. त्यामुळें आपल्या पुत्राचा पुढें झालेला भाग्योदय व नांवलौकिक हीं त्यांस पहावयास सांपडलीं नाहींत. तीं पाहण्याचें त्यांचे नशिबीं नव्हतें. आपला भाग्योदय पित्याचे दृष्टीस पडल्यानें प्राप्त होणारें समाधान आणि धन्यता हीं विनायकरावांसही लाभलीं नाहींत. " बापसे बेटा सवाई " किंवा " पुत्रादिच्छेत्पराभवम् " हा प्रकार पाहून कोणत्या वत्सल पित्यास आनंद होणार नाहीं ? तसेंच पित्याचे अभिमानास कारण होणाऱ्या कोणत्या पुत्रास धन्यता वाटणार नाहीं ? पण अव्यंग असें या जगांत काय आहे ? " तत्किं नाम निरंकुशेन विधिना यन्निर्मितम् सुस्थितम् " ही भर्तृहरीची उक्ति वस्तुस्थितीशीं किती तरी जुळते ! सुखोपभोगाच्या आशेनें जगांत राहणारांची अशीच निराशा होत; असें जीवित निष्फळ आहे. ऐहिक कर्तव्य आणि परमार्थ यांवरच त्याची मदार पाहिजे, हा मर्मज्ञांचा सिद्धांतच अखेर खरा ठरतो.

पूर्वोक्त तार येतांच विनायकरावांनीं इंदूरची नोकरी सोडली. महाराजांसही ते हवे होते, असा प्रकार नव्हता; त्यामुळें त्यांनीं त्यांस आडकाठी आणली नाहीं. उभयतांची शेवटली भेट समाधानकारक झाली नाहीं. त्याबद्दल विनायकराव ह्मणाले—" महाराज मजशीं मोजकें एकच औपचारिक वाक्य

बोलले,आणि त्यांचे जवळ बसलेले आमचे हितकर्ते रा॰ —यांच्या तोंडून मर्मभेदक पुष्परूप असें दुसरें एक वाक्य बाहेर पडलें. पुढें हुजऱ्यानें दोन सुपाऱ्या आम्हांस आणून दिल्या. याप्रमाणें आज आमची यथासांग पूजा झाली. " असा थोर पुरुष जातेवेळीं शिष्टाचारविरुद्ध असें वर्तन उपहासास मात्र कारण होईल, अशी पोक्त मसलत मिळाल्यावर महाराजांनीं इंदूर सोडतांना विनायकरावांस चांगला पोषाख दिला आणि त्यांच्या वियोगाबद्दल दिलगिरी दाखविली. या महाराजांची कर्तृत्वशक्ति, शहाणपणा, देशाभिमान, बाणेदारपणा इत्यादिकांबद्दल विनायकरावांचा ग्रह शेवटपर्यंत चांगला होता. सार्वभौम सरकाराशीं मित्रभाव राखून पुन्हा स्वराज्यहितास धक्का बसूं न देण्याची त्यांची शिताफी व परराज्यविषयक राज्यनीति ( Foreign Policy ) हीं अत्यंत अनुकरणीय होतीं; पण अंतस्थ राजनीति ( Internal Policy ) तितकी प्रशंसनीय नव्हती, असें विनायकराव ह्मणत असत.

होळकरशाहीशीं त्यांचा १० वर्षे संबंध राहिला आणि ते लोकप्रिय झाले होते. जातांना त्यांस दोन मानपत्रें मिळालीं, आणि एक सोन्याचें घड्याळ व एक हिऱ्याची आंगठी हीं त्यांस लोकसमाजानें नजर केलीं. इंग्रजी मानपत्र कै॰ रावजी वासुदेव टुंकू एम. ए. एल. एल. बी., विद्याखात्याचे मुख्य, यांनीं वाचलें आणि मराठी मानपत्र प्रसिद्ध वकील आणि मराठी ग्रंथकार रा॰ बाळकृष्ण मल्हार हंस यांनीं वाचलें.

होतेंतही विनायकरावांची गाढ विद्वत्ता, न्यायप्रियता, सुस्वभाव इत्यादि गुणांचें वर्णन आणि त्यांच्या वियोगाबद्दल दुःख यांचें योग्य प्रदर्शन केलें होतें. त्यांस उत्तर म्हणून विनायकरावांनीं एक इंग्रजी लेख वाचला, तो थोड्या अवकाशांत पेनसिलीनें लिहिला होता. तो वाचतांच त्या सभेंत बरेच किताबवाले आले होते त्यांनीं माना डोलविल्या. "गाढ विद्वान" "गहन विचारी" ( Mature scholar, Deep thinker ) असे उद्गार त्यांच्या तोंडावाटे निसर्गतः बाहेर पडले. या निबंधांतलें एक वाक्य फार मजेदार वाटतें म्हणून तें येथें देतों "Wherever there is a temple of Maruti, why ought it not to have a temple of Sarasvati ?" विद्याप्रसार पुष्कळ होऊन प्रत्येक गांवीं शाळा स्थापली पाहिजे हा अर्थ वरील वाक्यांत मजेदार रीतीनें व्यक्त केला आहे, आणि ही कविकल्पना आहे असें मर्मज्ञांस वाटेल असें मला वाटतें.

इंदूर सोडण्याच्या थोडे दिवसांपूर्वी युवराजांनीं विनायकरावांच्या घरीं रात्रीं एकटे येऊन त्यांची भेट घेतली आणि आपली गुरुभक्ति प्रगट केली. या प्रसंगीं उभयतांच्या भाषणांत औपचारिक प्रकारांहून विशेष कांहीं बाहेर प्रगट झालें नाहीं. "थोरल्या महाराजांनीं आपली कदर जाणली नाहीं, त्यामुळें आपण दुसऱ्या संस्थानांत जात आहां याबद्दल मला वाईट वाटतें; पण सध्यांच्या स्थितींत मला हें न्यून भरून काढण्याचें सामर्थ्य नाहीं हें आपणास विदितच आहे," या आशयाचें युवराजांनीं भाषण केलें. "मी यद्यपि दुसरीं-

कडे सध्यां जात आहे तरी हुजूर फर्मावतील त्या क्षणीं मी हजर होईन. मी आपल्याच सेवेंत आहे असें आपण समजलें पाहिजे. " असें विनायकरावांनीं उत्तर दिलें. याहून जास्त असें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. घरीं सुतक होतें, म्हणून पानसुपारी, अत्तर गुलाब वगैरे शिष्टाचाराचे प्रकार घडले नाहींत. पण या शिष्ट रीतीच्या उल्लंघनाचें कारण मात्र विनायकरावांनीं युवराजास श्रुत केलें. नंतर या भेटीचा शेवट झाला आणि युवराज निघून गेले.

सन १८७५ सालीं विनायकरावांस बडोदें येथें नायब दिवाणाची जागा मिळून त्यांस ७५० रुपये पगार झाला आणि तो लवकरच १५०० रुपयेपर्यंत चढला. न्यायखातें, विद्याखातें, पोलीस, तुरुंग, म्युनिसिपालिटी आणि खासगी या सर्व खात्यांची देखरेख आणि व्यवस्था त्यांच्या हातीं होती. त्या सर्वांची रचना शेवटचें ( खाजगीखातें ) खेरीज करून इंग्रजी राज्यपद्धतीच्या नमुन्यावरच केलेली होती. या सर्व खात्यांची देखरेख त्यांनीं चांगली केली आणि त्यांत बऱ्याच सुधारणा केल्या. विशेषतः खासगीखात्याचें काम फार नाजुक होतें. राजघराण्यांतल्या स्त्रिया आणि पुरुष यांचा त्यांत संबंध येत असे. त्यांचें आपआपसांत अत्यंत वैमनस्य असून एका पक्षाशीं विशेष स्नेह जडला कीं दुसऱ्यास वैषम्य वाटावयाचें, अशी स्थिति होती. तेव्हां हें काम वहिवाटणें बिकट होतें; परंतु विनायकरावांच्या हातून तें बऱ्याच प्रकारानें निभावलें. राजकुलोत्पन्न स्त्रियांच्या मनांत विनायकरावांबद्दल मोठा आदर वसत

होता. सन १८८३ सालीं ते आजारी असतांना बहुतेक पोक्त आणि वयोवृद्ध राजस्त्रिया त्यांच्या समाचारास येत असत आणि त्यांच्याशीं निष्कपटानें सुखदुःखाच्या गोष्टी करून त्यांचा दुःखभार हलका करण्यास झटत असत असें मीं पाहिलें आहे. विनायकरावांची वृत्ति लक्षांत आणली तर वरील प्रकार बराच विसंवादकारक वाटेल. त्यांचा निबोल्या स्वभाव, संकोचवृत्ति, दरबारी फाजील शिष्टाचारांत कमतरपणा, वगैरे गोष्टी मनांत आणिल्या तर आर्जवी आणि हलक्या लोकांनीं परिवेष्टित अशा स्त्रियांच्या ठायीं त्यांच्याविषयीं इतका पूज्यभाव वसावा हा मोठाच चमत्कार आहे. हें केवळ सुदैवाचें फळ होय असें ह्मणावें लागतें.

बडोद्यास गेल्यावर विनायकरावांच्या स्वभावांत मोठा बदल झाला. त्यांचा पूर्वीचा उल्हास, दिलदारपणा व मनाचा मोकळेपणा हे गुण आतां नाहींसे होऊन त्यांच्या जागीं मुग्धता, गंभीरपणा, चिंताग्रस्तता, गहनविचारमग्नता हे गुण प्रकट होऊं लागले. घरच्या माणसांशीं बोलणें आतां बहुतेक बंद पडल्यासारखें झालें. सदोदित वाचन किंवा विचार यांत ते निमग्न राहत असत. एव्हांपासून त्यांस रात्रीं झोप येईनाशी झाली. उत्तर रात्रीं तीन वाजल्यावर त्यांस गुंगी येत असे आणि ती आठ वाजेपर्यंत राही. अहोरात्र वाचन किंवा सरकारी काम याशिवाय त्यांस दुसरें कांहीं सुचत नसे.

बडोद्याच्या नवीन राज्यव्यवस्थेंत बहुतेक उदार शिक्षण मिळालेले आणि इतर सुशिक्षित लोक

होते. बहुतेक मोठमोठ्या जाग्यांवर असेच लोक होते. पुष्कळांशीं ही नवीन व्यवस्था इंग्रजी राज्याच्या नमुन्यावरच बसविलेली होती. माधवराव आजकाळच्या नवीन "साडेतीन" शहाण्यांतले एक होते. त्यांनीं यापूर्वीं दोन मोठ्या संस्थानांची सुव्यवस्था लावून सार्वभौम सरकारांतून पदव्या व मान आणि लोकांकडन वाहवा मिळविली होती. हिंदुस्थानांतल्या राजकारणी एतद्देशीय पुरुषांत ते प्रमुख होते. इतर बरेच कामगारही इंग्रजी राज्यांत मोठमोठीं कामें केलेले असे होते. अशांचा कारभार लोकांस सुखावह होण्याचा संभव होता आणि सर्वांशीं नाहीं तरी पुष्कळांशीं तो यशस्वी झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि मानवी स्वभावाचा प्रभाव सर्वत्र एकसारखाच गाजतो. या कारकीर्दीची चांगली बाजू या संस्थानच्या त्यावेळच्या वार्षिक रिपोर्टांत पाहण्यास मिळते; पण वरवर पाहणारास देखील तिचा एकदेशीयपणा कळतो. त्यांत बहुतेक कामगारांची प्रशंसा, न्याय, नीतिमत्ता, राजकार्यदक्षता, दूरदर्शित्व इत्यादिकांचा निर्देश आहे. त्यांत वैगुण्याचा भाग बहुतेक नाहीं ह्मटलें तरी चालेल. पण अशी वस्तुस्थिति असणें शक्य नाहीं; कांहीं कामगारांचें वर्तन त्यांच्या शिक्षणास शोभेसें नव्हतें व कांहीं अव्यवस्थित कामगारांस राजीनामा देणें भाग पडलें. संस्थानच्या कामांत न सोसे इतका स्वातंत्र्यास धक्का बसतो असें पाहून कांहीं तेजस्वी पुरुषांनीं चाकरीवर पाणी सोडलें. अशी स्थिति या कारकीर्दींत घडली. या कारभाराची दुसरी बाजू "बडो-

याचा दुःखाक्रोश" (Groans of Baroda) नामक इंग्रजी पुस्तक सन १८८० साली बाहेर पडलें, त्यांत आणि सन १८८२त बाहेर पडलेलें " जें कांहीं सगळें चकाकित दिसे तें सर्व सोनें नसे " या मराठी पुस्तकांत दिलेली आहे. त्यांतला अतिशयोक्तीचा भाग जरी गाळला तरी ती केवळ निराधार आहे असें वाटत नाहीं; विशेषतः दुसऱ्या पुस्तकांत ही बाजू सप्रमाण मांडलेली आहे. त्यांतल्या विधानांचें खंडणही कोणीं केलेलें प्रसिद्ध नाहीं; त्यामुळें त्यांत सत्यांश कांहीं असावा असा ग्रह होतो. हा प्रकार पाहिला ह्मणजे कांहीं उच्छृंखल कामगारांवर दरबारचा असावा तितका दाब नव्हता, त्यांच्या स्वेच्छ कृत्यांबद्दल त्यांची योग्य कानउघाडणी झाली नाहीं, मग त्यांस अवरोध किंवा शासन वर.दूरच, हें उघड दिसतें. याशिवाय या कारकीर्दींत राज्याच्या हक्कांचें रक्षण बरोबर झालें नाहीं, असेंही लोकमत आहे. आतां अशी स्थिति असणें स्वाभाविक आहे, आणि ती थोडयाबहुत प्रमाणानें सर्वत्र आहे. याबद्दल याच कारकीर्दीस नांव ठेवणें न्याय्य होणार नाहीं. प्रतिनिधिपद कायम राखून जितकें संस्थानचें हित साधण्यासारखें होतें तितकें साधण्यांत माधवरावांनीं कसर केली, असें निःपक्षपाती पुरुषास ह्मणतां येणार नाहीं. स्वस्थानभ्रष्ट होण्याइतकें वेडगळ स्वातंत्र्य त्यांनीं दाखविलें नाहीं, याबद्दल विचारी मनुष्य त्यांस दोष देणार नाहीं.

या कारभारांत विनायकराव माधवरावांचा उजवा हात होते असें ह्मटलें तरी चालेल. बहुतेक शेवटपर्यंत

दोघांचें एकमत राहिलें आणि राज्यव्यवस्थेस त्यापासून पुष्कळ साह्य झालें. विनायकराव आपलीं सर्व कामें मेहनतीनें आणि जीव लावून करीत यामुळें त्यास अत्यंत यातायात पडे. त्यांचें मन सरकारी कामांत वाहिलें असे. त्यापुढें त्यांनीं आपल्या जिवाकडे देखील पाहिलें नाहीं. शारीरिक व्यायाम करणें त्यांनीं आतां मुळींच सोडलें. दिवसभर मानसिक श्रम आणि शरीराची पूर्ण अनास्था, तेव्हां मेंदूस रक्ताचा पुरवठा कितीसा होणार ! आणि अशा स्थितींत शरीर तरी किती दिवस टिकणार ! आमच्या नवीन विद्वानांची बहुतेक हीच दशा होते.

वरील दोन पुस्तकांत विनायकरावांवर वरीच्च चरचरीत टीका केली आहे. पहिल्यांत "धनसंचय" करण्याचा म्हणजे संदिग्धपणें लांच खाण्याचा त्यांच्यावर आरोप केला आहे; पण त्यास कांहीं आधार नाहीं. त्यांच्या नांवावर त्यांच्या हलक्या नोकरचाकरांनीं कोणाकडून कांहीं उकळलें नसेल असें मी म्हणत नाहीं. ही गोष्ट संभवनीय आहे; पण स्वतः ते या कामांत पडले असावे असें त्यांची खरी स्थिति जाणणारा कोणीही म्हणेल असें वाटत नाहीं. ही गोष्ट त्यांच्या स्वभावाशीं फारच विसंगत दिसते. "अधिकारप्राप्तीनंतर मनुष्याचा खरा स्वभाव प्रगट होतो" या इंग्रजी म्हणीप्रमाणें त्याचे गुणदोष दोन्हीही या अधिकारसंपन्न स्थितींत प्रगट झाले; पण त्यांत "लाचलुचपत" हा घोर दोष खास नव्हता. त्यांचा पगार मोठा होता, आणि त्या मानानें खर्च बराच कमी होता. अशी

स्थितींत जितका धनसंचय झाला पाहिजे तितकाच मात्र त्यांच्यांपाशीं होता, अधिक नव्हता.

या मुद्यावर विचार करतांना विनायकरावांचा स्वभावही ध्यानांत आणला पाहिजे. पंजाबचा सिंह महाराज रणजितसिंग राज्य करीत होता, तेव्हां त्याच्या दरबारचा नवीन इंग्रजी रेसिडेंट सर चार्लस मेटकाफ यांनीं त्याच्या वकिलास विचारिलें ' कायहो, तुमच्या महाराजांचा एक डोळा गेला आहे आणि त्यांच्या चेहेऱ्यावर देवीचे मोठे मोठे वण पडले आहेत असें म्हणतात तें खरें आहे काय ? तेव्हां त्या चतुर वकिलानें उत्तर दिलें ' मीही असेंच ऐकतों. मी त्यांच्याजवळ पुष्कळ वर्षें आहे; पण असें असूनही त्यांच्या तोंडाकडे निर्धास्तपणें बघण्याची माझी छाती होत नाहीं. त्यामुळें खरा प्रकार काय आहे हें मी काय सांगूं ? त्यांच्या मुखाकडे निःशंकपणें पाहील असा पुरुष त्यांच्या दरबारांत एकही दिसत नाहीं, असें त्यांचें तेज आहे.' यावरून रणजितसिंगाचा दरारा कसा होता याचें अनुमान होतें. विनायकराव फार रूक्ष आहेत असें वाटे, आणि परिचयानंतरही त्यांचा ठावठिकाणा लागत नसे. त्यांजपाशीं जाऊन नुसतें शिरस्त्याच्या कामापुरतें बोलणेंही लोकांस कठीण वाटत असे; मग लाचलुचपतीबद्दल ब्र काढणें तर दूरच ! विनायकरावांचा स्वभाव फार पापभीरु होता. अशा धाडसाच्या कामास लागणारा मनाचा निगरगट्टपणा त्यांच्याठायीं नव्हता. पैशाबद्दल जरी ते केवळ उदासीन नव्हते, तरी लालचीही नव्हते.

तसे ते असते तर त्यांनीं बडोद्यांतली १६५० रुपये महिन्याची आणि इंदूरची २००० रुपयांची अशा दोन चाकऱ्या खुषीनें कधींच सोडल्या नसत्या.

त्यांनीं आपले स्नेहीसंबंधी जनांस वशिल्यानें चाकऱ्या देवविल्या, असा दुसरा आरोप पूर्वोक्त दुसऱ्या टीकाविषयक निबंधांत निर्दिष्ट केला आहे; त्यांतही याचप्रमाणें फारसा अर्थ नाहीं. अगोदर, चाकर झालेले असे लोक आपल्या कामास अयोग्य होते असें लेखकानें स्पष्ट म्हटलें नाहीं. त्यामुळे या आरोपांतला बराच दोष उडून जातो. दुसरी गोष्ट, या वर्गांतल्या बहुतेक सर्व लोकांस खुद्द माधवराव ओळखीत होते; आणि त्यांनींच त्यांस कामावर नेमलें होतें. रिकाम्या पडलेल्या जागा कोणा तरी योग्य मनुष्यास दिल्या पाहिजेत. विनायकरावांचे दोघे चुलत बंधु गायकवाडींत मोठ्या कामावर होते, हें खरें आहे; पण त्यांपैकीं एकजण तर ते बडोद्यास येण्यापूर्वींच त्या संस्थानांत आले होते. दुसरे गृहस्थ बी. ए. एल. एल. बी. असून त्यांस तेथें ज्या पगाराची जागा होती तितकी अन्यत्रही सहज मिळाली असती. ते आपल्या कामास पूर्ण योग्य असून लोकप्रियही होते. विनायकरावांनीं बडोदें सोडल्यावर खुद्द महाराजांनीं त्यांस अधिक महत्वाची आणि पगाराची जागा दिली होती. अशा योग्य मनुष्याची शिफारस करण्याबद्दल विनायकराव उलटे प्रशंसेस पात्र आहेत, असें विचारी माणसास कबूल करावें लागेल.

आतां दुसऱ्या पक्षीं विनायकरावांचे स्वकीयजन

म्हणतात कीं त्यांस एवढी मोठी जागा आणि सत्ता असून त्यांच्या हातून त्यांच्या संबंधी जनांचें कांहींच कल्याण झालें नाहीं. वास्तविक पाहिलें तर विनायकरावांचें अंतःकरण जरी निष्ठुर नव्हतें, आणि आपल्या परिवाराशीं आणि मुलांमाणसांशीं ते फार ममतेनें वागत असत, तरी एकंदर मनुष्यमात्राविषयीं नेपोलियन बोनापार्टप्रमाणें त्यांच्याठायीं तिटकाराच वसत असे असें वाटतें. या जगांतल्या व्यवहाराचा ज्यास पुष्कळ अनुभव झाला असेल त्याचें असें मत होणें साहजिक आहे, यांत नवल नाहीं. तसें न झालें तर मात्र नवल खरें ! त्याचप्रमाणें संपन्न सत्ताधिकाऱ्यांमागें याचक आणि अर्जदार यांची दाटी असावयाचीच. सर्वांस तृप्त करणारा दाता कोठेंच मिळावयाचा नाहीं. विन्मुख जाणारांची संख्या नेहमीं अधिकच असावयाची. एक जागा रिकामी पडली कीं तिच्यावर शंभरांचा डोळा असावयाचा. जो तो आपणांस सर्वांहून अधिक योग्य लेखणार. एकास जागा मिळाली कीं ९९ चुरमुरे खात बसणार; आणि दात्याच्या नांवानें खडे फोडणार ! चवदाव्या लुईनें म्हटलें आहे " जेव्हां जेव्हां एकादी रिकामी जागा भरली, तेव्हां तेव्हां ९९ अर्जदार हताश आणि असंतुष्ट झाल्यावांचून राहिले नाहींत, आणि जागेवर नेमलेला शंभरावा अर्जदार कृतघ्न झाला, असा माझा अनुभव आहे " ! ! आमच्या लोकांत परावलंबनाचा प्रकार फार. कोणी जरा मोठा झाला कीं त्याच्याकडे सर्वांचे डोळे लागलेले; सर्वांच्या आधीं माझा हक्क आहे, माझें काम आधीं झालें पाहिजे असें प्रत्येकास वाटतें. सर्वांच्या

आशा सफळ होणें दुरापास्त आहे. मोठ्या कामगारालाही देखील फारच थोड्या अर्जांचा आदर करतां येईल. पुष्कळांच्या अपेक्षा निष्फळ होणारच. अशा स्थितींत वरच्यासारखा आरोप टळणें अपरिहार्य आहे. तो बहुतेक सर्व सत्ताधिशांच्या माथीं ठेवलेलाच असतो. त्याबद्दल विनायकरावांकडेसच मोठासा दोष येतो असें नाहीं. आतां अर्जदारांच्या दृष्टीनविचार केला, तर त्यांचाही मोठासा दोष आहे, असें नाहीं. त्यांस कोठें तरी आश्रय पाहिजे असतो. तो अगदीं परक्या ठिकाणीं मिळण्यापेक्षां परिचितांपाशीं मिळणें अधिक शक्य आहे, हा त्यांचा समज कांहीं खोटा नाहीं; आणि त्याच्याकडे डोळे लावले किंवा त्यांचीं कांस धरली, तर त्यांत त्याच्याकडे दोष येतो असें नाहीं. आतां आपलें इष्टकार्य सफळ झालें नाहीं, म्हणून त्यानें हाकाटी करणें मात्र मूर्खपणाचें आहे. अर्जदार आणि याचक यांची बहुतेक सारखीच दशा आहे. भिक्षा मिळाली नाहीं, तर भिकाऱ्यानें मालकास अपशब्द बोलणें निंद्य आहे, त्याचप्रमाणें अर्जदारानें जागा न मिळाली म्हणून देणारावर रागावणें हें न्याय्य नाहीं. स्वकीयांस आणि आप्तांस कितपत आश्रय द्यावा हा प्रश्न थोडा बिकट व विचारणीय आहे. व त्याचा योग्य निकाल लागणें कठीणच आहे. चांगल्या आप्तांस मदत करणें चांगलें आणि वाइटांस करणें वेडेपण आहे, या तत्त्वावर चालणें बरें दिसतें. उद्योगी आणि सदाचारी स्वकीयास अभिनाधि कलहांत हात देणें कोणास श्रेयस्कर वाटणार नाहीं ! प्रसंगविशेषीं लोकदृष्टीनें त्यांस

दोष आला तरी तो पत्करण्यास पुष्कळ सुज्ञ तयार होतील यांत संशय नाहीं. निरुद्योगी, टवाळ, उनाड आणि दुर्वृत्त अशा आप्तांस मात्र आश्रय मिळणें इष्ट नाहीं. त्यामुळें दुर्गुणांची वृद्धि आणि दुर्वर्तनाचें प्राबल्य मात्र होणार. विनायकरावांच्या हातून या प्रश्नाचा विचार झाला नाहीं, ही शोचनीय गोष्ट आहे. जीवनार्थ कलहांत त्यांनीं स्वकीयांच्या याचनेकडे विशेष लक्ष दिलें नाहीं हें खरें; पण त्याबद्दल ते दोषास पात्र आहेत असें मला वाटत नाहीं. स्वकीयांस सरकारी कामांत घेणें नाजुक काम असतें. त्यांच्याशीं निःपक्षपातानें वागणें एक तर कठीण असतें; दुसरें, त्यांच्या अकार्यास योग्य शासन करणें लोकांतही लांछनास्पदच. याप्रमाणें एकीकडे आड आणि एकीकडे विहीर अशी स्थिति होते. तेव्हां या कामापासून मुळीं दूर रहाणें एकंदरींत चांगलें असें मानतां येईल; पण निरुद्योग्यास आश्रय देणें मात्र दोषास्पद आहे. हा प्रकार त्यांच्या संबंधांत झाला, हें नाकबूल करतां येत नाहीं आणि त्याचा प्रतीकार न केल्याबद्दल त्यांच्याकडे दुर्लक्ष्याचा दोष येतो. त्यांच्या पत्नीच्या सर्वभूतानुकंपेमुळें थोडासा वशीला असला किंवा कांहीं बादरायणसंबंध लागला कीं त्यांचे घरीं पंक्तीबारगीर बनण्यास फारशी आडकाठी नसे. त्यामुळें निरुद्योगी, आळशी वगैरे लोकांचा भरणा त्यांच्या येथें बराच असे. आळसामागें दुर्गुण, स्वेच्छाचार, आर्जव, लबाडी इत्यादि प्रकार आपोआप येतातच. एक दोघा स्वकीयांस नोकऱ्या दिल्यावर त्यांच्या दुर्वर्तनामुळें विनायक-

रावास पश्चात्ताप झाल्यावरून त्यांनीं या कामांत पुन्हां ह्मणून मन घातलें नाहीं. प्रत्येकानें स्वावलंबी आणि कर्तृत्ववान् व्हावें ही त्यांस फार इच्छा असे. आप्तपणाचा फाजील फायदा कोणीं घेऊं नये ह्मणून ते फार यत्न करीत असत. वशिल्याचा त्यांस पराकाष्ठेचा तिरस्कार असे. शिफारशीस ते कधींच मानीत नसत. तथापि त्यांच्या पदरचा फाजील आश्रितांचा घोळ त्यांस दूर करतां आला नाहीं. अपात्रीं दान न जाण्या-बद्दल ते झटत असत; तरी त्यांच्या बऱ्याच द्रव्याचा व्यय अपात्रींच झाला. स्वावलंबनावर त्यांची फार भक्ति असे, तरी कोणास विन्मुख जाऊं देणें त्यांच्या जिवावर येई. एकदां एका इंग्रजी जाणणाऱ्या बंगाली बाबूस चार आणे देऊन " तुमच्यासारख्या तरुण आणि सशक्त लोकांनीं याचना करणें अयोग्य आहे; त्यापेक्षां शिपायाची चाकरी किंवा तीही न मिळाली तर मजुरी करणें हजार वाटयांनीं बरें " असें त्यांनीं ह्मटलें. याप्रमाणें आमच्या चरित्रनायकावर आलेल्या लेखी आणि तोंडी दोषाचा उलगडा झाला. आतां मुख्य कथानका-कडे वळतों.

सन १८७७ सालीं महाराणीसरकारांनीं बाद-शाहीण ही पदवी धारण केली, त्याप्रीत्यर्थ झालेल्या दिल्ली दरबारास विनायकराव गेले होते. तेथें त्यांस " रावबहादुर " हा किताब आणि एक चांदीचें पदक सार्वभौम सरकाराकडून मिळालें. तें पदक दर-बारच्या प्रसंगीं अंगरख्याबाहेर छातीवर ते कधीं कधीं लावीत असत; पण त्याचें महत्व त्यांस फारसें

वाटत नसे. किताबाची वगैरे थोरवी त्यांच्यापाशीं नव्हती. त्यांनीं हा किताब आपल्या लेखांत छापण्याची लालसा दाखविली नाहीं. त्यांचे नाटकाची द्वितीयावृत्ति छापली त्यावेळीं त्यांस असलेलें महत्पदही त्यांनीं आपल्या नांवाखालीं दाखल केलें नाहीं! यावरून त्यांच्या साधेपणाची कल्पना होते. त्याचप्रमाणें "राव" हें पद त्यांनीं आपल्या नांवापुढें लावलें नाहीं.

विनायकरावांच्या कित्येक निरिच्छ, निरपेक्ष, संपन्न अशा स्वकीयांस देखील त्यांस हें महत्पद प्राप्त झाल्यामुळें ते संसर्गार्ह आहेत असें वाटून त्यांनीं या वेळेपासून त्यांच्याशीं पत्रव्यवहार ठेवण्यास सुरवात केली. त्यापूर्वीं स्वकीयपणाचा संबंध त्यांस महत्वाचा व आदरार्ह वाटला नाहीं. वैभवप्राप्तीनंतरच त्यांच्या प्रेमास असें भरतें आलें!! शेंपन्नास रुपयांची प्राप्ति असणाऱ्या आप्तापेक्षां हजार दोन हजार प्राप्तीच्या व्यक्तीचा स्वकीयपणा याप्रमाणें जगास अधिक इष्ट व आदरार्ह वाटतो हा लक्ष्मीचा अतुल प्रभाव आहे! विनायकरावांनीं या वर्गातल्या स्वकीयांच्या पत्रांस उत्तरें धाडण्याची अर्थात तसदी घेतली नाहीं, याबद्दल सुज्ञ जन त्यांस दोष देणार नाहींत. परंतु त्यांच्या कांहीं आप्तांस त्यामुळें फार वाईट वाटून त्यांच्यांत असंतोष उत्पन्न झाला हें सांगणें जरूर आहे. कित्येकांस त्यांच्याठायीं उन्मत्तपणाचा देखील भास झाला आणि त्याप्रमाणें त्यांनीं बोलूनही दाखविलें.

बडोद्यास त्यांचा उत्कर्ष त्यांच्या अपेक्षेहून अधिक झाला असें त्यांनीं स्वतः देखील उद्गार काढले होते.

ते इंग्रजीत ह्मणाले "I wonder at my fortune." त्यांचें राहण्याचें स्थळ विश्रामबाग अत्यंत मनोहर होतें. सभोंवतीं रम्य बाग, त्यांत एक सुंदर जलमंदिर, बंगल्याच्या चोहों बाजूंस पोलिसचे खडे पहारे, बसावयास उत्तम दोन घोड्यांची गाडी, बरोबर चार पांच स्वार, सेवेंत चार हुजरे, दिवाणांची बहाल मर्जी, इतर कामगारांत मोठें वजन, हाताखालच्यांवर दरारा इत्यादि सर्व प्रकार त्यांस अनुकूल होते. सरकारी कामास त्यांनीं तन व मन हीं सर्वथैव अर्पण केलीं होतीं. जेवणाकरितां मात्र ते घटकाभर घरांत येत असत. अशा स्थितींत त्यांच्या हातून काम चांगलें तडीस लागलें यांत नवल नाहीं. कांहीं दिवस तर त्यांनीं त्याकरितां वर्तमानपत्रें वाचणें देखील टाकलें होतें. माधवरावांनीं प्रत्येक वार्षिक रिपोर्टांत त्यांची फार प्रसंशा केली आहे. त्यांच्या कामाचा तपशील विस्तारभयास्तव देतां येत नाहीं, आणि त्यापासून कांहीं विशेष लाभही नाहीं. त्यांच्या कामांत विशेष सांगण्यासारखें असें कांहीं नाहीं. तीं कामें रीतीप्रमाणें शिरस्त्याचीं होतीं व कोणत्याही सुशिक्षित आणि निःस्पृह कामगारानें तीं तशींच केलीं असतीं. सर्व विषयांचें आणि शास्त्रांचें परभाषेंत शिक्षण मिळाल्यामुळें मुलांच्या मानसिक शक्तीचा आणि त्याबरोबरच शरीराचा ऱ्हास होतो; आणि आमचे नवीन विद्वान् अकालीं मृत्युमुखीं पडतात ही गोष्ट मनांत आणून वरिष्ठ प्रतीच्या कांहीं शास्त्रांचें शिक्षण देशीभाषांत देण्याकरितां बडोद्यांत प्रथम जें "व्हर्न्याक्युलर कॉलेज"

स्थापन झालें, त्यांत मुख्य अंग विनायकरावांचेंच होतें. कांहीं शास्त्रांचें वरिष्ठ प्रतीचें शिक्षण त्यांत मिळत असे. त्यांतले बरेच शिक्षक पदवीधर होते. हा शिक्षणक्रम पांच वर्षें अव्याहत चालला. तेथून पसार झालेल्या विद्यार्थ्यांस त्यांच्या योग्य खात्यांत चाकऱ्या मिळाल्या व त्यांची पात्रता जाहीर झाली. सर्वांस हा प्रकार चांगला आणि सोईकर वाटला; परंतु पुढें कांहीं अगम्य कारणानें हें विद्यालय बंद करण्याचें माधवरावांचे मनांत आलें. त्यास पुष्कळ मंत्र्यांचें अनुमोदन मिळून त्यांच्याकडे बहुमत झालें आणि तें बंद पडलें. विनायकरावांचें मत या प्रकरणीं दिवाणांस प्रतिकूळ होतें व तें शेवटपर्यंत तसेंच राहिलें. त्यांनीं विरुद्ध पक्षांत आपलें मत दिलें. सर डा० भालचंद्र भाटवडेकर यांचें मतही विनायकरावांच्याच बाजूस पडलें; परंतु या पक्षाकडे बहुमत वळलें नाहीं, यामुळें त्यांचा इष्ट हेतु व्यर्थ झाला खरा; पण त्यापासून त्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य लोकांत प्रगट झालें. यावरून त्यांचा मताभिमान कळण्यासारखा आहे. इतर कांहीं बाबतींतही माधवरावांचा आणि त्यांचा मतभेद होत असे; पण तो प्रगट करण्यास ते कमी करीत नसत. स्वार्थापेक्षां सत्याभिमानाची त्यांस अधिक आवड होती. आपल्या मनोदेवतेला दाबून टाकणें त्यांस कधीं मान्य झालें नाहीं. जो सत्याचा मार्ग दिसेल त्यानें जाण्यास ते भीत नसत, आणि आपल्या मनास जो न्याय वाटेल त्याच्या रक्षणार्थ आपलें वजन, कर्तृत्वशक्ति, आणि विवरणशक्ति हीं ते खर्च करीत

असत, त्यांनीं जीं जीं कामें केलीं त्यांतही हाच प्रकार घडला. सुदैवानें त्यांचे मालक व्यक्तिस्वातंत्र्यास चाहते होते म्हणून त्यांच्या चाकरीस फाटा बसण्याची वेळ आली नाहीं; पण तिचा शेवट मात्र बहुतांशीं असाच झाला. हें पुढें कळेल.

सन १८७१ च्या शेवटीं गायकवाड सरकारांस राज्याधिकार मिळाला. तेव्हां विनायकरावांस दरबारांत एक सोन्याचें घड्याळ नजर मिळालें. पुढें लवकरच माधवरावांनीं बडोदें सोडलें. राजपुरुष लहान असतां मुखत्यारीनें काम करणारा दिवाण त्याच राजाच्या हाताखालीं काम करणें बहुतेक पसंत करीत नाहीं. पहिलें स्वातंत्र्य आणि नंतरचें पारतंत्र्य यांत किती तरी अंतर! त्यांची पूर्वी पहिली पायरी असते, आणि नंतर ती लागलीच दुसरी होऊन जाते. पहिल्या स्थितींत राजावरच त्यांची देखरेख असते आणि पुढें त्यांच्याच आज्ञेंत त्यांना रहावें लागतें. तेव्हां त्यांना तें कसें बरें आवडेल! इकडे राजालाही असा डोईजड दिवाण आवडत नाहीं. नव्या दिवाणाप्रमाणें त्याच्यावर त्याचा अंमल आणि वजनही रहात नाहीं. एवंच उभयपक्ष एकमेकांस प्रिय होऊं शकत नाहींत व या नियमास माधवराव अपवाद झाले नाहींत. सन १८८२ सालीं त्यांनीं आपलें पद सोडलें.

यानंतर विनायकरावांचा आणि महाराज सयाजीराव गायकवाड यांचा संबंध जडला. ज्या खात्यावर त्यांची देखरेख होती त्यांतलें महत्त्वाचें काम महाराजांकडे सुनावणीकरितां ते नेत असत. महाराजही त्यांच्या

सल्ल्यानेंच बहुतेक बाबतींत हुकूम देत असत. त्यांची विद्वत्ता व नीतिमत्ता याबद्दल महाराजांचा चांगला ग्रह झाला. याबद्दल एकदां संध्याकाळीं घरीं आपल्या आत्याबाईस ते ह्मणाले " आज आमचे मालकांनीं मला विचारलें ' तुम्हांस याहून मोठी जागा दुसरीकडे मिळाली तर तुम्ही जाल किंवा नाहीं ? ' मीं उत्तर दिलें कीं ही चाकरी सोडली तर मी थेट आपल्या मूळघरीं जाईन, आणि हरी हरी ह्मणत बसेन. दुसरी चाकरी करण्याचें माझे मनांत नाहीं. तेव्हां महाराज बोलले ' आह्मी कसचे तुह्माला सोडतों ' ! " यावरून त्यांच्याविषयीं महाराजांचा आदरभाव व्यक्त होतो.

सन १८८२ सालीं महाराजांबरोबर ते कलकत्त्यास गेले होते. परत येतांना काशीस उतरून तेथें कांहीं सांप्रदायिक धर्मविधि त्यांनीं केले. रस्त्यांत ग्वाल्हेर येथें उतरल्यावर त्यांनीं शिंदे सरकाराची भेट घेतली. महाराज शिंदे त्यांच्या भेटीबद्दल फार खुष होऊन त्यांस येथील दिवाणाची चाकरी दिली तर ते पत्करतील काय असें त्यांस महाराजांनीं विचारलें होतें; पण त्यास विनायकरावांनीं रुकार दिला नाहीं. यावरून त्यांच्या राजनिष्ठेची प्रशंसा त्यांच्या एका आश्रितानें मजपाशीं केली; पण मला तींत फारसा अर्थ वाटला नाहीं. मुलाखतीच्या वेळीं झालेल्या क्षणिक स्फूर्तीनें वरील प्रश्न महाराजानीं केला, त्यावेळीं त्यांनीं विनायकरावांची कर्तृत्वशक्ति आणि गुण सर्व पूर्णपणें जाणून त्यांस खरोखर आपले पदरीं ठेवावें असा त्यांचा इरादा झालेला असावा ही गोष्ट संभवनीय नाहीं. वेळेस

सुचला तो प्रश्न त्यांनीं केला आणि त्यानंतर याबद्दल त्यांस कांहींच वाटलें नसेल ! शिंदेशाहींत विनायकरावांचें तेज पडण्यासारखें नव्हतें. विनायकरावांची राजनिष्ठा जुन्या पद्धतीची नव्हती. बढती मिळतांच त्यांनीं इंदूरची चाकरी तत्काळ सोडली आणि पुढें स्वाभिमानापायीं बडोद्याची फार मोठ्या प्राप्तीची जागा सोडण्यास कसर केली नाहीं. याच मानधनाच्या आशेनें त्यांनीं शेवटीं पुन्हा इंदूरची दिवाणगिरी कबूल केली. त्यांची राजभक्ति फार निर्मळ किंवा शुद्ध अशी जुन्या मासल्याची मुळींच नव्हती. राजपुरुषांच्या गुणांबद्दल त्यांस आदर असला तरी त्यांचे दोष त्यांस कळत नव्हते असें नाहीं. आणि त्याबद्दल त्यांच्या ठायीं अनादर किंवा तिरस्कार वसत नव्हता, ही गोष्ट सर्वथैव सत्य नाहीं. मुख्यतः आपल्या प्राप्तीकरितां आणि बऱ्याच अंशीं आपल्या हातून लोकहित घडत आहे या समजुतीनें ते चाकरी करीत होते व ही गोष्ट त्यांनीं एकदां स्पष्ट बोलूनही दाखविली. ते बोलले " पगार फारच मोठा मिळतो म्हणून तो सोडवत नाहीं; पण आतां ही कामाची दगदग मला होत नाहीं. " आपल्या राजनिष्ठेची रिकामी फुशारकी त्यांनीं कधींही मारली नाहीं. उलट राजसेवेचा तिटकारा मात्र अनेकदां त्यांनीं व्यक्त केला होता असें मीं पाहिलें आहे. खाविंदचरणीं मिलिंदायमान होऊन राजा करील तो न्याय, बोलेल तें सत्य, जाईल तीं पूर्व, अशा प्रकारची राजभक्ति त्यांस शिवली नव्हती, असें त्यांच्या आयुष्यक्रमावरून सहज कळेल.

सन १८८३ च्या प्रारंभीं त्यांच्या डाव्या हातास मधुमेहाचा व्रण पडून त्यांस फार मोठें दुखणें झालें. विसाव्या वर्षापासून त्यांस मधुमेहाचा विकार जडला होता; परंतु तें उमेदीचें वय, त्यांत सुस्थिति आणि व्यायाम, यांच्या योगानें तो ह्या वेळपर्यंत दबला होता. पण गेल्या सात वर्षांत त्यांनीं शारीरिक व्यायामाचें नांव सोडलें. त्यांत मानसिक श्रम आणि चिंता हीं फार वाढलीं आणि शरिराच्या ऱ्हासास सुरुवात झाली. बहुतेक नवीन तरुण विद्वानांची अशीच दशा असते, आणि अकालीं मृत्यु हें त्याचें फल होतें. शरिरांत सांचलेलें मधुमेहाचें विष हाताच्या व्रणाच्या द्वारें बाहेर पडूं लागलें. "काट्याचा नायटा" या ह्मणीसारखाच हा प्रकार झाला. कधीं नव्यानवसानें ते "क्रिकेट क्लबांत" गेले आणि बॅट हातांत धरली. त्यासरसें कांहीं कुसळ हातास लागल्याप्रमाणें त्यांस वाटलें. त्याच ठिकाणीं पुढें दोन दिवसांनीं फोड आला. त्यास चिरा दिला, आणि दुखणें विकोपास गेलें. तें इतकें कीं, त्यांतून ते वांचतात कीं नाहीं याचा कांहीं दिवस भरंवसा नव्हता. पुरे सहा महिने या आजारानें ते बिछान्यास खिळले होते, आणि त्यांत त्यांनीं अत्यंत क्लेश भोगले. अहोरात्र त्यांचा डोळ्याशीं डोळा लागत नसे. या वेळीं त्यांचा स्वभाव फारच बदललेला दिसला. त्यांच्या मनोविकारांवर आतां विचाराचा दाब शरीरक्लेशानें फारच कमी होऊन मानसिक दुर्बलता, उच्छृंखळपणा इत्यादि प्रकार जे यापूर्वीं कधीं प्रगट झाले नव्हते ते आतां प्रकट होऊं लागले. या वेळीं ते नोकरांचाकरांस क्वचित अपशब्दही

बोलत असत. यापूर्वी त्यांच्या तोंडून अपशब्द असा कधीं-ही ऐकला नव्हता. पण त्यांचें अंतःकरण इतकें कोमल होतें व विवेकशक्ति इतकी प्रबळ होती कीं, त्याबद्दल त्यांस पश्चात्ताप वाटून त्यांचे उद्गार बाहेर पडत. त्याचप्रमाणें त्यांचा विनोदी स्वभावही यावेळीं निदर्शनास येई. यापूर्वी त्यांचा विनोदी व गमती स्वभाव नैसर्गिक गांभी-र्याच्या दाबानें दबलेला दिसे. आतां तो बराच बाहेर पडे. यावेळीं रियासतीचे बहुतेक बडे कामगार त्यांच्या समाचारास येत असत. चार नामांकित डॉक्टर त्यांस औषधोपचार करीत होते आणि त्याबद्दल एका पैचीही अपेक्षा त्यांनीं केली नव्हती. या क्लेशाच्या भरांत निघालेले त्यांचे कांहीं उद्गार त्यांच्या स्वभावाचे दर्शक ह्मणून पुढें देतों. " या क्लेशापेक्षां मृत्यु अनंतपटीनें चांगला. मी मरणाला भीत नाहीं. ती महानिद्रा आहे असें मी मानतों. मी दिवाण होण्यापेक्षां एखादा शिपाई झालों असतों तर फार बरें होतें. मग मी पांच चार भाकरी खाऊन व पाणी पिऊन स्वस्थ राहिलों असतों. मला असले दुःसह क्लेश देवानें दिले नसते; पण मग इतके डॉक्टर माझ्या उपचारास कसे येते ! " एकदां हा-ताच्या मलमपट्टीच्या प्रयोगाबद्दल ते म्हणाले " हें सखांकी नाटक आहे. पण तें दुःखपरिणामी आहे. " एकदां हातास नवा चिरा देण्याचा विचार निघाला तेव्हां ते डॉक्टरास ह्मणाले " डॉक्टर, तुम्ही शस्त्राचें नांव काढतांच माझा प्राण जातो, इतका मी बहादर गडी आहें. Doctor, I cannot afford to look at your beard. It tells me that you are plotting

something." हे उद्गार त्यांस फसवन चिरा देण्याचा विचार झाला होता त्या वेळचे आहेत. एकदां अत्यंत निराश होऊन कोणताही औषधोपचार करण्याचें त्यांनीं नाकारलें होतें त्यापासून त्यांस निवृत्त करण्यास बरेच प्रयास पडले.

वरील उद्गारांवरून एक मोठी गोष्ट कळण्यासारखी आहे ती ही कीं, वस्तुतः पाहिलें तर अत्यंत क्लेशभरांत व शोकावेगांत मनाच्या सर्व शक्ति पूर्णपणें निद्रिस्त नसतात. यास दुसरें उदाहरण सर थामस मूर यांचें इतिहासांत प्रसिद्धच आहे. वधस्तंभावर मान ठेवतांना आपली दाढी एकीकडे करतेवेळीं तो म्हणाला "मोठी कींव येण्यासारखी गोष्ट आहे कीं या माझ्या दाढीनें राजद्रोह केला नाहीं, नाहीं तर तिचेंही माझ्या मानेसारखें कांडात निघालें असतें." अशा घोर प्रसंगीं त्यांचे हे उद्गार वरील विधानाचे दर्शक आहेत.

एके दिवशीं रात्रीं विनायकरावांच्या अंगांत बराच ज्वर चढून ते निद्रावश झाल्यासारखे बिछान्यावर पडले होते. त्यावेळीं ते चांगलेसे शुद्धींत नव्हते असें वाटतें. त्यांची एक बहीण त्यांच्या उशाशीं बसली होती. अशा स्थितींत एकाएकीं डोळे उघडून ते तिला म्हणाले "तुह्मीं भिऊं नका. मी अशा दुबळ्या व अशक्त शरिरानें देखील ७५ वर्षे जगेन. माझ्या जिवास धक्का पोंचणार नाहीं. मला पाउणशें वर्षे आयुष्य आहे, असें एका जोशानें सांगितलें आहे. तोंपर्यंत मला कांहीं भीति नाहीं." त्यांस एका जोशानें हें भविष्य सांगितलें होतें हें खरें आहे; पण फलज्योतिषावर

त्यांचा भरंवसा मुळींच नव्हता, त्यामुळें त्यांस ही गोष्ट मनांतून इष्ट वाटली तरी ती केवळ अशक्य होय असें वाटून तिच्यावर त्यांचा विश्वास बसला नव्हता. कारण त्यांस आपल्या जीविताचा भरंवसा मुळींच केव्हांही वाटला नाहीं. “ मी ४४ वर्षे जगेन अशी मला आशा नव्हती, असें ते कित्येकदां दुखण्यांत देखील बोलले होते; पण आतां बेशुद्धीमुळें त्यांच्या-वर विचारशक्तीचा मुळींच दाब राहिला नव्हता. त्यामुळें त्यांस इष्ट वाटलेलें, पण पूर्ण असत्य असें भास-णारें वरील भविष्य न कळत त्यांच्या मुखावाटें बाहेर आलें. कितीही असंभवनीय पण अनुकूल गोष्टीवर याप्रमाणें भरंवसा ठेवणें मनास बरें वाटतें. जानसननें म्हटलें आहे, “ अशी कोणतीही असंभवनीय दिस-णारी पण अनुकूळ व इष्ट गोष्ट या जगांत नाहीं, कीं जीवर विश्वास ठेवण्यांस मन तयार नसतें. आकाशांत प्रकाशमान होणाऱ्या दिव्य तारागणांच्या वर्गांत आपण समाविष्ट आहों असें मानण्यापर्यंत देखील मनाची मजल वेळेनुसार पोहोंचते. ”

याप्रसंगीं राजकुलीन वयोवृद्ध स्त्रिया त्यांचे समा-चारास येत असत. परस्परांचे भाषणप्रकार औपचा-रिकच असत. विनायकरावांच्या भाषणांत विशेष नम्रभाव, दरबारी आर्जव, आभारांची लाखोली, इत्यादि राजमंडळांतले प्रवृत्तीचे प्रकार मुळींच येत नसत. त्यांचा एवढा उत्कर्ष राजसेवेंत झाला तरी त्या वर्गाचे दुर्गुण त्यांस मुळींच लागले नाहींत ही गोष्ट या ठिकाणीं सांगणें इष्ट आहे.

याच सुमारास महाराजांची ६ लक्ष रुपयांची मंजुरी घेऊन त्यांनीं बडोद्यास एक कापडाची गिरणी स्थापन केली आणि ३० नंबरचें वारीक सुताचें कापड निघेल अशीं यंत्रें मागविलीं. तीं त्यांच्या देखरेखीखालीं " आलकाक आणि आशडौन " या मंडळीच्या मार्फत तयार झालीं. तिचें काम चालत असतांना ते तेथें पाहण्यास जात असत. ती प्रथम सुरू होण्याचे प्रसंगीं त्या समारंभास उचित असा त्यांनीं एक इंग्रजी लेख लिहिला होता.

यावेळीं त्यांनीं " साखरेची गिरणी " आणि " शेतकऱ्यांच्या पेढ्या " या दोन विषयांवर इंग्रजी लेख लिहिले होते, ते घरींच लिहिले होते. यावेळीं लिहितांना त्यांचा हात कांपे म्हणून तोंडानें मजकूर सांगून ते दुसऱ्याकडून लिहवीत असत. त्यांचीं इंग्रजी आणि मोडी अक्षरें वाईट होतीं; पण दुसऱ्यांचें वाईट अक्षर त्यांस खपत नसे. व्यापारी दृष्टीनें हे दोन्ही लेख फार महत्त्वाचे होते. त्यांत विषयाची माहिती विस्तृत, मांडणी सुरेख, भाषा सुबोध, संगतवार आणि व्यवस्थित, उपक्रम आणि उपसंहार सप्रमाण आणि समर्पक असा होता. पुढें नवसरीस साखरेची गिरणी निघाली तें यापैकीं एका लेखाचें फळ होय. विनायकरावांस प्रथमपासून आपल्या देशाच्या सांपत्तिक स्थितीबद्दल विचार करण्याचा नाद होता. इंदुरास असतां अमेरिकेतील कापूस या देशांत पिकेल किंवा नाहीं याचा प्रयोग त्यांनीं एका शेतांत करून पाहिला; पण त्यांत त्यांस यश न येतां पैशाचें बरेंच नुकसान

लागलें, म्हणून त्यांनीं त्या कामांत अधिक मन घातलें नाहीं.

लोकांत शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व्हावा अशी त्यांस फार इच्छा होती. प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक यांच्यासारखे आमच्या नवीन लेखनकुशल पदवीधरांनीं त्या दिशेनें ग्रंथ लिहावे म्हणून एकदा त्यांनीं क्षीरसागर नामक एका नवीन विद्वानाशीं वाद-विवाद केला; पण त्यापासून इष्ट कार्य झालें नाहीं. क्षीरसागरांनीं त्यांच्याशीं वितंडवाद करून त्यांचा उपमर्द मात्र केला. याप्रसंगीं या नवीन विद्वानांचा उच्छृंखलपणा, उद्दामवृत्ति आणि या वयोवृद्ध, पोक्त, राजकीय पुरुषाची क्षमाशीलता, गांभीर्य आणि वाद-विवादाचा मुद्देशीरपणा हीं प्रगट झालीं. विनायकरावांची वादपद्धति पोक्त, मार्मिक आणि व्यापक असे. त्यांच्या भाषणांत अस्खलितपणा कमी असे; ते भाषण सावकाश करीत व मध्येंमध्यें थांबत त्यामुळें कांहीं घोटाळा झाल्यासारखाही भास होई, व म्हणून सामान्य श्रोत्यांस त्यांचें भाषण चित्ताकर्षक न वाटतां थोडेंसें कंटाळवाणें वाटे. मर्मज्ञांस त्यांचें विचारगांभीर्य आणि भरीवपणा हीं तेव्हांच दिसून येत.

बडोद्यांत पाण्याचें मोठें दुर्भिक्ष होतें. पूर्वीं शहर-सफाईही फारच कमी होती. राजविलास, चैन, ख्याली-खुशाली, नाचरंग, मल्लविद्या, कुस्त्या अशा क्षुद्र कामांकडे राज्याच्या वसुलाचा मोठा भाग खर्च होई, त्यामुळें अशा लोकोपयोगी कामांकडे राजाचें लक्षच जात नसे. सदोदित विलासांत दंग असल्यामुळें " घो

शक्कर क्यौं खाते नही, लोक भूके क्यौं मरते हैं " ही राजश्रीची उक्ति सर्वप्रसिद्धच आहे. पूर्वी बडोदें शहरांतला गलिच्छपणा इतका होता कीं, इंग्रजांच्या एजंटास गांवांत दरबारास येणें जिवावर येई! विनायकरावांनीं शहरसफाई पुष्कळ सुधारली. शहरांत पाणी आणण्याची मूळ कल्पना विनायकरावांस सुचून त्यांनीं रा. रा. जगन्नाथजी इंजनेर यांच्या मदतीनें ती शेवटास नेऊन शहरास मोठा लाभ करून दिला. मात्र त्यांनीं बडोदें सोडल्यावर लोकांस त्याचें फळ मिळालें.

विसनगर आणि पट्टण हे दोन जिल्हे गायकवाडींत आहेत. या दोहोंमध्यें रेलवेचा फाटा होऊन गाडी सरू झाली तर व्यापारास फार फायदा होईल आणि लोकांची मोठी सोय होईल असें जाणून त्यांनीं ही सूचना दरबारमार्फत सार्वभौमचे प्रतिनिधि यांजकडे धाडली. त्याप्रमाणें विसनगर आणि मेसाणा यांमध्यें अग्निरथ चालू झाला, आणि पट्टणास तो फाटा जाऊन मिळण्याची आशा आहे.

सन १८८४ सालीं बडोद्यास ब्राह्मणांच्या हक्कासंबंधानें वाद उपस्थित होऊन सारस्वत ब्राह्मण यांचा समावेश ब्राह्मणांमध्यें होऊं शकतो किंवा नाहीं हा प्रश्न निघाला. त्यासंबंधाचे पूर्वींचे सर्व दाखले पाहून या प्रकरणाचा जो निकाल विनायकरावांनीं मराठींत लिहिला आहे तोही मोठा समर्पक आणि निःपक्षपाताचा आहे. हा फैसल्ला शेणव्यांस यथान्याय आणि अनुकूल असून सरस्वतिमंडळ या नांवाच्या पुस्तकांत तो छापला आहे. तो जिज्ञासूंनीं फार वाच-

ण्यासारखा आहे. विनायकरावांस मराठी लिहिण्याची मोठी हौस असे. त्यांचे अनेक महत्वाचे लेख आणि फैसले मराठींत लिहिलेले आहेत. त्यांचें स्वभाषेवरचें प्रेम अत्यंत प्रशंसनीय आणि नवीन इंग्रजी विद्वानांस अनुकरणीय आहे.

आपल्या देशांत इंग्रजी चिरूटांचा खप फार आहे. यास्तव हा माल या देशांत उत्पन्न होईल किंवा कसें याचा प्रयोग करून पाहण्यासाठीं त्यांनीं तिकडील तंबाखूची लागवड बडोद्यास करून चिरूट तयार करणारे दोन कुशल लोक मद्रासेहून मागवून हा प्रयोग करून पाहिला. चिरूट थेट इंग्रजी नमुन्याप्रमाणें झाला; पण खर्चाच्या मानानें हा व्यापार नफ्याचा होणार नाहीं असें कळून आल्यावरून त्यांनीं हा उद्योग सोडून दिला. सन १८८४च्या अक्टोबर महिन्यांत विनायकरावांनीं दोन महिन्यांची रजा घेऊन ते विश्रांतीकरितां पुण्यास गेले.

सर माधवरावांनीं बडोदें सोडल्यावर म्हैसूर संस्थानचे सुप्रसिद्ध दिवाण रंगाचार्लू हे एकदां बडोद्यास आले होते. त्या वेळीं खा. ब. काज़ी शहाबुद्दीन हे दिवाणाचें काम करीत होते. पाहुण्या दिवाणांच्या सन्मानार्थ त्यांस पानसुपारी देण्याचा समारंभ झाला, तो काठेवाड दिवाणजींच्या विस्तीर्ण दिवाणखान्यांत झाला. या प्रसंगीं बडोद्यांत जे बडे कामगार हजर होते, त्यांपैकीं बहुतेक आले असून त्यांत बरेच पदवीधरही होते. ही कचेरी सुमारें ४५ मिनिटेंपर्यंत चालली व त्यांत अनेक महत्वाच्या विषयांवर भाषणें झालीं. त्यांत

मुख्यतः संस्थानची राज्यव्यवस्था आणि इंग्रजी राज्यपद्धति हे प्रमुख होते. त्या सर्वांवर रंगाचार्लू यांचे विचार फार पोक्त, मार्मिक आणि व्यापक असे असून ते इंग्रजींत अस्खलितपणें प्रदर्शित करण्याची त्यांची हातोटी अत्यंत सुश्राव्य आणि चित्ताकर्षण होती. ती पाहून सर्व सभा आनंदित आणि आश्चर्यभरित झालेली दिसली. रंगाचार्लू हे शरिरानें चांगले धिप्पाड आणि सुदृढ होते. साहेब लोकांत धकण्यासारखा त्यांच्या शरीराचा बांधा होता. त्यांचा रंग मात्र सांवळा होता. मुद्रा फार गंभीर व उल्हासी दिसे. त्यांची वाणी अस्खलित, आवाज मोठा पण मधुर आणि वादपद्धति अत्यंत मुद्देशीर आणि चिकित्सक अशी होती. त्यांच्या बरोबरीचा वक्ता त्या सभेंत एकही दिसला नाहीं. भाषणाचा पुढाकार काजीसाहेबांनीं घेतला होता. विनायकरावही त्यांस मधून मधून विसावा देत होते. बाकी बहुतेक पदवीधर मंडळी श्रोत्यांचेच स्थानीं होती. रंगाचार्लू यांच्या वाक्प्रवाहापुढें सगळे फिक्के पडल्याचा भास झाला. बुद्धीचें तेज आणि दीर्घोद्योग यांचा प्रभाव कधींही लपत नाहीं. ह्या मद्रासकर दिवाण साहेबांस उदार शिक्षण मिळालें नव्हतें. त्यांचें सर्व ज्ञान स्वसंपादित होतें. १४ रुपयांवर प्रथम चाकरी धरून अखेर ते दिवाणगिरीपर्यंत चढले. राजा लहान असतां संस्थानचें काम त्यांनीं मुखत्यारीनें केलें आणि संस्थानची उत्तम व्यवस्था केली. म्हैसूरच्या सांप्रतच्या सुव्यवस्थेचें बरेंच श्रेय या दि-

वाणांसच सर्व देतात. त्यांस मीं पाहिलें तेव्हां ते फार सशक्त, तरतरीत आणि उमेदींत असावे असें वाटलें आणि त्यांनीं या जगांत ७०।७५ वर्षे तरी सहज जगावें अशी त्यांची स्थिति दिसली; परंतु मानवी आशा व्यर्थ आहे! ईश्वरी नेमानेम वेगळाच असतो! या समारंभानंतर सरासरी एक वर्षाच्या आंत हे महापुरुष आपल्या वयाच्या बावन्नाव्या वर्षी वारले असें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें. या सभेंतला वादविवाद लागलीच टिपून ठेवला नाहीं. म्हणून त्याबद्दल अधिक विस्तृत वृत्तांत देतां येत नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते.

यामप्रमाणें विनायकरावांच्या बडोद्यांतल्या मुख्य मुख्य अशा कामांचा संक्षेपतः निर्देश झाला. याखेरीज त्यांनीं या संस्थानांत जीं इतर कामें केलीं तीं केवळ शिरस्त्याचीं असून त्यांत विशेष उल्लेख करण्यासारखें मला कांहीं दिसत नाहीं, म्हणून त्यांचा तपशील विस्तारभयास्तव येथें देणें इष्ट दिसत नाहीं. आतां त्यांचा या संस्थानच्या कामाशीं असलेला संबंध तुटला त्याबद्दल वृत्तांत लिहितों.

सर माधवराव यांनीं बडोदें सोडल्यानंतर महाराज विनायकराव यांस दिवाणगिरीची जागा देत होते; परंतु विनायकरावांनीं जागेवर काजी शाबुद्दीन यांचा हक्क असल्याचें महाराजांस कळविलें. महाराजांचे मनांतून ही जागा विनायकरावजींस देण्याचें फार होतें; परंतु विनायकरावांचा दुराग्रह पाहून निरुपायास्तव त्यांनीं काजीसाहेबांस दिवाणगिरीची जागा दिली.

सन १८८४ सालीं दिवाण काजीसाहेब यांनीं

तीन महिन्यांची रजा घेतली. तेव्हां त्यांचे जागीं विनायकरावांची योजना झाली. यापुढें कांहीं वेळां अशाच कारणांनीं त्यांनीं हें दिवाणाचें काम याप्रमाणें केल्या कारणानें ही जागा काजीसाहेबांमागें आपल्यास मिळेल अशी त्यांस मोठी आशा होती. हा वेळपर्यंत त्यांचा उत्कर्षच होत गेल्यानें त्यांस आशाभंगाचें दुःख कसें असतें तें ठाऊकच नव्हतें.

दिवाणगिरीचें काम कांहीं काळ करून मग राजसेवेंतून मुक्त व्हावें असा त्यांचा मनोदय होता; पण तो सफळ झाला नाहीं. सगळेंच आपल्या मनासारखें कसें होईल ? मग त्यावर "ऐहिक" पणाचा ठसा राहणार नाहींना !! "सुख पाहतां जवापाडें दुःख पर्वता येवढें" अशा कवींनीं वर्णन केलेल्या जगांत सर्व मनकामना सफल होण्याची आशा व्यर्थ आहे. त्याचप्रमाणें इष्टार्थ अप्राप्त आहे तों बराच मनोरम वाटतो. पण ही निव्वळ कल्पनाच होय. अनुभवास असा प्रकार फारसा येत नाहीं.

या राजसेवेंत विनायकरावांचा आशाभंग झाला याबद्दल कोणासही नवल वाटण्यासारखें नाहीं. तो इतका उशीर होईपर्यंतों ( अगदीं शेवटीं ) कसा लांबला याचें मात्र आश्चर्य करण्यासारखें आहे. त्यांस या कामांत अपशय येणें केवळ साहजिक होतें. त्यांत इतकें यश आलें हें मात्र अस्वाभाविक होय ! पण तें केवळ अनुकूळ परिस्थितीचें फळ होय. यद्यपि त्यांनीं सरकारी काम जीव लावून केलें, त्यास तन आणि मन हीं दोन्ही अर्पिलीं, कर्तव्यकर्मांत त्यांनीं डावीउजवीकडे

पाहिलें नाहीं, न्यायपथ वाटला तो निर्भयपणें आणि निःशंकपणें स्वीकारला, तरी या सर्व गोष्टी राजमार्गी चालणारांना पुरेशा नाहींत, त्यांत एकमार्गी माणसांचा निभाव लागत नाहीं. संधानी, धोरणी, चतुर, धूर्त, न्यायान्यायाकडे प्रसंग पाहून वळणारा, वारा येईल तशी पाठ देणारा, लाघवी व आर्जवी असा अष्टपैलु पुरुष या राजकार्यांत टिकतो. यांपैकीं कांहीं गुण विनायकरावांत नव्हते हें निर्विवाद आहे. दरबारीं आडरीतीनें संधानें लावणें, बस्तानें बसविणें, कारस्थानें रचणें, वशिले पोंचविणें, अशा कामांत ते अनभ्यस्त होते आणि त्यांचा त्यांना मनापासून तिटकाराही होता, त्यामुळें यावेळीं त्यांचा डाव हुकला.

सन १८८६ च्या आगस्ट महिन्यांत दिवाण काजीसाहेब यांनीं पेनशन घेतलें. त्या जागेवर आपला हक्क आहे असें विनायकरावांस वाटत होतें. पण या प्रकरणीं महाराजांचा आणि त्यांचा मतभेद होऊन ही जागा लक्ष्मणराव वैद्य यांस मिळाली आणि विनायकरावांची निराशा झाली. या प्रश्नास दोन्ही बाजू आहेत; पण वास्तविक प्रकार कांहीं चांगला प्रगट झाला नाहीं. वैद्य हे संस्थानचे विनायकरावांपूर्वींचे नोकर होते. आणि दिवाण होण्याचे वेळेस ते रेव्हेन्यू कमिशनर होते. काजीसाहेबही पूर्वीं याच हुद्यावर असतांना दिवाण झाले होते. हा या पूर्वींचा या नेमणुकीचा दाखला होता. वैद्य यांची काम करण्याची हातोटी, शिस्त, टापटीप व बेतबात हीं मनांत भरण्यासारखीं आणि महाराजांस मान्य होण्यासारखीं होतीं.

याशिवाय त्यांचें राजगुरू इलियटसाहेब यांच्याशीं फार सख्य असून राजगुरूचें वजन आपल्या राजशिष्यावर बरेंच होतें; त्यामुळें वैद्यांचा पक्ष सबळ झाला. वरील गोष्टी विनायकरावांस इतक्या प्रमाणांनीं अनुकूळ नव्हत्या. त्यांचें काम धिमेपणानें सावकाश चाले आणि पुढें पुढें तर शरिराच्या अस्वस्थपणामुळें तें लांबणीवर पडण्याचाही प्रसंग येई. इलियटसाहेबांशीं त्यांचें वांकडें नव्हतें; पण फारसें सख्यही नव्हतें. आतां वैद्य त्यांच्यापेक्षां जुने नोकर असले तरी त्यांची पायरी आणि पगार हीं विनायरावांच्या खालचीं होतीं. याशिवाय दिवाण काजीसाहेब यांचेपूर्वी महाराज विनायकरावांस दिवाणगिरी देत होते; परंतु या जागेवर सध्यां काजीसाहेबांचा हक्क आहे, तेव्हां यावेळीं महाराजांनीं काजीसाहेबांसच दिवाणगिरी द्यावी असें त्यांनीं निरपेक्ष बुद्धीनें म्हटलें होतें. अर्थात काजीसाहेबांच्या पश्चात ही जागा हक्कानें आपल्यास मिळेल अशी विनायकरावांस फार मोठी आशा होती. याशिवाय काजीसाहेब रजेवर असतां विनायकरावांनीं दिवाणाचें काम यापूर्वी बरेच वेळां केलें होतें. यामुळें पुष्कळ तऱ्हेनें त्यांचें म्हणणें रास्त होतें. दोहों पक्षांतही सत्याचा अंश बराच होता; पण त्याचा निकाल विनायकरावांस प्रतिकूळ झाला, त्यामुळें त्यांनीं आपल्या १६५० रुपयांच्या चाकरीचा तत्काळ राजीनामा दिला.

महाराजांसही हा प्रसंग कठीण वाटला. विनायकरावांचा आशाभंग करणें त्यांच्या जिवावर आलें. त्यांनीं त्यांची समजूत घालण्याचा यत्न करून त्यांस २५००

रुपये दरमहावर आपले सल्लागार म्हणून नेमून त्यांना वैद्यांचे हाताखालीं काम केल्यानें होणारे मानहानीपासून मुक्त करण्याची आशा दाखविली, असें रावबहादूर निळकंठरावांनीं मला सांगितलें होतें; पण ही शर्त विनायकरावांस कबूल झाली नाहीं. त्यांस हा मोठा अन्याय वाटून त्यांनीं आपला चाकरी न करण्याचा मानस कळविला. हे पाहून महाराजांस वाईट वाटून थोडासा रागही आला. तथापि विनायकरावांबद्दल त्यांची पूज्यबुद्धि आणि आदर हीं शेवटपर्यंत अबाधित होतीं असें त्यांनीं कीर्तने यांस इंदुरास दिवाण असतांना लिहिलेल्या पत्रांवरून स्पष्ट कळतें. पण त्यांचा स्वाभिमान आणि मतस्वातंत्र्य हीं महाराजांस पसंत पडलीं नसावींत, असें वैद्यांचे पश्चात् माणिभाईस त्यांनीं दिवाण नेमिलें आणि विनायकरावांचें नांव घेतलें नाहीं, यावरून दिसतें. या प्रसंगीं विनायकरावांचा राजीनामा महाराजांनीं मान्य केला; पण त्यांस सोडतांना त्यांनीं पावणे बारा वर्षें काम केलें म्हणून बाबाशाई तीनशें रुपये पेनशन दिलें. या प्रसंगाची हकीकत सांगतांना त्यांचे वडील चिरंजीव मला बोलले " हा सर्व प्रकार होत होता तेव्हां बाबा घरीं फार शांत होते. कधीं कोणावर कातावत नव्हते. त्यांचें वाचनही चालूंच असे. काम सोडण्याबद्दल त्यांनीं खेदोद्गार काढिला नाहीं. वैद्यांस दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं त्या दरबारासही ते गेले होते, आणि आपल्या मित्रास बढती मिळाली याचें अभिनंदनही त्यांनीं मित्रभावानें करून वैद्यांचा निरोप

घेतला. या प्रसंगीं बाबांच्या मनाची समता लवमात्रही ढळली नाहीं व वैषम्यभाव किंवा वृत्तिक्षोभ हीं प्रगट झालीं नाहींत." पण दुखण्यांत त्यांच्या मनाची अशी समता राहत नसे. कित्येकांना मनाच्या क्लेशाहून शरीरयातना अधिक दुःसह होतात असें दिसतें.

बडोद्याहून जातांना विनायकरावांस पुष्कळ ठिकाणीं पानसुपाऱ्या, मेजवान्या आणि मानपत्रें वगैरे शिष्टाचाराचे प्रकार झाले; पत्रकारांनींही अशा थोर पुरुषांचा बडोद्यास वियोग झाला म्हणून खेद प्रदर्शित केला. कुत्सित, मत्सरी दुर्जनांनीं त्यांची किती जरी निंदा केली, किंवा " बडोद्याचा आक्रोश " आणि "जें कांहीं सगळें चकाकित दिसे तें सर्व सोनें नसे" या पुस्तकलेखकांनीं कितीही नालस्ती केली, तरी बडोदें संस्थानांतल्या लोकांस विनायकराव प्रिय होते यांत बिलकूल संदेह नाहीं. ते निर्दोष होते असें मी म्हणत नाहीं; पण त्यांच्यांत पुष्कळ गुण अनुकरणीय आणि उदाहरणीय होते यांत संशय नाहीं. एकंदरींत ते आमच्या देशास भूषणभूत होते. केवळ मानहानीकरितां त्यांनीं येवढी मोठी जागा सोडिली होती. अन्याय मार्गास ते कधींच अनुसरले नाहींत. केवळ न्यायरक्षणार्थ त्यांनीं आपली कर्तबगारी आणि वजन हीं खर्च केलीं. सत्तावंतास अप्रिय सत्य सांगतांना ते भ्याले नाहींत. माधवरावांचा आणि त्यांचा एवढा ऋणानुबंध आणि स्नेह; पण त्यांसही वेळेनुसार आपलें प्रतिकूळ मत देण्यास ते कचरले नाहींत. माधवरावांसही असे निःस्पृह आणि स्पष्टवक्ते मंत्री हवे होते,

म्हणून त्यांनीं त्यांच्या गुणांचें चीज केलें. " थांकी राय सो म्हाकी राय " असे " होयबा " करणारे लोक त्यांस आवडते तर तसेही त्यांस मिळते; पण मग त्यांच्या राज्यव्यवस्थेस सांप्रतचें रूप खास आलें नसतें.

सन १८८६ च्या आगस्ट महिन्यांत विनायकरावांनीं बडोद्यास रामराम ठोकून ते पुण्यास येण्यास निघाले. प्रयाणसमयीं बहुतेक मोठे मोठे कामगार, शेट सावकार, जहागीरदार इत्यादि लोक त्यांस पोंचविण्यास रेल्वे स्टेशनावर आले होते. त्या वेळचा देखावा अत्यंत हृदयद्रावक झाला; सर्व सद्गदित झाले; कांहींच्या डोळ्यांस पाणीही आलें; गाडींत बसल्यावर विनायकरावांच्या गळ्यांत फुलांचे हार घातले. सर्वत्र उदासीनतेची छाया पडल्यासारखें दिसलें. बडोदें सोडतांना विनायकरावांसही वाईट वाटलें. ज्या ठिकाणीं आपलीं १२ वर्षें गेलीं होतीं, जेथें आपला उदय झाला, व येवढें वैभव व ऐश्वर्य मिळालें, त्या सुखदायक स्थळास सोडतांना कोणास वाईट वाटणार नाहीं ! पुन्हां त्यांचे बडोद्यास पाय लागले नाहींत. एकदां ते सुटलें तें सुटलें ! !

तेथून विनायकराव पुण्यास राहण्यास्तव आले. येवढा थोर आणि नामांकित पुरुष या ठिकाणीं राहण्यास आला हे पाहून पुणेंकरांस मोठा आनंद वाटला. त्यांची बुद्धि, विद्वत्ता आणि कर्तृत्वशक्ति यांच्या साह्यानें तेथल्या सार्वजनिक संस्थांचा बराच उत्कर्ष होईल अशी लोकांस आशा वाटूं लागली. 'मराठा' नामक पत्रानें या आशयाचे उद्गारही काढले होते, आणि ती आशा

केवळ व्यर्थ होण्यासारखी नव्हती. कारण यावेळीं विनायकरावांचें वय केवळ ४७ वर्षांचें होतें. ना० कृष्णराव नूलकर स. १८७५ सालीं वयाच्या ४५ व्या वर्षी आपली कच्छची दिवाणगिरी सोडून पुण्यास आले व त्यानंतर ते सार्वजनिक कामांत पडले. त्यायोगानें लोकांत, सरकारांत आणि चोहोंकडे त्यांचा उत्तम लौकिक आणि जयजयकार झाला. त्यांच्या हातून पुष्कळ लोकहित झालें. सार्वजनिक सभेचा उत्कर्ष त्यांनीं केला. मुंबई व हिंदुस्थान या उभय सरकारच्या मंत्रिसभेंत त्यांचें उत्तम तेज पडलें. त्यांची निःस्पृहता, निःस्वार्थवृत्ति, न्यायप्रियता, स्पष्टवक्तेपणा, मतस्वातंत्र्य, राजकार्यकुशलता वगैरे अनेक असामान्य गुण प्रगट झाले. कांहीं कमिशनांतही गोऱ्या साथीदारांबरोबर काम करून त्यांनीं आपली छाप त्यांच्यावर बसविली. राजसेवेंत त्यांचे गुणसर्वस्व इतक्या स्पष्टपणें सर्व लोकांसमोर येण्यास मार्ग नव्हता. विनायकरावांचीही अशीच गोष्ट होणें संभवनीय होतें. लोकोपयोगीं पडण्याचे अनेक मार्ग त्यांस खुले होते; पण दुर्दैवानें तसा प्रकार झाला नाहीं. दुःस्थितीच्या फेऱ्यांत पडलेल्या देशाचे कर्ते पुरुषही हतवीर्य होतात आणि मृत्युमुखीं पडतात. आपटे, वैद्य, आगरकर, केळकर इत्यादि देशहितार्थ वाहिलेलीं नररत्नें किती अकाळीं हरपलीं ! तेलंग, ठाकूर, य. मो. केळकर अशा स्वदेशहितैषि, राजकार्यकुशल नरवरांनीं तरी या आर्यभूस किती लवकर सोडलें ! त्यांच्या मागें त्यांची जागा घेण्यास त्यांच्यासारखे कर्ते पुरुष आतां कोणी आहेत

काय ! विनायकरावांचीही बहुतांशीं अशीच दशा झाली. पुण्यास येतांच बेंच माजिस्ट्रेटाची जागा पत्करण्याबद्दल त्यांस सरकारानें विचारलें होतें; पण त्यांनीं ती कबूल केली नाहीं. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं मधुमेहाच्या स्फोटानें त्यांची अत्यावस्था झाली. त्यामुळें ७।८ महिने ते बिछान्यास खिळले होते. त्यांतून ते उठण्याची कोणास आशा नव्हती. यावेळीं सर्वांगावर मधुमेहाचे फोड उठले. शरीरक्लेशास सीमा राहिली नाहीं. त्यापुढें मृत्यूचे क्लेशही तुच्छ होते. आतां त्यांत त्यांचा अधिकारही गेला होता. बडोद्यांत पूर्वीं अशाच वेळीं पै न घेतां चार प्रसिद्ध डाक्टर त्यांस उपाय करीत होते. आतां तशी स्थिति नव्हती. आतां दर पावलास फी दिल्याशिवाय पान हलेना. उठल्या बसल्या पैशाशीं गांठ. पूर्वीं नोकर चाकर, स्वार, शिपाई भाराभर असत. आतां त्यांचें सर्व काम घरच्याच माणसांच्या वांट्यास आलें. रात्रंदिवस कोणास झोंप नाहीं, चैन नाहीं, विसावा नाहीं अशी दशा झाली. याच प्रसंगीं विनायकरावांचे बंधु केशवराव अप्पा कीर्तने बी. ए. एल. एल. बी. बडोद्यास न्यायाधीश होते, आणि त्यांच्यावर विनायकरावांची मोठी भक्ति होती, ते नवज्वरानें वारले. हें ऐकून विनायकराव दुःखानें फारच कळवळून विव्हळ होऊन बोलले. " बडोद्यासारख्या वाईट हवेंत नेऊन मीच तुझ्या मरणास कारण झालों. " वस्तुतः पाहिलें तर हे उद्गार निव्वळ दुःखावेगानें बाहेर पडले होते, त्यांत अर्थ कांहींच नव्हता. अप्पासाहेबांनीं आपखुषीनें बडोद्यास चाकरी पत्करली होती,

आणि बडोद्यांत लोक वयातीत होत नाहींत असें नाहीं. तेव्हां बडोद्याच्या हवेनेंच त्यांस मरण आलें हें म्हणणें व्यर्थ आहे; पण दुःखातिशयानें त्यांस असें वाटलें. प्रस्तुतच्या स्थितींत आपलें पहिलें ऐश्वर्य नाहीं याबद्दल त्यांनीं एक चकार शब्दही कधीं काढला नाहीं. असल्या स्थितींत ते शांत होते. वैभव भोगतां-नाहीं त्यांस त्याचें विशेष महत्व वाटत नव्हतें. राजीखुषीनें त्यांनीं तें सोडलें होतें. असो. विनायकरावांचा हा अपमृत्यु तर देवानें टाळला; पण बरे होण्यास त्यांस चांगले आठ महिने लागले. पुढें बरे झाल्यावरही त्यांस पहिली धमक राहिली नाहीं. त्यांचें शरीर फारच खालावलें आणि त्यांचें मुख निस्तेज झालें. त्यानंतर निराशेची छाया पसरली. त्यांचा उल्हास अगदीं गेला. उत्साह नाहींसा झाला. यानंतर सुमारें तेरा महिने ते पुण्यास होते. पूर्वी राज्यकार्यांत मग्न असतां विश्रांतिसुखाची लालसा त्यांस वाटे. आतां नव्यानवसानें त्यांस तें लाधलें ह्मणून कांहीं काळ त्यांस हलकें वाटलें. राज्यभार डोईवरून उतरला म्हणून त्यांस बरें वाटलें. आतां ते संध्याकाळीं बाहेर फिरावयास जाऊं लागले. घरीं त्यांचा पहिला वाचनक्रम सुरू झाला. लेखनक्रमही त्यांनीं चालू केला. सन १८७२ सालीं इंदुरास असतांना "चाळीस वर्षांमागची पुण्याची स्थिति" ही इंग्रजी कादंबरी लिहिण्यास प्रारंभ करून तिचे चार भाग त्यांनीं लिहिले होते. पुढें ती तशीच पडली होती. तिचे आतां ४० भाग त्यांनीं पुरे केले. या-

वेळीं आपल्या हातानें त्यांस लिहवत नसे म्हणून तोंडानें सांगून मुलांकडून किंवा इतर विद्यार्थ्यांकडून तिचा मजकूर ते लिहवीत असत. हा ग्रंथ त्यांच्या हातून पुरा होता तर संसारस्थितिदर्शक एक उत्तम आणि बहुमोल कादंबरी बाहेर पडली असती. पण दुर्दैवानें ती त्यांच्या हातून पुरी झाली नाहीं ! ! ती अर्धी राहिल्यानें असून नसून सारखीच झाली. तिचें संविधानकही त्यांनीं कागदावर नोंदलें नाहीं. तें त्यांच्या मनांतल्या मनांतच होतें, त्यामुळें तिचा उपसंहार त्यांस कसा करावयाचा होता याचीही अटकळ बांधतां येत नाहीं. ही कादंबरी इंग्रजी भाषेत लिहिण्यांत त्यांचा काय हेतु असावा याचा बोध होत नाहीं. त्या भाषेंत त्यांचें ज्ञान उत्तम होतें खरें; पण त्यापासून त्या भाषेच्या वाङ्मयाला मोठीशी जोड झाली असती असें नाहीं. कारण त्या भाषेंत कादंबरी ग्रंथ फार परिपक्वदशेस पोहोंचले आहेत. मोठ्या संपन्न कोठारांत आणखी थोडी भर जाऊन पडली तर त्यापासन काय विशेष लाभ होणार !

राजकीय मार्गांत पडतांना विनायकरावांची समजूत कशी होती याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. त्यांत त्यांस इतकें यश तरी केवळ अनुकूल परिस्थितीनेंच मिळालें; परंतु शेवटीं तींत त्यांचा आशाभंग व्हावयाचा तो झालाच ! ! आतां ही स्थिति बदलण्याचा प्रसंग त्यांस पुनः आला. यावेळींही ते आपलें योग्य स्थान ओळखून त्यासच धरून राहून आपल्या वाङ्मय प्रदेशांत संचार करण्यामध्यें कांहीं

कार्यभाग करते आणि नियमित आहार इत्यादि उपायांनीं शरिराचें जतन करते तर त्यांच्या हातून कांहीं उत्तमोत्तम ग्रंथ तयार होऊन त्यांचा अंतही कदाचित इतक्या त्वरित न होता; पण त्याची त्यांनीं सर्वथैव हयगय केली आणि तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. याबद्दल त्यांच्याकडे मोठा दोष येतो आणि त्यांतून ते मुक्त होणें अशक्य होय. यामुळें त्यांनीं आपलें स्वतःचेंच अकल्याण केलें असें नाहीं तर आपल्या देशाचेंही अपरिहार्य नुकसान केलें. येवढ्या स्पृहणीय बुद्धिवैभवाचा अस्थानीं विनियोग करून त्यांनीं त्यास व्यर्थता आणिली आणि साधन असून आपल्या मायभाषेच्या सारस्वताचें दुर्भिक्ष दूर केलें नाहीं. ज्यांस असे असामान्य मानसिक गुण देव देतो, त्यांचा लाभ त्यांनीं देशबांधवांस करून द्यावा या हेतूनेंच देत असतो; म्हणून तसें करून त्यांनीं आपल्या देशाचें ऋण फेडलेंच पाहिजे. तसें न केल्यानें तो देशशत्रु होतो व हें पाप विनायकरावांच्या हातून घडलें असें मोठ्या दिलगिरीनें कबूल करावें लागतें. "Of whom much is given much is expected" हें डॉक्टर जानसनचें तत्त्व त्यांनीं पायाखालीं तुडविलें. आतां त्यांस बडोद्याचे २५० रुपये कलदार आणि इंदूरचे १०० रुपये पेनशन घरीं चालून येत होतें. याशिवाय त्यांच्या मुंढव्याच्या बागेचें, ब्यांकेच्या व्याजाचें व शेताभाताचें मिळून चांगलें खासें मोठें उत्पन्न होतें. इतकें त्यांच्या चरितार्थास पुरून उरत होतें; पण " आशावधिंकोगतः " ह्मणतात तशी गत होते.

त्यांस आतां या विश्रांतीचा कंटाळा येऊं लागला. लोककार्यांत पडण्यास त्यांस धैर्य येईना. पुण्यांतल्या लोकांची उद्दामवृत्ति, उच्छृंळपणा, महाजनांचा उपमर्द व अनादर करण्याची हौस, अनियंत्रित-पणा, वगैरे प्रकार पाहून त्यांस त्यांच्या सहवासाचें भय वाटे. तेथें सभेस किंवा व्याख्यानासही जाण्यास ते राजी नसत. "तेथें जाऊन मोठ्याची अप्रतिष्ठा झालेलीच पहा-वयाची कीं नाहीं?" असें ते म्हणत. एकदां महादेवराव कुंटे यांस ते ह्मणाले "आमचा जन्म बहुतेक संस्थानांतच गेला. तुमच्यासारखी व तुमच्याइतकी स्वातंत्र्यप्रीति आम-च्यांत राहिली नाहीं. पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून वाग्युद्ध करण्याचें कौशल्य तुम्हां लोकांत इंग्रजी राज्यांत वाढ-ल्यानें आलें आहे. आम्हांला आपली शांतताच बरी वाटते. भांडावें, झगडावें, तुम्ही खोटे, आम्ही खरे अशा प्रकारांत आम्हाला मजा वाटत नाहीं. लोकपक्षानें काम करण्यास आम्ही आतां पात्र राहिलों नाहीं आणि तें काम आमच्या हातून निभेल असा भरंवसाही पण मला आतां येत नाहीं." वरील मानसिक कलामुळें पुण्यास राहिल्यावर कोणत्याही लोककार्यांत ते पडले नाहींत इतकेंच नाहीं, तर त्यापासून ते मुद्दाप अलिप्तच राहिले. तिकडे त्यांनीं मनच घातलें नाहीं. संवय हा दु-सरा स्वभाव आहे. संवयीमुळें राजकार्याच्या धामधुमीकडे त्यांचें मन जाऊं लागलें! पहिल्या वर्गाच्या संस्थानाची दिवाणगिरी आपल्यास मिळाली नाहीं ही मोठी मानहानि त्यांच्या मनास खाऊं लागली. हा कलंक धुवून टाकण्याच्या भरीस ते आतां पडले. त्या दिशेकडे त्यांचें मन वळलें.

अशा स्थितींत त्यांचे मित्र कर्नल ब्यानरमनसाहेब, ग्वाल्हेरचे रेसिडेंट, यांस त्यांनीं एक पत्र लिहिलें कीं, माझ्यांत अद्याप काम करण्याची धमक आणि हौस बरीच आहे. माझ्या गुणांचा शिंदेशाईस उपयोग होईल तर मला फार आनंद वाटेल. साहेब बहादुरांनीं जबाब लिहिला कीं मीं तुम्हांस मोठ्या आनंदानें या कामीं साह्य दिलें असतें; पण मध्यहिंदुस्थानचे एजंट सर लिपेन ग्रिफिनसाहेब हे परक्याचा शिरकाव या संस्थानांत होऊं देण्यास फार प्रतिकूळ आहेत, यामुळें माझा निरुपाय आहे. " याप्रमाणें ही गोळी तर हुकली; पण त्यांचें नशीब ( किंवा खऱ्या अर्थानें पाहिलें तर कमनशीब असें ह्मणणेंच परिणामावरून अधिक योग्य होईल. ) सबळ होतें. दुसरा असा योग अनायासें आपल्यापायीं त्यांच्या घरीं चालत आला.

सन १८८६ सालीं त्यांचे सुप्रसिद्ध शिष्य युवराज शिवाजीराव होळकर यांस इंदूरची गादी मिळाली. त्यानंतर त्यांनीं आपली गुरुभक्ति जागविण्याकरितां कृतज्ञतेनें विनायकरावांस १०५ रुपये दरमहा पेनशन करून दिलें होतें. याप्रमाणें त्यांस इंदूर आणि बडोदें या दोन ठिकाणचे मिळून एकंदर ३५० रुपये कलदार पेनशन दर महिन्यास मिळत होतें. पुढें इंदूरचे दिवाण रघुनाथराव यांनीं त्रासून आणि बेबनावामुळें आपलें काम सोडलें आणि मद्रासचा मार्ग सुधारला. होळकरमहाराजांस नवीन दिवाणाची गरज पडली. त्यांचे परम पूज्य गुरु यावेळीं घरीं रिकामेच होते. ते राजकार्यांत वापरलेले असून पहिल्या वर्गांतल्या संस्थानची

दिवाणगिरी हातून चुकल्यामुळें झालेला मानभंग आणि निराशा यांचा वचपा अन्य ठिकाणीं भरून काढण्याची संधि पहातच होते. ह्या महाराजांशीं त्यांचें गुरूचें नातें होते, आणि हा वेळपर्यंत शिष्याच्या मनांत गुरुभक्तिही बरीच वसत होती. अशा स्थितींत त्यांनीं विनायकरावांस इंदुरास तावडतोब निघून येण्याविषयीं तार केली. त्यांत दिवाणगिरी देण्याबद्दल एक अवाक्षर देखील नव्हतें, त्यामुळें विनायकराव प्रथम घोटाळ्यांत पडले. त्यांस या निमंत्रणाचा कांहीं बरोबर अर्थ कळेना. तरी शिष्याचे वचनाचा मान राखण्याकरितां ते लागलेच इंदुरास आले. पुण्यास असतांना या दिवाणगिरीची जोखीम अंगावर घेण्याच्या बाबतींत पोक्त विचार करण्यास त्यांस अवसरच मिळाला नाहीं. तसा प्रसंग येता तर या कामांत पडण्यास वानवा वाटण्याचा संभव होता; पण तसा योगच आला नाहीं. हें महत्पद मिळण्यापूर्वीच ते इंदुरास दाखल झाले. तेथें आल्यावर दिवाणगिरीनें त्यांच्या गळ्यांत माळ घातली. मग तिचा अव्हेर करण्याचें मानसिक धैर्य त्यांस कोठलें होणार ! त्यांत त्यांच्या राजशिष्यानें प्रत्यक्ष आपल्या हातानें मोठ्या भक्तिभावानें ती माळ त्यांच्या कंठीं अर्पण केली त्यामुळें त्यांचें मन अधिकच भाळलें. त्यांचें पूर्वीचें शिष्यप्रेम आतां बलवत् होऊन त्यास ते वश झाले. अशा मोहक वृत्तीनें दिलेली देणगी कोण स्वीकारणार नाहीं ! अशा स्थितींत तिचा अनादर करणें परम दुर्घट होय. या बिकट प्रश्नाच्या सर्व बाजू मनन-

पूर्वक आणि काळजीपूर्वक ध्यानांत घेण्यास त्यांस मुळींच फावलें नाहीं. डोळ्यापुढें आलेला मनमोहक भाग मात्र पाहून बाकीचा प्रदेश असाच रमणीय असावा अशी स्वाभाविकपणेंच त्यांस कल्पना झाली आणि ते मोहांत पडले; परंतु त्या वेळची विषम परिस्थिति त्यांस कळली नाहीं. तथापि अशा वेळींही विवेकवाणीनें त्यांस भयाची सूचना दिली; त्यांचें मन अस्वस्थ झालें; पण त्यांच्या ऐहिक वृत्तीनें उचल घेतली. एवढी अमोलिक संधि व्यर्थ दवडावी, एवढें लोकहित करण्याचा प्रसंग फुकट जाऊं द्यावा हें त्यांस अवघड वाटलें. ज्या नारायणानें हा योग घडवून आणला तोच त्यांतून पार करणार नाहीं म्हणून कशावरून ? असा त्यांनीं विचार केला. आपल्या राजशिष्यावर त्यांनीं मोठा भरंवसा ठेवला. पूर्वींचें उभयतांचें प्रेमबंधन त्यांनीं मनांत आणलें. रघुनाथरावांनीं त्यांस एकाएकीं सोडलें अशा स्थितींत त्यांस आपल्यासारखा आस्थेवाईक दिवाण मिळणें दुष्कर आहे. कोणी कर्तृत्ववान् मानधन मंत्री योग्य शर्ती आणि करारमदार करून येता. तसाच एखादा श्ववृत्ति पदवीधरही आपल्या टोपलभिर पगारावर नजर देऊन येणेंही शक्य होतें; पण आपल्यासारखा कळकळीचा पुरुष त्यांस मिळणार नाहीं, असा त्यांचा समज झाला. आपल्या शिष्याची निराशा करणें त्यांच्या जिवावर आलें. आपल्या सयुक्तिक वचनांचा अव्हेर आपल्या राजशिष्याकडून होणार नाहीं अशी त्यांस आशा होती; पण यांत दोहों पक्षांची खाशी फसवणूक झाली. 'भरंवशाच्या म्हशीला टोणगा' म्हणतात तशीच गत झाली !

राज्यमदानें पुरुषांत होणारा बदल विनायकरावांस नीट कळला नाहीं. आपलें न्याय्य आणि नैतिक तेज कोणत्या स्थळीं पडेल ह्याचाही नीट उमज त्यांस पडला नाहीं. तसेंच आपल्या गुरूचें मतस्वातंत्र्य,स्वाभिमान वगैरे गुण आपल्या कितपत कामीं येतील, आपल्या इष्टकार्यसिध्यर्थ त्यांचें कितपत साह्य मिळेल, त्यांचें आनुकूल्य आपणास हरबाबतींत कितीसें मिळण्यासारखें आहे, याचा प्रकाश राजशिष्याचे अंतःकरणांत यथास्वरूप पडला नाहीं. गुरूचें शिष्यप्रेम आणि शिष्याची गुरुभक्ति हीं अस्थानीं झालीं आणि त्यांनीं दोघांसही भूल पाडली.

पण या वेळीं विनायकराव केवळ स्वार्थवशच झाले होते असें नाहीं, तर शिष्याची खरी कळकळ आणि आस्था यांनींही बऱ्याच अंशानें ते बद्ध झाले होते. त्यांत १००० रुपयांचें वजन पडून हें विचाराचें पारडें बरेंच खालीं वाकलें हें खरें. त्यावांचून त्यांचें मन इतकें वळतें कीं नाहीं याची शंकाच आहे. महत्पद अप्राप्त आहे तोंवरच तें नको असतें. तें मिळाल्यावर त्याचा अव्हेर करणारे फारच विरळा सांपडतात. द्राक्षें आंबट ह्मणणाऱ्या कोल्ह्यासारखीच प्रायः बहुतेक माणसांची दशा असते, हें कोणास ठाऊक नाहीं !

ता० १८ मे सन १८८८ रोजीं विनायकरावांनीं आपल्या नव्या कामाचा स्वीकार केला. त्या दिवशीं दरबारांतून घरीं आल्यावर त्यांस फार अस्वस्थ वाटलें. या कामांत आपणास अपयश येतें कीं काय अशी त्यांस तत्काळ भीति वाटली. तिच्या भरांत आपल्या चुलत्यास ते ह्मणाले, मी आपलें येथलें पेनशन बुड-

विण्यास आलों आहे असें मला वाटतें. हे शब्द त्यांच्या विवेकवाणीनें त्यांच्याकडून वदविले यांत संशय नाहीं, आणि परिणामीं ते अक्षरशः खरे झाले; पण त्यांच्या ऐहिक वृत्तीनें अधिकारपद ग्रहण केलें आणि ती पदारूढ झाली.

सन १८७५ सालीं त्यांनीं इंदूर सोडलें व सन १८९८ सालीं सुमारें १४ वर्षांनीं ते पुन्हां तेथें आले. इतक्या अवधींत तेथलें राज्यव्यवस्थेचें स्वरूप फारच बदलेलें होतें. १४ वर्षांत मनुष्य देखील किती बदलतें ! मग संस्थानचें रूप पालटलें यांत नवल काय ! त्यांच्या बहुतेक पहिल्या जोडीदार कामगारांचें तेथून उच्चाटण झालें होतें. कोणी परराज्यांत गेले, कोणी घरीं बसले, कोणी सुखरूप राहण्यास स्वदेशीं निघून गेले, कांहीं दुसऱ्या कार्यास लागले व बरेच कालाधीन झाले होते. ही स्थिति पाहून विनायकरावांस प्रारंभीं फार उदासीन वाटलें. पण आतां त्यांच्या साथीदारांत त्यांचे कांहीं पदवीधर शिष्य विराजमान झालेले पाहून त्यांस दुःखांत कांहींसा आनंद आणि अभिमानही वाटला.

इंदूर संस्थानची व्यवस्था बरीच बदलली होती. त्यांनीं पाहिलेली माधवरावांची व्यवस्था बाह्यरूपानें मात्र बऱ्याच अंशानें कायम होती; पण तिची अंतर्गत शक्ति फारच क्षीण भासत होती. ही क्षीणता दूर करण्यास रावब. नाना मोरोजी व रघुनाथराव अशा महान् महान् राजकीय वैद्यांनीं हवे तितके हातपाय हालविले, दांतओठ खाल्ले, जानजान पछाडली पण रोगावर त्यांच्या उपचाराचा परिणाम झाला नाहीं. कुपथ्य बंद

पडेना. शेवटीं रोगी असाध्य पाहून त्यांनीं गाशा गुडाळला. अशा स्थितींत विनायकरावांची चिकित्सा सुरू झाली.

ही विनायकरावांची कारकीर्द आणि नाना फडणविसांची सन १७९८तील कारकीर्द यांत विलक्षण साम्य आहे. इतिहासाची पुनरावृत्ति होत असते या तत्त्वाची सार्थता या स्थळीं पूर्णपणें दिसते. नाना फडणवीस आणि विनायकराव यांच्या मुत्सद्दीपणाची तुलना होण्यासारखी नाहीं. पहिल्याचे कांहीं राजकीय गुण दुसऱ्यांत बहुधा नव्हते; त्याचप्रमाणें दुसऱ्याचे मानसिक गुण पहिल्यांतही दिसले नाहींत, हा प्रश्न निराळा. तथापि दोहों प्रतिनिधींच्या पूर्व साथीदारांचा राज्यांतून बहुतेक अस्त; तरुण, नवशिके आणि अनभ्यस्त अशा जोडीदारांची मदत; दोघा दिवाणांची निराशा; औदासीन्यजनक, खेदास्पद, वयातीत, जराग्रस्त नाउमेदीची दशा व दोघांचेही बहुतांशीं शोकपर्यवसायी परिणाम; हे प्रकार बहुतेक अगदीं तंतोतंत मिळतात. आतां दोहों राज्यांच्या चालकांचें साम्य आहे किंवा नाहीं आणि असलें तर तें कोणत्या प्रकरणांत आणि कितपत, या गहन प्रश्नांचा उलगडा करणें मी आपल्या शिरीं न घेतां तें ज्याचा त्यानेंच किंवा मजहून ज्यांची इतिहासदृष्टि अधिक सुसंस्कृत, प्रोक्त, व्यापक आणि विस्तृत असेल अशा इतिहासवेत्त्यांवर सोंपवितों.

या ठिकाणीं एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. पहिल्या प्रतीच्या संस्थानची दिवाणगिरी हातून गेल्यामुळें विनायकरावांच्या मनास रात्रंदिवस खात अस-

लेली काल्पनिक मानहानि मात्र आतां निद्रिस्थ आणि शांत झाली, यांत संशय नाहीं. त्यांचा स्वभाव इतका खोल, विनयशील, गंभीर, धीमा, शांत, व संकोचशील असूनही आपल्या स्वभावास पूर्णपणें शोभेल अशा मर्यादेनें त्यांनीं पूर्वोक्त मानसिक समाधान व्यक्तही पण केलें. नाहीं असें नाहीं ! पतनशील मानव कोठें तरी घसरलाच पाहिजे Fallible man must fail somewhere या तत्त्वाची सत्यता महाजनांच्या ठायीं देखील अदृष्ट रहात नाहीं. मनुष्य कितीही थोर झाला तरी त्याचें मानवपण पूर्ण लय पावत नाहीं. सध्याची त्यांची मानसिक स्थिति, शारीरिक शक्ति, राज्यस्थिति आणि एकंदर परिस्थिति या सर्वांकडे पाहिलें तर वरील उद्गार केवळ अस्थानीं होते याबद्दल कोणी विचारी मनुष्य संदेहांत पडेल असें मला वाटत नाहीं.

नवीन मंत्रिमंडळीनें विनायकरावांचें मोठें अभिनंदन केलें. त्यांच्या येण्यानें त्यांस आनंद झाला. त्यांनीं नव्या दिवाणास सर्व प्रकारानें उत्तम मदत दिली यांत संशय नाहीं. कोणीही त्यांस विरोध केला नाहीं. त्यांचे जुनें सोबती गणेशशास्त्री, रामजी, नाझीमसाहेब, आनंदराव बर्वे, रामभाऊ उदास वगैरे मंडळी तेथून गेल्यानें त्यांस प्रथम झालेला विषाद लवकरच गेला, आणि आपले प्रिय शिष्य आणि इतर नवीन सुशिक्षित जन आपल्या पायरीबरोबर बऱ्याच तऱ्हेनें आलेले पाहून त्यांना कांहींसा आनंद आणि उल्हासही वाटला; पण विषाद व आनंद या दोन्ही वृत्ति त्यांनीं

तोंडानें फारशा व्यक्त केल्या नाहींत. त्यांची पहिली गंभीर मुद्रा वयातीतपणानें, शरीरक्लेशभोगानें, मानसिक चिंतेनें व निराशेनें आतां बरीच उदास दिसूं लागली; त्यांची पहिली हुरूप गेली; पहिली उमेद खचली; पहिला दम राहिला नाहीं; निराशेची छाया त्यांच्यावर पसरली. त्यांची बडोद्याची वृत्ति आणि आतांची वृत्ति, यांत फारच अंतर पडलें. आतां त्यांच्या चेहऱ्यावर म्लानपणा ठळकपणें भासूं लागला.

पण अशा स्थितींत देखील आपलें सरकारी काम विनायकराव मोठ्या आस्थेनें, मेहनतीनें व राज्याच्या हिताकडे लक्ष ठेवून करीत असत. त्यांची इंदूरची कारकीर्द–तिचा शेवट नीट झाला नाहीं तरी–देखील बरीच नांवाजण्यासारखी झाली असें म्हणावें लागतें. संस्थानांतील सर्व खात्यांत चांगली व्यवस्था रहावी, कामें नीट रीतीनें चालावीं, प्रजेस व लोकांस सुख व्हावें, न्याय व नीति यांच्या मर्यादेचें अतिक्रमण आपल्या कारभारांत होऊं नये, इत्यादि गोष्टी तडीस नेण्याकरितां यथाशक्ति प्रयत्न करण्यांत त्यांनीं आपल्याकडून काडीमात्र कसूर केली नाहीं. जीं प्रकरणें सुनवायीकरितां पुढें येत, त्यांचा नीट विचार करून ते योग्य निकाल करीत. अवांतर खातीं व कारखाने, इत्यादिकांत नवीन महत्त्वाचे फेरफार, सुधारणा वगैरे त्यांच्या अंमलांत घडून आल्या असें दिसत नाहीं. जी राज्यकारभाराची शिस्त सर माधवरावांच्या वेळेपासून वहिवाटींत आली होती, ती नीट व व्यवस्थित रीतीनें कायम रहावी

म्हणून विनायकराव फार काळजी घेत; सांप्रतच्या राज्यव्यवस्थेस एकंदरींत सुयंत्र करणें सोपें नव्हतें, तथापि केवळ निराश होऊन विनायकराव बसले नाहींत. प्राप्तस्थितींत जेवढें लोकहित साधण्यासारखें होतें, तेवढें करण्यांत त्यांनीं हयगय केली नाहीं. भडभेड, पटवर्धन, ओक वगैरे कांहीं पदवीधर कामगार विनायकरावांच्या शिफारशीनें नेमले गेले. त्यामुळें अनुक्रमें न्यायखातें, वैद्यकीखातें आणि इंजीनियरखातें, हीं बरींच सुव्यवस्थित होऊन लोकांस बराच फायदा झाला. स.१८६२ सालीं विद्याखात्याचे मुख्य बनून विनायकराव प्रथम इंदुरास आले. तेव्हां त्यांनीं इंदुरच्या हायस्कुलांतून शिक्षणाची चांगली सोय लावून मुलें प्रवेश परीक्षेस पाठविण्याची व्यवस्था केली, इतकेंच नाहीं तर, संस्थानांतील साधारण लोकवस्ती असणाऱ्या ठिकाणीं आणि महालीं प्राथमिक शिक्षणाच्या मराठी, हिंदी, फारशी किंवा संस्कृत अशा शाळा–जेथें त्या चालण्यासारख्या असतील तेथें–स्थापन करून बऱ्याच विस्तृत प्रमाणावर विद्याखात्याची रचना केली होती. त्यांत गेल्या २३।२४ वर्षांत बरेंच रूपांतर होऊन थोडीशी प्रगति झालेली त्यांच्या नजरेस आली; पण या खात्याची व्यवस्था अधिक प्रगतिपर तत्त्वांवर करून इंदुरांत विद्यालय काढण्याचा विचार त्यांच्या कारकीर्दींत फलद्रूप न होतां त्यांच्या मागील कारकीर्दींत तो अंमलांत आला. विद्याखात्यावर विनायकरावांची फार भक्ति होती. त्यांतच नेहमीं काम करणें चांगलें असें त्यांस

वाटे. न्यायखातें किंवा राजकीय खातें, हीं आपल्या मानसिक गुणांस विहार करण्यास योग्य स्थळें नाहींत, ही गोष्ट त्यांची त्यांस कळत नव्हती असें नाहीं. वाङ्मयविषयांत स्वेच्छ संचार करण्याचें टाकून आपण या राजकीय विषम व कंटकमय खात्यांत शिरलों त्यामुळें काव्य, नाटकें किंवा कादंबऱ्या इत्यादिकांची रचना करण्यास योग्य असे आपले अनेक मानसिक गुण नीटपणें विकास पावले नाहींत, आणि त्यांचें चांगलेंसें चीज झालें नाहीं, ही गोष्ट विनायकरावांनीं स्वतः एकदां कृष्णराव मुळ्ये यांजपाशीं कबूल केली होती. त्याचप्रमाणें कै० तुकोजीराव होळकर यांच्या राज्यकर्तृत्वशक्तीबद्दल त्यांच्या ठायीं मोठा आदर आणि पूज्यभाव वसत असे. "अशा संस्थानिकाची सेवा एकनिष्ठपणें केली तर त्याचें चीज होण्यासारखें आहे. मीं त्यांची चाकरी सोडली हें ठीक केलें नाहीं. त्यांशीं मी वांकून वागत होतों तें बरोबर नव्हतें असें मला आतां वाटतें," असेंही त्यांनीं एकदां कृष्णरावांपाशीं बोलून दाखविलें.

प्रथम सुमारें दीड वर्षपर्यंत होळकर महाराज विनायकरावांचें बऱ्याच सरकारी बाबतींत पुष्कळ ऐकत असत आणि त्यांचा मान राखीत. हें कारभाऱ्याचें काम त्यांनीं अडीच वर्षें केलें. या अवधींत ज्या महत्त्वाच्या गोष्टी विनायकरावांच्या प्रत्यक्ष वा परोक्ष कर्तबगारीनें घडून आल्या त्या पुढें देतों. त्या मला रा० ब० कृष्णराव मुळ्ये यांनीं सांगितल्या.

१. सरदार बुळे यांचें प्रकरण.—या सरदाराचे

पूर्वज थोरल्या सुभेदारांबरोबर माळव्यांत व हिंदुस्थानांत मोहिमा करण्यामध्यें सामिल असत. त्यांजकडे फौजेच्या खर्चाखव म्हणून संस्थानांतील कांहीं भागाची वहिवाट दिली होती. त्याच्या उत्पन्नांतून त्या सरदारांनीं आपला फौजखर्च भागवून पडेल ती फौजी कामगिरी संस्थानच्यातर्फे करावी असें चालत आलें होतें. इ. स. १८०० सालापासून यशवंतगर्दी सुरू झाली व त्यांत ही सरंजामी जहागीर जप्त झाली. सन १८१८ सालीं मंदसोरचा तह झाल्यावर सरंजामी पद्धतच बंद झाली, तेव्हां या जहागिरीची व्यवस्था संस्थानच्या हातांत आली. यशवंतराव होळकराची मुलगी भिमाबाई ही बुळे घराण्यांत दिली होती. तिला वरील प्रकार पाहून जो संतापवायु चढला त्यांमुळें ती वेडी झाली व मरेपर्यंत (सन १८५८ सालपर्यंत म्हणजे ४० वर्षें ) तशीच राहिली. या वेडांत " घोडा लाव, बर्च्छी लाव " याशिवाय दुसरी गोष्ट ती तोंडाबाहेर काढीत नव्हती, असें तिला पाहिलेले लोक सांगतात. तिच्या मरणानंतर तिच्या नांवानें चाललेली जहागीर बंद झाली. अशा स्थितींत या सरदारघराण्याच्या प्रतिनिधीनें आपल्या पूर्वजांकडे असलेले यांदला, पेटलावद, खिखलदा वगैरे दोन अडीच लाख रुपये उत्पन्नाचे महाल आपणास परत मिळावे म्हणून पुष्कळ यत्न करून पाहिला; पण व्यर्थ. शेवटीं त्यानें सार्वभौम सरकाराकडे दाद लागून न्याय मिळावा म्हणून अपील केलें, तेव्हां तिकडून होळकर दर-

बारास या प्रकरणांत विचारणा झाली. त्या वेळीं आर. रघुनाथराव कारभारी होते. हा जहागीर परत मिळण्यास्तव केलेला दावा रास्त आहे किंवा नाहीं, हा प्रश्न मोठा महत्त्वाचा, पण अतिशय घोंटाळ्याचा आहे असें पाहून त्याची चौकशी करण्याचें काम त्यांनीं लांबणीवर टाकिलें. इतक्यांत त्यांची कारकीर्द एकदम संपली व त्यांच्यामागून विनायकराव हे कारभारी झाले. तेव्हां वरील प्रकरण तसेंच भिजत पडलें होतें. त्याच्या निकालाबद्दल वडेसाहिबांचा तगादा चालूच होता. जबाबाकरितां रिमाइन्डरें येतच होतीं. निकालाचें काम मोठें नाजूक होतें. प्रतिवर्षीं संस्थानास २–२॥ लाख रुपयांच्या नुकसानीचा प्रश्न होता. दावा शाबीत ठरला तर संस्थान आपल्या दोन महालांस मुकणार व त्याच्या अपेक्षाचें ठिकरें कारभाऱ्याच्या माथीं फुटणार. उलटपक्षीं सार्वभौम सरकारास कांहीं लेचापेचा जबाब दिला तर तें ऐकणार नाहीं. याप्रमाणें " एकीकडे आड आणि एकीकडे विहीर" अशी स्थिति होती. विनायकरावांनीं या प्रकरणाची बारीक चौकशी केली. मागील जुने १००।१५० वर्षांचे लेखी दाखले पाहिले. त्यावरून ही जहागीर " सरंजामी " असून ती " मुंडकटायींची " नाहीं असें त्यांस समजलें. फौजी खर्चाकरितां दिलेली जहागीर " सरंजामी " असून वंशपरंपरा चालविलीच पाहिजे असा नेम नाहीं. ही गोष्ट संस्थानिकाच्या मर्जीवर अवलंबून आहे आणि त्याप्रमाणें पूर्वींचे संस्थानिक मल्हारजी, अहिल्याबाई, तुकोजी वगैरेंनीं ती कांहीं

पूर्वज थोरल्या सुभेदारांबरोबर माळव्यांत व हिंदुस्थानांत मोहिमा करण्यामध्यें सामिल असत. त्यांजकडे फौजेच्या खर्चाखव म्हणून संस्थानांतील कांहीं भागाची वहिवाट दिली होती. त्याच्या उत्पन्नांतून त्या सरदारांनीं आपला फौजखर्च भागवून पडेल ती फौजी कामगिरी संस्थानच्यातर्फे करावी असें चालत आलें होतें. इ. स. १८०० सालापासून यशवंतगर्दी सुरू झाली व त्यांत ही सरंजामी जहागीर जप्त झाली. सन १८१८ सालीं मंदसोरचा तह झाल्यावर सरंजामी पद्धतच बंद झाली, तेव्हां या जहागिरीची व्यवस्था संस्थानच्या हातांत आली. यशवंतराव होळकराची मुलगी भिमाबाई ही बुळे घराण्यांत दिली होती. तिला वरील प्रकार पाहून जो संतापवायु चढला त्यामुळें ती वेडी झाली व मरेपर्यंत (सन १८५८ सालपर्यंत म्हणजे ४० वर्षे ) तशीच राहिली. या वेडांत "घोडा लाव, बर्ची लाव" याशिवाय दुसरी गोष्ट ती तोंडाबाहेर काढीत नव्हती, असें तिला पाहिलेले लोक सांगतात. तिच्या मरणानंतर तिच्या नांवानें चाललेली जहागीर बंद झाली. अशा स्थितींत या सरदारघराण्याच्या प्रतिनिधीनें आपल्या पूर्वजांकडे असलेले थांदला, पेटलावद, चिखलदा वगैरे दोन अडीच लाख रुपये उत्पन्नाचे महाल आपणास परत मिळावे म्हणून पुष्कळ यत्न करून पाहिला; पण व्यर्थ. शेवटीं त्यानें सार्वभौम सरकाराकडे दाद लागून न्याय मिळावा म्हणून अपील केलें, तेव्हां तिकडून होळकर दर-

बाराश या प्रकरणांत विचारणा झाली. त्या वेळीं आर. रघुनाथराव कारभारी होते. हा जहागीर परत मिळण्या- स्तव केलेला दावा रास्त आहे किंवा नाहीं; हा प्रश्न मोठा महत्त्वाचा, पण अतिशय घोंटाळ्याचा आहे असें पाहून त्याची चौकशी करण्याचें काम त्यांनीं लांबणीवर टा- किलें. इतक्यांत त्यांची कारकीर्द एकदम संपली व त्यां- च्यामागून विनायकराव हे कारभारी झाले. तेव्हां वरील प्रकरण तसेंच भिजत पडलें होतें. त्याच्या निकाला- बद्दल वडेसाहिबांचा तगादा चालूच होता. जबाबाकरि- तां रिमाइन्डरें येतच होतीं. निकालाचें काम मोठें नाजू- क होतें. प्रतिवर्षीं संस्थानास २-२॥ लाख रुपयांच्या नुकसानीचा प्रश्न होता. दावा शाबीत ठरला तर सं- स्थान आपल्या दोन महालांस मुकणार व त्याच्या अपे- क्षाचें ठिकरें कारभाऱ्याच्या माथीं फुटणार, उलटपक्षीं सार्वभौम सरकारास कांहीं लेचापेचा जबाब दिला तर तें ऐकणार नाहीं. याप्रमाणें " एकीकडे आड आणि एकीकडे विहीर" अशी स्थिति होती. विनायकरावांनीं या प्रकरणाची बारीक चौकशी केली. मागील जुने १००।१५० वर्षांचे लेखी दाखले पाहिले. त्यावरून ही जहागीर "सरंजामी" असून ती "मुंडकटायीची" नाहीं असें त्यांस समजलें. फौजी खर्चाकरितां दिलेली जहागीर " सरंजामी " असून वंशपरंपरा चालविलीच पाहिजे असा नेम नाहीं. ही गोष्ट संस्थानिकाच्या मर्जीवर अवलंबून आहे आणि त्याप्रमाणें पूर्वीचे संस्थानिक मल्हारजी, अहिल्याबाई, तुकोजी वगैरेंनीं ती कांहीं

वेळां सरदारांच्या अंगीं कांहीं कसूर लावून जप्त केली होती आणि मग पुन्हां चालू केली होती. संस्थानाची मोठी कामगिरी बजावली, त्यावरचें एखादें मोठें संकट टाळलें, मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यास परचक्राच्या कचाटींतून मुक्त केलें, किंवा अशा कामीं आपले प्राण खर्ची घातले, तर त्याबद्दल मिळालेल्या जहागिरीस "मुंडकटायींची" जहागीर म्हणतात. ती साधारणपणें वंशपरंपरेनें चालते. या वर्गांत वरील जहागीर येत नसल्यामुळें हा दावा बेकायदेशीर ठरवून तो विनायकरावांनीं रद्द केला. हा ठराव बडे साहेबांच्यामार्फत वरिष्ठ सरकारच्या अवलोकनार्थ पाठविला होता. तेथून तो यथान्याय ठरून मंजूर झाला. त्यांत विनायकरावांची विद्वत्ता, वादकौशल्य, लेखनचातुर्य वगैरे गुण प्रगट झाले आहेत. या कार्यसिद्धीमुळें न्यायाच्या उलट न जातां महाराजांची मर्जी त्यास सहज संपादन करतां आली. याप्रमाणें सरदार बुळे यांच्या दाव्याचा शेवट संस्थानास अनुकूळ असा झाला.

( २ ) **रंगरावाचा मुकदमा**–रंगराव नांवाचा कोणी इसम मा ( महाराजांच्या मातुश्री ) साहेबांपाशीं नौकर होता. त्यावर त्याच्या मालकिणीची मर्जी व विश्वास हीं होतीं. त्यानें बरेंच द्रव्य व जडजवाहिर यांचा अपहार करून तें देशीं आपल्या गांवीं नेऊन ठेविलें होतें. ही गोष्ट फुटून त्याच्यावर मुकदमा सुरू झाला व त्यास कैद केलें. त्याच्यापाशीं बराच पैसा जमला होता, यामुळें त्यानें इंग्रजींतील मोठमोठाले वकील करून मोठी च-

छवळ उडविली. आपणावर मोठा जुलूम होऊन कहर गुदरला आहे, असा त्यानें वकिलांच्याद्वारें चोहोंकडे पुकारा केला, अर्ज्या केल्या व तारा केल्या. तेव्हां बडे साहेबांस शंका आली व या कामांत त्यांनीं हात घातला. वस्तुतः पाहिलें तर पहिल्या वर्गांतील संस्थानिकांस स्वतःच्या अधिकारांत इंग्रजसरकारच्या मंजुरीवांचून गुन्हेगारास देहान्त शिक्षा किंवा जीवदान देण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यापासून लोकांत गडबड, दंगा किंवा बंड होण्याचा संभव नसेल तर त्यांत दखल देण्याचा हक्क वरिष्ठ सरकारानें आपल्याकडे, किंवा आपल्या प्रतिनिधीकडे कायद्याच्या मार्गानें ठेवलेला नाहीं. पहिल्या वर्गांतील संस्थानिकांवर व्यक्तिविषयक गुन्हेगाराच्या संबंधांत कायदेशीर रीतीनें वरिष्ठ सरकाराकडे अपील होऊं शकत नाहीं. पण हा नुसता पुस्तकी शास्त्राधार झाला. व्यवहारांत त्याची अंमलबजावणी बेताबाताचीच होते. कारण हा हक्क वरिष्ठ सरकारच्या मर्जीविरुद्ध बजावण्याची ताकद संस्थानिकांत प्रायः असत नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा स्थितींत बडेसाहेबांची या प्रकरणांत रदबदली शुद्ध कायद्याच्या दृष्टीनें बरोबर होती असें म्हणणें कठीण आहे; पण " सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं " ही म्हण प्रसिद्धच आहे. या मुकदम्यांत आरोपी रंगोबानें " आपणावर महाराजांचा दांत आहे, आपणावर जुलूम होत आहे, न्याय मिळण्याची आशा नाहीं, संस्थानांतील सर्व कामगार महाराजांच्या अर्ध्या वचनांत

वेळां सरदारांच्या अंगीं कांहीं कसूर लावून जप्त केली होती आणि मग पुन्हां चालू केली होती. संस्थानाची मोठी कामगिरी बजावली, त्यावरचें एखादें मोठें संकट टाळलें, मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यास परचक्राच्या कचाटींतून मुक्त केलें, किंवा अशा कामीं आपले प्राण खर्ची घातले, तर त्याबद्दल मिळालेल्या जहागिरीस "मुंडकटायीची" जहागीर म्हणतात. ती साधारणपणें वंशपरंपरेनें चालते. या वर्गांत वरील जहागीर येत नसल्यामुळें हा दावा बेकायदेशीर ठरवून तो विनायकरावांनीं रद्द केला. हा ठराव बडे साहेबांच्यामार्फत वरिष्ठ सरकारच्या अवलोकनार्थ पाठविला होता. तेथून तो यथान्याय ठरून मंजूर झाला. त्यांत विनायकरावांची विद्वत्ता, वादकौशल्य, लेखनचातुर्य वगैरे गुण प्रगट झाले आहेत. या कार्यसिद्धीमुळें न्यायाच्या उलट न जातां महाराजांची मर्जी त्यांस सहज संपादन करतां आली. याप्रमाणें सरदार बुळे यांच्या दाव्याचा शेवट संस्थानास अनुकूळ असा झाला.

( २ ) **रंगरावाचा मुकदमा**–रंगराव नांवाचा कोणी इसम मा ( महाराजांच्या मातुश्री ) साहेबांपाशीं नौकर होता. त्यावर त्याच्या मालकिणीची मर्जी व विश्वास हीं होतीं. त्यानें बरेंच द्रव्य व जडजवाहिर यांचा अपहार करून तें देशीं आपल्या गांवीं नेऊन ठेविलें होतें. ही गोष्ट फुटून त्याच्यावर मुकदमा सुरू झाला व त्यास कैद केलें. त्याच्यापाशीं बराच पैसा जमला होता, यामुळें त्यानें इंग्रजींतील मोठमोठाले वकील करून मोठी च-

ळवळ उडविली. आपणावर मोठा जुलूम होऊन कहर गुदरला आहे, असा त्यानें वकिलांच्याद्वारें चोहोंकडे पुकारा केला, अर्ज्या केल्या व तारा केल्या. तेव्हां बडे साहेबांस शंका आली व या कामांत त्यांनीं हात घातला. वस्तुतः पाहिलें तर पहिल्या वर्गांतील संस्थानिकांस स्वतःच्या अधिकारांत इंग्रजसरकारच्या मंजुरीवांचून गुन्हेगारास देहान्त शिक्षा किंवा जीवदान देण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यापासून लोकांत गडबड, दंगा किंवा बंड होण्याचा संभव नसेल तर त्यांत दखल देण्याचा हक्क वरिष्ठ सरकारानें आपल्याकडे, किंवा आपल्या प्रतिनिधीकडे कायद्याच्या मार्गानें ठेवलेला नाहीं. पहिल्या वर्गांतील संस्थानिकांवर व्यक्तिविषयक गुन्हेगाराच्या संबंधांत कायदेशीर रीतीनें वरिष्ठ सरकाराकडे अपील होऊं शकत नाहीं. पण हा नुसता पुस्तकी शास्त्राधार झाला. व्यवहारांत त्याची अंमलबजावणी बेताबाताचीच होते. कारण हा हक्क वरिष्ठ सरकारच्या मर्जीविरुद्ध बजावण्याची ताकद संस्थानिकांत प्रायः असत नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा स्थितींत बडेसाहेबांची या प्रकरणांत रदबदली शुद्ध कायद्याच्या दृष्टीनें बरोबर होती असें म्हणणें कठीण आहे; पण "सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं" ही म्हण प्रसिद्धच आहे. या मुकदम्यांत आरोपी रंगोबानें "आपणावर महाराजांचा दांत आहे, आपणावर जुलूम होत आहे, न्याय मिळण्याची आशा नाहीं, संस्थानांतील सर्व कामगार महाराजांच्या अर्थ्या वचनांत

आहेत, त्यांच्या मर्जीविरुद्ध न्याय देण्यास एकहीजण तयार नाहीं, अशा स्थितींत यथान्याय चवकशी करून योग्य निकाल मिळणें शक्य नाहीं. आपण इंग्रजी राज्यांतले मूळ राहणारे असून इंग्रज सरकारची प्रजा आहों ( ज्या कोणास संस्थानाविरुद्ध बडेसाहेबांपाशीं तक्रार करणें असेल तो बहुधा हीच सबब पुढें करून सार्वभौम सरकारापाशीं न्याय मागतो ) यास्तव बडे साहेबांनीं या कामांत हात घालून योग्य न्याय द्यावा अशा तऱ्हेचा अर्ज बडेसाहेबांस केला होता. तो वाचतांच साहेबांस संशय आला. संस्थानें म्हणजे जुलुमाचें माहेरघर, अन्यायाचें आगर, न्यायनीति, स्वातंत्र्य, यांची श्मशानभूमि, झोटिंगबादशाहीचें विश्राममंदिर अशा कल्पना बहुधा सर्वत्र प्रचलित आहेत व त्या मोठ्या झपाट्यानें वाहतात. तेव्हां बडेसाहेबांस त्यापासून थोडासा विकार झाला म्हणून त्यांत मोठेसें नवल नाहीं; परंतु नुसत्या कल्पनेवरच सर्वस्वीं भिस्त न ठेवतां या प्रकरणांत तथ्यांश कितपत आहे याचा ठाव काढण्याच्या उद्देशानें साहेबमजकुरांनीं "आरोपी रंगोबास आमच्यासमोर एकदां पाठवून द्यावें" असें इंदूर दरबारास कळविलें. हें मागणें महाराजांस पसंत नव्हतें. तें कबूल केलें तर कदाचित् रंगोबा सुटेल अशी त्यांस भीति वाटली. कारण वास्तविकपणें जरी रंगोबा गुन्हेगार होता तरी कायद्याप्रमाणें शिक्षा होण्यास पुरेसा पुरावा त्याच्या विरुद्ध नव्हता, आणि ही गोष्ट महाराजांस कळली होती. म्हणून ते आरोपीस साहेबांकडे पाठ-

विण्यास खुषी नव्हते असें दिसतें. आतां रंगोबास लव-
कर पाठविण्याविषयीं बडेसाहेबांनीं वकिलामार्फत एक-
सारखा तगादा लावला. मधल्यामधें बिचाऱ्या वकिला-
चा भोग ओढवला. " एकीकडे आड आणि दुसरीकडे
विहीर " असें त्यास झालें. या कचाटींतून सुटण्या-
करितां त्यानें " रंगोबास बडेसाहेब कांहीं कामाकरितां
सहज बोलावीत आहेत तर त्यास न पाठविल्यास संस्थान-
च्या न्यायीपणास कमीपणा येऊन अनेक शंका उत्पन्न
होतील. आरोपीस परत करण्याचें साहेबांनीं कबूल
केलें आहे. " असा मंत्र महाराजांच्या कानांत फुंकून
रंगोबास साहेबांकडे रवाना केलें. त्यानें आपली सर्व
हकीकत बडेसाहेबांस निवेदन केली. त्यावरून आरो-
पीवर खरोखरच जबरदस्ती झाली असली पाहिजे अ-
सा साहेबांचा समज होऊन त्यांनीं त्यास संस्थानच्या
बंदिखान्यांत परत पाठविलें नाहीं. हा प्रकार पाहतांच
महाराजांचा भयंकर पित्तक्षोभ होऊन तीन तासांत
रंगोबा जेलांत परत न आला तर त्यास साहेबांकडे
पाठविण्याची मसलत देणारास आरोपीच्या जागीं बिन-
भाड्याच्या घरांत जावें लागेल,अशी धमकी त्यांनीं वकि-
लास दिली. आरोपीस परत करण्याची बोली करून ब-
डेसाहेबांनीं त्यास ठेवून घेतलें, त्यास वकील तरी काय
करणार! हा प्रकार कळतांच वकिलाबरोबर विनायकराव
साहेबांकडे गेले, व त्यांच्या मनांत काय शंका आहे त्या-
विषयीं त्यांस खुलासा विचारला. तेव्हां "आरोपीवर ब-
रीच जबरदस्ती झाली असून संस्थानच्या न्यायखात्यां-

तील कामगारांच्या हातून त्यास न्याय मिळण्याची आशा दिसत नाहीं म्हणून त्यास परत केलें नाहीं" असें साहेबांनीं कळविलें. यावर "आरोपीस कायद्यानुसार न्याय दिला जाईल, महाराजांच्या गैरमर्जीचा संबंध लक्षांत घेतला जाणार नाहीं. जरूर लागल्यास या मुकदम्याची मिसल साहेबांकडे पाठविली जाईल" असा लेखी करार लिहून देऊन कारभाऱ्यांनीं आरोपीस परत आणलें; त्याचे कागदपत्र मागवून त्याच्यावरील आरोपाची चौकशी केली व कैदेची शिक्षा देण्यास सबळ पुरावा नाहीं असें ठरवून त्यास सोडून दिलें; पण तो खटपटी व लफंगा मनुष्य आहे, सबब यापुढें संस्थानांतून निघून जाण्याचा त्यास समज दिला. याप्रमाणें संस्थानांतील एक अनिष्ट इसम हद्दपार झाल्यामुळें महाराजांनाही थोडेंसें बरें वाटलें. इकडे साहेबांसही तक्रार करण्यास कारण राहिलें नाहीं. या प्रकरणांत विनायकरावांचा तारतम्यभाव व युक्तिमत्व हीं लक्षांत घेण्यासारखीं आहेत.

३ **प्रसिद्ध लुटारू तंट्या भील याचा पाडाव व कैद**—प्रस्तुत कारकीर्दींत या लुटारूचा पुरा बंदोबस्त झाला. तो इंग्रजी मुलखांत १२।१३ वर्षें धुडावा करीत हिंडत होता. त्याच्या मागें इंग्रेजी पोलीस किंवा पलटणें पाठलाग करीत हिंडत होतीं; पण त्यांस त्यानें दाद दिली नाहीं; त्यांस तो सांपडला नाहीं. त्याचें धाडे, लूटमार, नाकें कापणें वगैरे सर्व कांहीं यथास्थित चाललें होतें. याप्रमाणें सार्वभौम सरकारास १२।१३

लाख रुपयांच्या निरर्थक खर्चांत आणून तंट्यानें लोकांस फार त्रासविलें होतें. त्यास संस्थानच्या हद्दींत होळकरी फौजेनें पकडलें. त्याचा पाठलाग करून पत्ता काढण्याकरितां ईश्वरीप्रसाद नांवाच्या हुषार कामगाराची योजना झाली होती, आणि त्यानें आपलें काम मोठ्या चातुर्यानें केलें यांत संशय नाहीं; पण "मला या कामांत जें यश आलें तें विनायकराव कारभारी व कृष्णराव मुळ्ये यांनीं सर्व प्रकारची जी लागेल ती मदत दिली नसती तर तें कधींही मिळालें नसतें" असें ईश्वरीप्रसादानें बडेसाहेबांस जाहीर केलें. ही मदत म्हणजे एक प्रकारची होती असें नाहीं. त्याच्या हाताखालीं पायदळ, स्वार वगैरे तर दिलें होतेंच; पण सल्लामसलत देणें, युक्तिप्रयुक्ति सुचविणें, मार्गांत जे जे अडथळे येत गेले ते दूर करण्यास साह्य देणें, वगैरे गोष्टीही त्यांत येत होत्या. नुसती फौज व ईश्वरीप्रसाद यांच्या हातून हें दुर्घट काम तडीस लागण्यासारखें नव्हतें. तंट्या जो इतकीं वर्षें चोहोंकडे धूम करीत हिंडत होता, आणि त्याच्यावर इंग्रजी पोलीस व पलटणें यांचा काबू चालला नाहीं, तो त्याचा एकट्याचा पराक्रम नव्हता. त्यास पुष्कळांचें पाठबळ होतें, त्यांत पुष्कळांचें अंग होतें, ही गोष्ट उघड दिसते. तेव्हां अगोदर त्यांचा पत्ता लावून त्यांचे हातपाय मोडणें अवश्य होतें. त्याचे अनेक साथदार व मदतगार होते. त्यांत कांहीं प्रत्यक्ष व कांहीं परोक्ष रीतीनें त्यास मदत देत होते. त्यांत जे साधारण होते त्यांचा बंदोबस्त करण्यास

फारसा त्रास पडला नाहीं; पण त्यांत एक प्रस्थ फारच जड होतें. त्याच्यावर कोणाचाच काबू चालण्यासारखा नव्हता. " साध्या माशा कोळ्याच्या जाळ्यांत सांपडतात; पण गांधिल माशा तें तोडून पार निसटून जातात. तसेच साधारण गुन्हेगार कायद्याच्या जाळ्यांत गुंततात; पण पक्के बिलंद व पटाईत साळसूद चोर अशा कायद्याच्या फासांत न फसतां आपलें काम साधतात. " या वर्गांत वरील धेंड येत होतें. तो फार श्रीमान होता. चोहोंकडे त्याचे वगवशीले होते. अशा ठिकाणींच बहुधा मातीचें मोल देऊन चोरीच्या सोन्यानाण्यास किंवा जडजवाहिरास उदार आश्रय मिळत असतो, आणि त्याचें तात्काळ रूपांतर किंवा स्थळांतर होऊन त्याचा मागमूस नाहींसा होतो व संशयास जागा राहत नाहीं. तेव्हां येथें काय करावें हा मोठा प्रश्न येऊन पडला. या प्रकरणांत बडेसाहेबांची सल्ला घेतली. त्यांनीं या प्रतिष्ठित चोराची कानउघाडणी करून व त्यास धमकी देऊंन त्यास त्याच्या चक्रव्यूहांतून बाहेर काढून देशांतरास पाठविलें. याप्रमाणें सगळे पंख तोडतांच तंट्यारूप पक्षी, जो अस्मानांत भराऱ्या मारीत होता तो सहज ईश्वरीप्रसादरूपी पारध्याच्या जाळ्यांत सांपडला. या युक्तीच्या मोहिमेंत रक्तपात मुळींच झाला नाहीं. पुढें तंट्याची चौकशी झाली. इंग्रजी हद्दींत त्यानें अनेक रक्तपाताचे गुन्हे केले होते त्यामुळें त्यास देहांत शिक्षा झाली.

**४ दुसरा प्रसिद्ध धाडेती बोंद्या याचा पाठलाग, त्याशीं सामना व त्याचें पतन**–तंट्या भिला-

चा याप्रमाणें शेवट झाल्यावर विनायकरावांनीं दुसरा फौजी कामगार महमद आश्रफ यास ईर्षेस व पणास चढवून या दुसऱ्या बदमाषाचा पाठलाग करून त्यास पकडण्यास पाठविलें. त्यानेंही बोंदऱ्याचा एकसारखा पाठलाग करून एकदा त्यास मोठ्या कचाटींत धरलें व त्याच्यावर हल्ला केला. या वेळीं बोंदऱ्या हत्यारबंद होता आणि त्याच्यापाशीं बरेच साथीदार होते. त्यानें होळकरी फौजेशीं सामना केला. उभयतांमध्यें गोळागोळी सुरू झाली आणि एक गोळी बोंदऱ्यास लागून तो पडला; जिवंत हातीं लागला नाहीं, यास निरुपाय होता. त्याच्या पाडावामुळें रयतेस मोठा आराम झाला. त्याच्या पाठलागाचा खर्च वांचला, त्याची लूटमार बंद झाली.

वरील दोघे धाडेती भील इंग्रजी मुलुख व संस्थानें यांतील मोठमोठीं खेडीं लुटीत, जाळीत व गरिबांस कहार करून सोडीत असत. त्यांचा बंदोबस्त होऊन, एकास पकडलें व दुसरा ठार मारला गेला, याचें सर्व श्रेय होळकर संस्थानास मिळून सार्वभौम सरकारानें त्याचे आभार मानले. " पूर्वकालीन मराठ्यांच्या पराक्रमास पूर्णपणें शोभण्यासारखी जहांमर्दी " या संस्थानानें दाखविली असा धन्यवाद व गौरव लाटसाहेबांनीं केले. वरील दोन्ही गोष्टी विनायकरावांच्या कारकीर्दीस व कर्तृत्वशक्तीस भूषणप्रद आहेत.

**५ खासगी प्रकरण** — संस्थानचे खासगी व दौलती असे दोन विभाग असतात. खासगी मुलुख

किंवा महाल संस्थानिकाच्या राणीच्या वांट्याचा होय. दौलती प्रांत खुद्द संस्थानिकाचा होय. पहिल्याचा राज्यकारभार राणीच्या नांवानें चालतो; दुसऱ्याचा राजाच्या नांवानें चालतो. साधारणपणें पहिला प्रांत दुसऱ्याच्या चौथ्या हिश्शानें असतो. वास्तविक पाहिलें तर ज्याप्रमाणें दौलती प्रांताची राज्यव्यवस्था राजा पाहतो त्याप्रमाणें राणीच्या प्रांताची म्हणजे खासगी मुलुखाची राज्यव्यवस्था राणीनें पहावी. राज्याचे दोन विभाग करण्याचा मूळ उद्देश असाच असावा असें वाटतें. कारण खासगी खातीं, कारखाने, खटले वगैरेंमध्यें राणीच्या नांवाचा शिक्कामोर्तब कागदपत्रावर करण्याचा प्रघात अद्याप चालू आहे. हा सगळा बाह्योपचार व बाह्यव्यवहार झाला; पण वस्तुस्थिति पाहिली तर खरी राजसत्ता (अधिकार ह्मणावयाला) राणीच्या हातीं फ़ारच थोडी असते. आणि त्याचें कारणही उघडच आहे. तिचा पतीच राज्याचा मालक असतो, व तोच प्रायः खासगी प्रांताच्या राज्यव्यवस्थेची देखरेख करतो. " मी तुझा दिवाण म्हणून खासगीची व्यवस्था बघतों असें समजत जा " असें कै० श्री० तुकोजीराव होळकर आपल्या ज्येष्ठ पत्नीस विनोदानें म्हणत असत असें सांगतात. ही व्यवस्था ( राजानें आपल्या राणीच्या संमतीनें खासगी प्रांताचा कारभार करणें ) सुरळीत चालण्यास फारशा अडचणी येत नसत. कारण एकतर स्त्रियांस राज्यकारभारांत ढवळाढवळ करण्याची हौस बहुधा नसतेच म्हटलें तरी चालेल, आणि पात्रताही असत नाहीं. आपल्या हक्काची यथा-

र्थ कल्पना तिच्या ठायीं प्रायः नसते, आणि यदाकदाचित् ती असली तरी सत्ताधीश पतीपुढें त्या विचारीचें मोठेंसें चालत नाहीं ! एकंदरीत खासगी प्रांतांत स्त्रीराज्य पाहिजे, तेथें देखरेख राणीची पाहिजे, अंमल तिचा पाहिजे, ह्या गोष्टीचा बाह्य देखावा मात्र होतो; पण खरा प्रकार याच्या अगदीं उलट असतो. दौलतीसारखा खासगीवरही खरा अंमल संस्थानिकाचाच असतो. दोन्ही प्रांतांतील कायदे कानू त्याच्या मताप्रमाणें होतात, बदलतात किंवा नाहींसे होतात. दोहींचा सोक्षमोक्ष त्याच्याच हातीं असतो. राणी त्याच्या हातांत बाहुलें असतें म्हटलें तरी चालेल. तिच्या अधिकारांत मोठासा जीव नसतो. ही वस्तुस्थिति असते आणि ती सुव्यवस्थित राज्यपद्धतीस साधक आहे. एकहातीं कारभार असला म्हणजे तो सुरळीत चालतो, आणि त्यांत व्यत्यय येत नाहीं.

परंतु एका राजामागून दुसरा राजा गादीवर बसतेवेळीं कांहीं विशेष परिस्थितींत वरील व्यवस्थेस बाध येत असे. ती विशेष परिस्थिति कोणती म्हणाल तर मृतराजाची विधवा स्त्री जिवंत असली तर तिचें अस्तित्व वरील एकहातीं राजसत्तेस बाधक होत असतें, ही होय. प्रायः तिचाच औरस किंवा दत्तक मुलगा गादीवर बसतो तिच्यावर त्याचें वजन पडत नसतें. ती आपल्या प्रांतावर सत्ता करूं लागली तर मुलास तिच्या विरुद्ध जाणें कठीण पडतें, तें त्यास मोठें संकट वाटतें.

हुबेहुब असाच प्रकार विनायकरावांच्या कारकीर्दींत इंदूर संस्थानांत घडून आला. तुकोजीराव महाराज

वारले तेव्हां त्यांच्यामागें त्यांची ज्येष्ट स्त्री भागिर्थी मासाहेब ह्या जिवंत होत्या व राज्यारूढ शिवाजीरावांच्या त्या सख्ख्या मातोश्री होत्या; त्या खाजगी प्रांतावर आपला अधिकार चालवूं लागल्या व तो कायम रहावा म्हणून त्यांनीं खटपट चालविली. राजघराण्यांत थोडीशी फूट दिसूं लागतांच दोहों पक्षांस भर देऊन ती वाढविणारे दिवटे तेव्हांच आपआपल्या मालकां-भोंवतीं जमतात. त्यांत बरेच लोक मोठे कारस्थानी, पाताळयंत्री, धूर्त, स्वार्थसाधू, शून्यहृदय, काविबाज, "नवरा मरो किंवा नवरी मरो आपला स्वार्थ साधण्याशीं काम" अशा विचाराचे असतात. त्यांतच कलम दोनमध्यें दिलेल्या मुकदम्यांतला आरोपी रंगोबा हा होता. या प्रकरणांत सार्वभौम सरकारापासून अनुकूळ ठराव मिळवून आणण्याचें आमिष दाखवून; पुष्कळ थापा मारून मासाहेबांपासून अशा कित्येक स्वार्थी लोकांनीं बराच पैसा उकळला, जडजवाहीर उपटलें व देणग्या संपादल्या. अशा रीतीनें सगळी खाजगी मालमत्ता मासाहेब लुटवितात कीं काय याविषयीं महाराजांस मोठी भीति पडली. याचा बंदोबस्त कसा करावा हा मोठा विचार पडला. दोहों पक्षांच्या प्रतिनिधींनीं बडेसाहेबांकडे जाऊन आपापल्या तर्फेचें म्हणणें त्यांस कळविलें. हा खाजगीचा प्रश्न मोठा घोटाळ्याचा होता. प्रारंभीं तो साहेबांच्या नीट रीतीनें डोक्यांत शिरेना. परदेशस्थांस संस्थानच्या अंतःस्थ बारीक सारीक गोष्टी यथायोग्य समजणें मोठें जड जातें. प्रथम बडे साहेबांस मासाहेबांचा पक्ष खरा आहे असें वाटून त्याकडे

ते वळले असावे असें दिसलें. तेव्हां वस्तुस्थिति समजून देण्याचें काम करणें कारभाऱ्यांस भाग पडलें. त्यांनीं या प्रकरणाची चिकित्सा केली, त्यास साधक बाधक प्रमाणें, दाखले, पुरावे पाहिले, सर्वांगांनीं त्याचा विचार करून एक खुलासेवार लेख किंवा यादी(Memorandom) तयार करून साहेबांच्या अवलोकनार्थ पाठवून दिली. तेव्हां त्यांच्या अंतर्यामीं यथातथ्य प्रकाश पडला आणि त्यांस समजलें कीं मयत संस्थानिकाच्या विधवा राणीस किंवा राण्यांस ( कारण बहुपत्नीकत्व हें संस्थानिकाचें मोठें लक्षण होऊन बसलें आहे. त्यास अपवाद अलीकडे कोठें थोडेसे होऊं लागले आहेत. ) खाजगीचें स्वामित्व मिळालें तर राज्याचे विभाग होऊं लागतील. दुहेरी तिहेरी अंमल सुरू होईल; एका विधवा राणीच्या मागें तिची दुसरी सवत खाजगीवर दावा करील, त्यामुळें सत्ताधीश संस्थानिकाच्या राणीस खाजगीवर अंमल चालविण्यास कदाचित् अवकाशच मिळणार नाहीं, राज्यांत बखेडा माजेल, राजाच्या पतीविरुद्ध खाजगी कारभार सुरू होऊन त्याच्यांत आणि त्याच्या सख्ख्या किंवा सावत्र आयांत द्वैत वाढेल, द्वेष वाढेल, फिसाद पैदा होईल, दुही माजेल, अंतर्गत क्षोभ वाढेल, संस्थानचा वोज राहणार नाहीं, त्यास दुर्बलता येईल, कुटिल कारस्थानांस ऊत येईल, संस्थानांच्या रक्षणाची हमी सार्वभौम सरकारानें घेतली आहे त्या अर्थीं या घरगुती वादाचा राजास प्रतिकूळ निकाल झाला तर तीं क्षयाच्या पंथास लागतील, व स्वतःच्या राणीसारखी राजाची आई त्याच्या कह्यांत

चालेल असा नेम नाहीं. यापूर्वी असा घोटाळ्याचा प्रश्न उद्भवला नसल्यामुळें त्याच्या संबंधांत मागील दाखला मिळण्यास मार्ग नव्हता. पूर्वी साधारणतः " बळी तो कान पिळी " असा राज्याचा प्रकार असल्यामुळें त्या-विरुद्ध जाण्याची विधवा राण्यांस ताकद होत नसे. " राजा बोले आणि दळ हाले " अशी वस्तुस्थिति सर्वत्र चालल्यास सदर प्रश्नासारखा प्रश्न मागील काळीं उत्पन्नच होणें शक्य नव्हतें. कारभाऱ्याच्या वरील लेखावरून पूर्वोक्त सर्व गोष्टी बडेसाहेबांच्या गळीं उतरल्या. त्याचें महत्त्व, गांभीर्य व सत्यता त्यांस मान्य झाली. त्यांनीं तो लाटसाहेबांच्या मंजुरीस्तव आपल्या पूर्ण संमतीसह पाठवून दिला. तेथून तो लवकरच मंजूर होऊन आला, त्यामुळें कुटील राजकारस्थानचे पाय मोडले. 'घरगुती घातक दुहीचा बींमोड झाला. एका घोटाळ्याच्या प्रश्नाचा समाधानकारक व संस्थानच्या हितास साधक असा निकाल लागला. त्याचें श्रेय विनायकरावांस आहे. या हिंदुस्थान सरकारच्या निकालामुळें पुढील संस्थानिकांचा मार्ग सुगम झाला. खाजगीसंबंधीं असाच वाद पुढें कदाचित् निघाला तर त्या प्रकरणांत वरिष्ठ सरकारचा वरील ठराव मार्गदर्शक होऊन त्याचा कायमचा उपयोग होण्याजोगा आहे. हा ठराव मंजूर होऊन येण्यापूर्वी मृतमहाराजांची विधवा पत्नी व सांप्रतच्या महाराजांच्या आई ह्या आपल्या पतीच्या मागून तीन वर्षांनीं देवाधीन झाल्या. त्यामुळें त्यांच्या पश्चात् हा ठराव अंमलांत आला आणि आईच्या हातून राजसत्ता बळजबरीनें हिसकावून घेण्याचा विषादकारक

प्रसंग टळला, ही दुःखांत सुखाची गोष्ट झाली. एकंदरींत हा निकाल यथान्याय आणि उत्तम होता, यांत संशय नाहीं. याशिवाय त्यांच्या कारकीर्दींत उल्लेख करण्यासारखें कांहीं विशेष घडलें नाहीं.

सन १८८९ पासूनच त्यांचें आणि होळकरांचें पटेनासें झालें. पुढें तर त्यास बेबनावाचें स्वरूप येण्यास पाहूं लागलें. त्याची यथास्थित फोड करण्याचा काळ अद्याप आला नाहीं. त्यास निदान अर्धें शतक तरी गेलें पाहिजे. हा इतिहासाचा भाग आहे; तथापि इतकें सांगितलें पाहिजे कीं, दिवाणास आपल्या मालकाची राज्यरीति आवडेना आणि मान्य होईना. मालकास दिवाणाचा स्पष्टवक्तेपणा, निःस्पृहता, मतस्वातंत्र्य, स्वमतावलंबनप्रेम, वादपद्धति हीं खपतना. त्यांच्यावर वशीकरणाच्या पुष्कळ युक्त्या लढविल्या गेल्या, पण इष्टकार्य कांहीं साधलें नाहीं. दोघांच्या न्यायदर्शनाचे मार्ग आतां फुटले. ते पहिल्यानें म्हणजे एक होते असें नाहीं. तरी पण कसें तरी करून त्यांस जुळते ठेवण्याची गरज लागे; पण आतां त्यांत फारच अंतर पडूं लागलें. प्रत्येकास आपण न्यायमार्गास अनुसरूनच आचरण करीत आहों असें वाटे; पण एकाचा न्याय तो दुसऱ्यास अन्याय वाटे. आपल्या प्रचंड न्यायौघांत दिवाणानें मुकाट्यानें वहात यावें याबद्दल मालकांनीं पराकाष्ठा केली; पण दिवाण हे अशा महापुरांत पोहण्यास शिकले नव्हते. ते गटांगळ्या खाऊं लागले, त्यांचा जीव घाबरला, त्यांनीं तरावें म्हणून स्वार्थरूप तुंबे त्यांच्या पोटाखालीं व कमरेस बांधले, पण व्यर्थ. त्यांस आतां या राजकारणरूपी

उदधींतून बाहेर निघावें असें वाटूं लागलें. तें राजकीय वातावरण त्यांस आतां मानवेना. त्यानें त्यांची प्रकृति बिघडली. अशा स्थितींत पोक्त विचारानें विश्रांतीसाठीं दोन महिन्यांची रजा घेऊन ते पुण्यास आले. ती संपल्यावर तेथूनच अमात्यपदाचा राजीनामा पाठवावा असा त्यांचा निश्चय ठरला. तसें ते करते तर सोन्याहून पिंवळें झालें असतें; पण तसें होणार कोठून? " मनसा चिंतयेत् कार्यं दैवमन्यत्र चिंतयेत् " तसाच प्रकार येथेंही झाला. त्यांच्या मालकास त्यांचा वियोग जड जाऊं लागला. पुनः वशीकरणाचे प्रयोग सुरू झाले. काम न सोडण्याबद्दल विनायकरावांस फारच आग्रह झाला. त्यांनीं त्यांचें मन वळलें. दोन महिने रजा संपण्याच्या पूर्वीं कामावर न जाण्याचा त्यांचा निश्चय होता; परंतु त्यांच्या या विश्रांतीचा एक महिना पुरा झाला नाहीं तोंच त्यांच्या मालकांचे कनिष्ठ बंधु श्रीमंत यशवंतराव होळकर हे एकाएकीं वारले, त्यामुळें त्यांच्या श्रेष्ठ भ्रात्यास मोठा धक्का बसला. महाराजांस बंधुवियोगाचें फार दुःख वाटून त्या भरांत त्यांनीं आपल्या दिवाणास समाचारास तावडतोब येण्याविषयीं तार केली. ही पुन्हा अडचणीची वेळ आली. अशा वेळीं न जाणें बरें नव्हतें. त्यांत विनायकरावांचें मन फार कोंवळें होतें. तें तेव्हांच द्रवत असे. ते लागलींच आश्रयदात्याच्या समाधानार्थ धांवत आले. हा प्रसंग न येता, व त्यांनीं पुण्याहून कामाचा राजीनामा दिला असता तर त्यांत त्यांची शोभा राहून पुढें झालेला अत्यंत खेदास्पद असा शेवटच्या वियोगाचा प्रकार टळला

असता व त्यापासून त्यांच्या मनास ज्या असह्य यातना झाल्या त्यांचेंही कारण न होतें; परंतु विषम राजमार्गाचें खरें स्वरूप त्यांच्या प्रत्ययास आणण्याचें देवाचे मनांत होतें. या राजकीय समारांगणांत युद्ध करण्यास या चरित्रनायकास कमी धैर्य होतें असें नाहीं. स्वदेशाभिमान, न्यायप्रीति इत्यादि साधनांची सामग्रीही त्यांजपाशीं पुष्कळ होती; पण शरीरसामर्थ्य आणि मनाचा खंबीरपणा हीं मात्र पुरेशीं नव्हतीं. त्याचप्रमाणें एकमार्गीपणामुळें या समरांत डावपेंच, नोकझोक, पवित्रे बदलणें वगैरे प्रकारचें कौशल्य ( किंवा यथार्थ ज्ञानाच्या नजरेनें कौटिल्य म्हटलें पाहिजे ) त्यांच्यामध्यें असावें तितकें नव्हतें. " राजकीय सामर्थ्य सुमार्गानें न मिळेल तर कुमार्गानें तें मिळविण्यास कच खाऊं नये, वेळेनुसार स्वाभिमानाचा होम झाला किंवा मनुष्यपणास आंचविण्याची वेळ आली तरी त्याची क्षिती बाळगूं नये. यश संपादितांना त्याच्या समाधानाच्या निंद्यपणाकडे पाहूं नये. ' ना विष्णुः पृथिवीपतिः ' असें समजून राजास सदैव अनुकूल रहावें, हीं मतें त्यांच्या अंगवळणीं फारशीं पडलीं नव्हतीं. संपत्ति आणि राज्याधिकार यापाशीं न्यायबुद्धिच असावयाची, ते अन्यायमार्गांत कधींही जाणें अशक्य, हें तत्त्व त्यांस मान्य नव्हतें. यामुळें त्यांचें आणि मालकांचें एक मत फारसें नसे; वारंवार मतभेद होई. परंतु " दे घे " या तत्त्वावर काम धके. कधीं महाराज दिवाणाचें ऐकत, त्याचप्रमाणें प्रकरण फारसें महत्त्वाचें नसेल तर त्यांत यजमानांनीं आपल्या मताचा अनादार केला तरी त्याकडे दिवाणही दुर्लक्ष करीत असत. अशा

रीतीनें हा राज्यरूप शकट या खडकाळ रानांतून सुमारें दोन वर्षे र र करीत चालला होता, पण तो आतां अगदीं मेटाकुटीस आला. आतां येथें राहण्यांत मजा नाहीं असें पाहून दिवाणांनीं राजीनामा दिला, परंतु तो यजमानांनीं मंजूर केला नाहीं. त्यांस दिवाणास सोडावेंसें वाटेना. असा दिवाण शोधल्यास पुन्हां मिळणार नाहीं, असा बुद्धिवाद त्यांच्या मालकांचे खरे हितचिंतक त्यांस देत होते. त्याप्रमाणें त्यांचे हित-शत्रु त्यांच्या अनियंत्रितपणास आणि निरंकुश बुद्धीस भर देत होते, आणि चेव आणीत होते. अशा स्थितींत "कापशे प्रकरण" उपस्थित झालें. त्यांत सरकार वादी होते. या मुकदम्यांत आरोपी ठरलेल्या संस्थानच्या कामगारानें भूमिगत द्रव्याचा अपहार केल्याचा त्यावर आरोप होता. फिर्यादी तर्फे गणपतराव किर्लोस्कर वकील होते आणि प्रसिद्ध ना. फेराजशहा मेथा आरोपी तर्फे वाद करीत होते. हा कज्जा जिल्हा जज्जापुढें प्रथम होऊन तेथें आरोप नाशाबीत होऊन आरोपी सुटला. त्यावर वादीतर्फे सदर कोर्टांत अपील झालें! तेथें दोघां न्यायमूर्तींपुढें वाद होऊन उभयतांत मतभेद झाला. मुख्य न्यायाधिशांनीं आरोपीस गुन्हेगार ठरवून त्यास शिक्षा ठोठावली; पण त्यांच्या साथीदाराचें मत त्याविरुद्ध पडलें. आतां हा वाद निकालाकरितां दरबारांत गेला पाहिजे, आणि तेथून जर कां आरोपी सुटला तर मग मात्र वादीस पुढें न्याय मिळविण्यास मार्ग नव्हता. कारण खुद्द सर-कारच फिर्यादी असल्यामुळें महाराजांस या प्रकरणाचा अखेर निकाल लावण्याचा मार्ग बंद झाला होता, अशा

स्थितींत मुख्य न्यायाधिशाचा ठराव दरबारांत बहाल रहावा म्हणून पराकाष्ठा झाली; पण दिवाणाचें मन म्हणून तिकडे वळलें नाहीं. फिर्यादीस किंवा आरोपीस अनुकूल किंवा प्रतिकूळ अशी कोणतीही वृत्ति त्यांनीं उघड केली नाहीं. इतर कज्ज्यांप्रमाणें या मुकदम्याचाही निकाल आपल्या न्यायदेवतेच्या आज्ञे-प्रमाणें करण्याचें ते शेवटपर्यंत म्हणत होते. हें त्यांचें म्हणणें फिर्यादीस प्रतिकूळ होतें असें नाहीं; पण वादीस त्याचा अर्थ तसा भासला. राजपक्षासही एकंदरींत न्यायच इष्ट होता; पण तो अनुकूळ झाला तर मात्र न्याय, प्रतिकूळ झाला तर अन्याय, हें विधान दिवा-णास संमत होईना. फिर्यादी या कज्ज्यांत आग्रहास पेटले होते हें त्यांस पसंत पडलें नाहीं. पुढें आरोपीचा कबुलीजबाब घेण्याचा प्रकार दिवाणास असंमत हो-ऊन त्यास यथाशक्ति अवरोध करण्याचा त्यांनीं यत्न केला, त्यामुळें दिवाण आरोपीस वश झाले असावे अशी शंका येण्यास अवकाश मिळाला. या वादांत तत्त्वबोध होणें एकीकडेच राहून वैमनस्याचें कार्य मात्र घडून आलें. पूर्वीचा गुरुशिष्यसंबंध पूर्ण लयास गेला, आणि अत्यंत निकृष्ठ स्थितींतला सेव्यसेवकभाव प्रगट झाला. प्रसिद्ध कवि व्हाल्टेर आणि प्रशियाचा बादशाहा फ्रेडरिक धि ग्रेट यांच्या शेवटच्या वियोग-प्रसंगाची आठवण या प्रसंगावरून होते. "राजामित्रं केन दृष्टं श्रुतं वा" हे उद्गार काढणारा विष्णुशर्मा मनुष्यस्वभावाचा मोठा मार्मिक परीक्षक होता. विना-यकरावजींनीं "राजाज्ञापरिपालनरूप" अमात्य पद

स्वीकारलें असतें तर यावज्जीव त्यांस त्याचा वियोग झाला नसता, आणि उलट त्यांच्या वैभवांत अधिक भर पडली असती. असें झाल्यानें त्यांचें स्वतःचें आणि स्वप्राणाहूनही अधिक प्रिय अशा मुलावाळांचें कोट-कल्याण झालें असतें. पण हें सर्वव्यापी तत्त्व ओळखण्याचें स्वार्थपर ज्ञान त्यांच्यांत साऱ्या जन्मांत कधींच आलें नाहीं ! ते आपल्या मनोदेवतेचे भाविक भक्त होते. तिला स्मरून त्यांनीं सर्वांवर पाणी सोडलें.

परिस्थितीवरून आणि लोकमताप्रमाणें आरोपी उघड दोषी दिसत होता; पण पुरावा मात्र सदोष ठरविण्यास पुरेसा नव्हता. " शंभर आरोपी सुटले तरी पत्करले, पण एक निरपराधी दोषी ठरणें न्यायास मान्य नाहीं, " या न्यायनीतीच्या उदार तत्त्वावर दृष्टि देऊन दिवाण राजपक्षास मान्य झाले नाहींत. स्वार्थदक्ष कामगारास फिर्यादीस अनुकूळ होण्यास अनेक मार्ग होते, आणि त्यापासून कांहीं नडही येण्यासारखी नव्हती; कारण आरोपी हा शासनार्ह होता. पण शासनमार्ग मात्र प्रशस्त नव्हता. त्यानें " म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं, पण काळ सोकावतो " असा प्रकार झाला असता. एकदां कां अशा कामास हात दिला कीं मग पुढें किती वेळ, कशा रीतीनें आणि कशा प्रकरणांत हात मळवावा लागला असता याचा नेम नव्हता, ह्मणूनच चरित्रनायकानें मोठ्या दूरदृष्टीनें राजपक्षाचें समर्थन केलें नाहीं आणि आपली २००० रुपये वजनाची रुपेरी बेडी खाडकन तोडली. पण याच कामांत त्यांस कांहीं जखमा फार मर्मस्थानीं लागल्या. राज्य-

कार्यांत इतकीं वर्षें राहूनही त्यांचें मन मानापमान विषयांत कोमल आणि नाजूक होतें. त्यास निसर्डे-पणा किंवा निगरगट्टपणा आला नव्हता. त्यामुळें हा राजकीय मार्गांत झालेला परिणाम त्यांच्या जिव्हाळीं लागला आणि त्या क्लेशांतच त्यांचा अंत झाला. याप्रमाणें आमच्या चरित्रनायकाच्या इंदूरच्या कारकीर्दीचें पर्यवसान झालें.

विनायकरावांचें राजमार्गांत झालेलें पतन त्यांच्या यशापेक्षां अनंत पटीनें अनुकरणीय, प्रशंसनीय आणि मनोहर आहे. रणवीर शूरांस धारातीर्थीं पतन जसें अत्यंत इष्ट व सद्गतिप्रद असतें, तशीच न्यायनीतीच्या रक्षणार्थ पडलेल्यांच्या स्थितीसही वीरगतीसारखीच शोभा येते. या दृष्टीनें विनायकरावांच्या अपयशानें त्यांच्या यशांत भरच पडते. त्यांनीं आपल्या मालकांस लिहिलेल्या शेवटच्या पत्रांत "माझ्या क्षमाशीलतेची परमावधि झाली" हें वाक्य लिहिलें आहे तें अक्षरशः खरें आहे. त्यांची वृत्ति खरोखर तशीच होती.

ता० ८ आक्टोबर सन १८९० इसवी रोजीं त्यांनीं इंदूर सोडलें. त्यांच्या यजमानांचे अत्यंत जिव्हाळ्याचे कांहीं अंमलदार खेरीजकरून बहुतेक बडे लोक त्यांस पोंचविण्यास स्टेशनावर आले होते. सर्वांस त्यांच्या जाण्यानें फार वाईट वाटलें यांत संशय नाहीं. यावेळीं विनायकराव मानसिक क्लेशांनीं आणि निराशेनें इतके व्याप्त झाले होते कीं, त्यांच्यानें ही वृत्ति पूर्णपणें दाबवली नाहीं. त्यांचें मुख अत्यंत म्लान आणि तेजोहीन दिसलें. त्यांनीं मोठ्या आदरानें सर्वांचा निरोप

घेतला; पण कोणाशीं विशेष भाषण केलें नाहीं. मार्गांतच त्यांस ताप भरला आणि कल्याणास जाऊन पोंचेपर्यंत त्यांस जुलाब व्हावयास लागले. पुढे औषधोपचारांनीं ते बंद झाले; पण दिवसेंदिवस त्यांची शरीरशक्ति झपाट्यानें क्षीण व्हावयास लागली. त्यांनीं पुष्कळ औषधें घेतलीं; हवा पालटण्याकरतां पुष्कळ स्थलांतरें आणि प्रवास केले; पण त्यांस बरें वाटेना. ते मुंबईस राहिले व पुढें सोलापुरास गेले. तेथें त्यांस थोडेसें बरें वाटलें. सोलापुरास असतांना एकदां ते एका सभेस गेले होते, आणि त्यांनीं त्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें, असें वर्तमानपत्रांत आलें होतें. तेथल्या कांहीं विद्वानांनीं त्यांचा मोठा आदर केला. तेथल्या एका इंग्रजी लष्करी वैद्यानें त्यांचा रोग असाध्य होय आणि त्यांचा अंत सहा महिन्यांत होईल, असें स्पष्ट मत दिलें. तें त्यांनीं मोठ्या शांत चित्तानें ऐकलें; परंतु दुःख होईल या भीतीनें तें त्यांनीं घरांत सांगितलें नाहीं. शेवटीं त्यांच्या मधुमेहाचें रूप बदलून त्यास " ब्राइट्स् डिझीज " हें रूप आलें. डाक्टरांनीं हात टेकले. वैद्यांचे उपाय खुंटले. वैदूंनीं कांहीं वनस्पतींचीं औषधें दिलीं, पण व्यर्थ. सर्वांचे उपाय हरले. आतां आपला अंत फार लांब नाहीं अशी त्यांची खात्री झाली. मरणास ते तयार होते. त्यांचीं मुलेंबाळें सर्व सुस्थितींत होतीं. कोणाबद्दल काळजी वाहण्याचें त्यांस प्रयोजन नव्हतें. पत्नीवर त्यांचें अत्यंत प्रेम होतें. तिच्या संगतींत त्यांची संसारयात्रा अत्यंत सुखदायक झाली होती. फार थोड्यांस असें दिव्य स्त्रीरत्न लाभत असेल. तरी

आतां शरीर क्लेशातिशयानें पूर्ण ग्रस्त झाल्यामुळें सर्व कांहीं सोडण्यास ते तयार होते.

अशा आसन्नमरण स्थितींत या उदारधीस इहलोक सोडण्याच्या पूर्वी अडीच महिने एक अत्यंत घोर आणि यातनामय आघात झाला, त्यामुळें आधींच पतनशील झालेला त्यांचा देह तत्काळ जमीनदोस्त झाला ! अगोदरच जीर्ण झालेला आणि पाळेंमुळें खणल्यासारखा हा देहरूप वृक्ष या झंझावातानें तत्काळ समूळ उपटून अस्ताव्यस्त पडला !

विनायकरावांस आठ मुलें झालीं. त्यांत चार लहानपणींच गत झालीं होतीं. एक मुलगा ६ वर्षांचा होऊन वारला. त्याचें दुःख त्यांस फार होत असे. त्याचा विसर पडण्यास त्यांस बरींच वर्षे लागलीं. याशिवाय अपत्यवियोग असा त्यांस अद्याप झाला नव्हता. त्यांचीं मुलेंही सुशिक्षित होतीं. कोणापासून त्यांस दुःख नव्हतें. सन १८८१ सालीं त्यांच्या वडील पुत्रास विषमज्वर होऊन त्यांतून वांचण्याची आशा नव्हती. त्यामुळें विनायकराव फार निराशेचे उद्गार काढीत असत. ते त्यांस दाबवत नसत. प्रभुसत्तेनें या दुखण्यांतून त्यांचा मुलगा उठला; पण तो आयात केवळ दहा वर्षे मात्र टळला. सन १८९१ च्या आगस्ट महिन्यांत त्यास पुन्हा विषमज्वर होऊन तो चाळीस दिवस राहिला. सर्व प्रकारचे औषधोपचार झाले. पण तापाचें पाऊल मागें पडलें नाहीं. अखेर सप्टेंबर महिन्यांत त्याचा अंत झाला.

यावेळीं विनायकरावांची शरीरव्याधि कळतास

पोंचली होती आणि ती अंतकाळाबरोबरच आपणास सोडणार हें त्यांस विदित होतें. अशा स्थितींत मुलाचें दुखणें असाध्य आहे असें समजल्यावर त्यांस फारच दुःख झालें. त्या भरांत "मरणापूर्वी हा पुत्रशोक मला होणार. या मुलानें जगांत काय तीं तीसच वर्षें काढलीं. या काळांत त्यानें जग तें काय पाहिलें? त्यांतलीं सुखदुःखें तीं काय भोगलीं? जगांत येऊन केलें काय? तर कांहीं नाहीं! ऐन उमेदींत जग सोडतांना त्याला किती कठीण वाटत असेल बरें? मी तर या जगांत बावन वर्षें काढलीं आहेत आणि कांहीं बराबाईट कार्यभागही केला आहे. मग मीं अंतकाळाच्या मोहानें किंवा शोकानें कां खचावें?" असें त्यांनीं बोलून दाखविलें.

या पुत्रशोकानें तर त्यांची कंबरच खचली. यावेळीं त्यांस प्रसिद्ध वक्ता बर्क याच्या पुत्रवियोगकाळच्या उद्गारांचें स्मरण होऊन ते तसेच उद्गार काढीत असत. यापुढें ते अडीच महिने जिवंत होते; पण तो काळ शरीरक्लेश आणि मानसिकयातना हीं भोगण्यांतच गेला. शेवटीं शेवटीं त्यांस खोकला चैन पडूं देईना. दिवस रात्र बसून काढावी लागे. पाठ टेकली कीं खोकल्यास उसळी येई. त्यांचे क्लेश पाहवत नसत, अशा संधींत त्यांचे कांहीं स्नेही--शांताराम नारायण, माधवराव बर्वे, गजाननराव भाटवडेकर--हे वारले. शांतारामाचे मरणाचें वर्तमान त्यांस कळल्यावर ते ह्मणाले "मीही त्याच मार्गांत आहे. मलाही तिकडे जाण्यास फार वेळ नको." भाटवडेकरांचें वर्तमान

दुःख होईल या भीतीनें मुद्दाम त्यांस कळविलें नाहीं. ता० १७ डिसेंबर रोजीं त्यांस सुस्ती वाटून त्यांची लघवी बंद झाली. अशा वेळीं त्यांस उपचार करणाऱ्या डाक्टरांपैकीं कोणीच घरीं नव्हते. शेवटीं डाक्टर दादाजी नाथाजी यांस बोलाविल्यावरून त्यांनीं येऊन त्यांस क्लेशमुक्त केलें, त्यामुळें ते बरेच शांत होऊन पडले.

मरणापूर्वीं सहा घंटे त्यांस शेवटचा घोर लागला. आणि ते डोळे मिटून पडले. नंतर त्यांस बोलवेना; क्षीणता वाढली; दम छाटेना. अशा वेळीं त्यांनीं खुणेनें कांहीं प्यावयास मागितलें. तेव्हां एका वाटींत त्यांस थोडेसें दूध दिलें. तेवढयानें त्यांची शेवटची काळरूप तहान न भागतां त्यांनीं कांहींस रोषानें आणखी पिण्यास खुणेनें मागितलें आणि तें मिळाल्यावर पिऊन ते डोळे मिटून पडले. अशा वेळीं त्यांचे कारभारी यांनीं जवळ जाऊन त्यांचा हात धरून हळूंच " मागची कोणाची चिंता करूं नका " असें त्यांस म्हटलें. त्यासरसा "अं:" असा उद्गार काढून त्यांनीं त्यांचा हात मागें सारला. त्यावरून " मला कोणाची काळजी नाहीं, किंवा तुमच्या म्हणण्यांत कांहीं जीव नाहीं, तें व्यर्थ आहे " अशासारखा त्यांचा मनोदय असावा असें व्यक्त होतें. यानंतर थोडया वेळानें तारीख १८ डिसेंबर सन १८९१ रोजीं त्यांचें प्राणोत्क्रमण होऊन ते स्वर्गसुख भोगण्यास गेले.

त्यावेळीं त्यांजपाशीं ना० माधवराव रानडे, रावबहादुर निळकंठराव कीर्तने वगैरे मंडळी जमली होती. त्यांचा अंत्यविधि साधाच झाला. ज्या पुरुषानें आजन्म

साधेपणाचें व्रत पाळिलें, राजवैभव भोगतांनाही ज्यांचा नैसर्गिक साधेपणा कसा तो सुटला नाहीं, राज्याधिकारावर असतांना ज्यांनीं न्यायनीतिपथ कधीं सोडला नाहीं आणि तसा प्रसंग येतांच ज्यांनीं त्या सर्वांवर पाणी सोडलें अशा महाशयाचा अंत्यविधि साधाच होणें योग्य होय असें कोण म्हणणार नाहीं ? अलीकडे प्रचारांत आलेला और्ध्वदेहिक क्रियेच्या वेळीं कोणी मित्रानें इतरांस उद्देशून मृतासंबंधानें भाषण करण्याचा प्रकार त्यावेळीं झाला नाहीं.

" टाइम्स ऑफ इंडिया " नामक सर्वप्रसिद्ध इंग्रजी पत्रानें विनायकरावांच्या मृत्यूचें वर्तमान लिहून त्या सुज्ञ पत्राच्या पद्धतीनुरूप त्यांत चरित्रनायकाच्या राज्यकार्यनिपुणतेपेक्षां त्यांच्या दोन सर्वमान्य नाटकग्रंथांविषयींच विशेष विस्तृत मार्मिक माहिती दिली होती. त्यावरून त्या विद्वान लेखकास त्यांच्या पूर्वोक्त पहिल्या गुणाहून त्यांच्या दुसऱ्या कृतीचाच गौरव आणि धन्यवाद अधिक इष्ट वाटला असावा असें दिसतें, आणि सर्व रसिक, मार्मिक, आणि सहृदय विद्वान लोकांस हें मत निर्विवादपणें मान्य झालेंच पाहिजे, असें माझ्याही अल्पमतीस वाटतें.

विनायकरावांचा बांधा साधारण उंच होता. त्यांची जवळ जवळ ५ फुट ९ इंच उंची होती. त्यांचा वर्ण निमगोरा, चेहरा साधारण वाटोळा, अतिगंभीर, सकृद्दर्शनीं भयप्रद, उग्र, पण सहवासाअंतीं शांत, प्रसन्न आणि तेजस्वी वाटून त्याबद्दलचा प्रथम ग्रह कांहींसा कमी होत असे, पण तो समूळ नाहींसा होत नसे. निरंतर वाचन आणि विचार यांत मग्न राहिल्या-

मुळें त्यांस फारसें बोलणें आवडत नसे. शांततेची त्यांस अत्यंत आवड असे. समाजांत किंवा मंडळींत फारसें जाणें त्यांस पसंत नसे. परंतु निवडक मित्रमंडळींत ते मोकळ्या मनानें बोलत असत. माधवराव कुंटे, ना० माधवराव गोविंदराव रानडे, रावब. विठ्ठलराव पाठक, वामनराव मोडक, इत्यादि सहाध्यायी मंडळी, गणेशशास्त्री गोळवलकर, रामजी विठ्ठल वकील, वासुदेव महादाजी नाझीम वगैरे इंदूरचे कामगार, जनार्दनपंत गाडगीळ, आनंदराव बर्वे, रामभाऊ उदास, अशा इतर कामगारांच्याबरोबर त्यांचा भाषणप्रकार, वादविवाद, हास्यविनोद, थट्टामस्करी इत्यादि प्रकार होतांना पाहण्यास मिळत; पण इतरांशीं ते कामापुरताच संबंध ठेवीत असत आणि त्यांच्याशीं बोलणें अगदीं बेताबाताचें, जरूर लागेल तेवढेंच असे. त्यांच्याशीं सलगी करणें केवळ अशक्यच वाटत असे. यत्किंचित् अधिकउणा शब्द कोणाच्या तोंडांतून निघाला तर त्यांस तो खपत नसे; पण त्याबद्दल स्तब्धपणानेंच ते नापसंती दाखवीत असत. उघड शब्दांनीं ती व्यक्त करणें त्यांस मान्य नसे. भाषण करण्यांत त्यांचें तेज सामान्य श्रोत्यांवर विशेष पडत नसे. त्यांची वाणी अस्खलित वाहत नसे. सावकाश बोलण्याचा त्यांचा प्रघात होता आणि मध्यंतरीं विचार करण्यास्तव त्यांस थांबावें लागत असे. पण त्याचा आशय अत्यंत मार्मिक, गूढ, चिकित्सापर, सन्मार्गवर्ती, प्रगतिप्रद असून त्यापासून शोधक आणि सुज्ञ श्रोत्यांस पुष्कळ नवीन गोष्टी कळत असत. सभाधीटपणा त्यांच्यांत फारसा नव्हता.

सभेंत बोलतांना त्यांची अंतर्गत क्षुब्धता त्यांच्या वाणी-वरून व्यक्त होत असे. त्यांचा पोषाख साधा, पण त्यांच्या थोर पदवीस साजेसा होता. बडोद्यास गेल्यावर कचेरीस जातांना ते पायजमा घालीत असत. इंदुरास असतांना ते इंदुरशाई पागोटें घालीत असत. पुढें बडोद्यास गेल्यावर पुणेशाई पागोटें घालीत. इंग्रजी तऱ्हेच्या कोटपाटलुनांची त्यांस आवड नसे. रेशीमकांठी धोतरें त्यांनीं कधीं वापरलेलीं दिसलीं नाहींत. प्राय: दक्षिणी जोडाच ते घालीत असत. बडोद्यांत मात्र सरकारदरबारांत जातांना इंग्रजी बूट घालीत आणि अंगावर शुभ्रकांठी उपरणें घेत असत.

वातानें त्यांचें शरीर सुटलें होतें आणि गात्रें शिथिल झालीं होतीं. मोठ्या जोखमीचीं आणि जबाबदारीचीं कामें केल्यामुळें आणि शरिरीं नेहमीं असमाधान राहिल्या कारणानें वयाच्या मानानें त्यांचें शरीर अधिक थकल्यासारखें त्यांच्या मुद्रेवरून दिसे. बहुधां पलंगावर पडून किंवा आरामखुर्चीवर लेटून वाचण्याची त्यांस संवय पडली होती. शेक्सपियर, स्कॉट, डिकिन्स, थ्याकरे, मेकाले, गोल्डस्मिथ, जानसन हे त्यांच्या आवडीचे ग्रंथकार असत. त्यांत डिकिन्सच्या कादंबऱ्या तर त्यांनीं कितीदां वाचल्या असतील याचा नेम नाहीं. दर वर्षसहा महिन्यांनीं त्यांचे ग्रंथ पुन्हा पुन्हा ते वाचीत असत. जानसनच्या कविचरित्रावरही त्यांची फार भक्ति होती. या सर्व ग्रंथकारांच्या कृतींशीं त्यांचा दृढ परिचय होता. पूर्ण सहृदयतेनें त्यांचीं पारायणें करून ते तल्लीन होत असत.

विनायकरावांस साधें जेवण फार आवडे. तिखट-मिठावर त्यांची भक्ति फार असे. गोड पदार्थांवर त्यांची भक्ति फारशी नसे; पुढें मधुमेहाच्या रोगामुळें गोड खाणें त्यांस बहुतेक वर्ज्यच झाल्यासारखें होतें. दुसऱ्याचे घरीं जेवण्यास जाण्याचा त्यांस कटाळा असे; परंतु त्यांची मित्रमंडळी त्यांच्या घरीं आमंत्रणावांचून येई तेव्हां त्यांस आनंद वाटे. त्यांचें त्यांस अगत्य असे.

त्यांचा स्वभाव फारच धिमा, गंभीर आणि भारदस्त होता. बरोबरच्या मित्रमंडळीशीं मात्र ते मोकळ्या मनानें बोलत आणि प्रसंगविशेषीं विनोदात्मक भाषणही करीत; पण इतरांपुढें त्यांची गंभीर वृत्ति ढळत नसे. कधीं कधीं प्रसंगानुसार ते स्मितहास्य करीत, पण त्याहून अधिक हृदयोर्मि फारच क्वचित उचंबळतांना दिसत असत. पत्नीवर आणि मुलांवर त्यांचें अत्यंत प्रेम असे; पण तें पुष्कळ अंशीं फारसें परिस्फुट होत नसे. इतर आप्तांवर आणि स्वकीयांवरही त्यांचें बरेंच प्रेम असे आणि त्यांचें ते अगत्य बाळगीत असत. पण निरुद्योगी, परावलंबी आणि पोटभरू लालची स्वकीयांचा त्यांस मनापासून तिरस्कार होता. स्वावलंबनावर त्यांची फार भिस्त होती. आप्तपणाचा फाजील फायदा घेण्याचा आमच्या समाजांत बराच प्रघात आहे. तो त्यांस मुळींच पसंत नसे. पण अशा लोकांसही ते शब्दानें फारसें दुखवीत नसत. त्यांनीं अगदीं विन्मुख असें कोणासही परत पाठविलें नाहीं. त्यांस अल्प साह्य देऊन हितकारक उपदेश ते करीत असत. कित्येक होतकरू तरुण आप्तांस व पर-

त्यांस विद्यार्जनाकरितां मुद्दाम आपल्या घरीं ठेवून त्यांच्या भावी आयुष्यमार्गास त्यांनीं सुवळण लाविलें होतें. अशा वर्गांतीलच प्रस्तुत लेखक एक आहे, हें मोठ्या कृतज्ञतापूर्वक येथें नमूद करण्यास त्यास मोठा आनंद वाटतो. या दिशेनें त्यांस मोठी हौस असून ती अत्यंत अनुकरणीय होती.

मराठी वाचनाची त्यांस मुळींच गोडी नव्हती. मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिकें त्यांच्या घरीं पुष्कळ येत असून त्याबद्दल सालाचा २०० रुपये खर्च होत असे. परंतु टाइम्स ऑफ इंडिया पत्राशिवाय इतरांस ते कधीं शिवत नसत. सन १८६५ सालपर्यंत प्रसिद्ध झालेल्या काव्यें, नाटकें वगैरे ग्रंथांचीं मराठी भाषांतरें त्यांनीं वाचलीं असावीं, असें त्यांच्या ज्ञानप्रसारक मासिक पुस्तकांतल्या मराठी निबंधावरून वाटतें. पण यापुढें मराठी पुस्तक हातीं धरतांना मीं त्यांस कधीं पाहिलें नाहीं. परशरामपंत गोडबोले यांचें केकादर्श त्यांनीं वाचलें होतें, आणि नवनीतही केव्हां केव्हां चाळतांना मीं त्यांस पाहिलें आहे. “ थोरल्या बाजीरावाचें चरित्र” (वापट कृत) वाचलेलें त्यांनीं ऐकलें होतें; पण तें मार्मिक टीकापर किंवा चिकित्सापर आहे असें त्यांस वाटलें नाहीं. त्यांतली भाषा मात्र चांगली आहे असें ते बोलले. “ छत्रपति शिवाजी आणि राजगुरु दादोजी कोंडदेव ” हें पुस्तक त्यांच्या कर्त्यानें त्यांस पुण्यास स्वतः वाचून दाखविलें होतें. त्यांतला कांहीं भाग त्यांस पसंत पडून “ तो आपणा स्वतःस इतका चांगला लिहितां आला असता कीं नाहीं याबद्दल

शंका आहे " असे उद्गार त्यांनीं काढल्याचें रा. बापट यांनीं खुद्द मला डंभई मुक्कामीं सांगितलें होतें. याशिवाय इंदुरास आजारी असतां मंजुघोषा, विश्वासराव वगैरे कांहीं कादंबऱ्या मुलांकडून वाचवून त्यांनीं ऐकल्या होत्या; पण त्या त्यांस आवडल्या नाहींत. त्या शेवटपर्यंत ऐकण्याचाही त्यांस कंटाळा येई. " गोविंदराव अथवा सुशिक्षणाचें फळ " हें पुस्तक त्याच्या कर्त्यानें अभिप्रायाकरितां इंदुरास पाठविलें होतें. तें त्यांच्या वडील मुलानें त्यांस वाचून दाखवून त्यावर त्यांचें मत लिहून घेतलें होतें. तेंही त्यांनीं इंग्रजींतच दिलें असून बरेंच अनुकूळ होतें. त्यांस मराठी लिहिण्याचा अलीकडच्या नवीन विद्वानांप्रमाणें तिरस्कार नव्हता. सरकारी कामाच्या प्रकरणांतले कांहीं मोठे मोठे वादग्रस्त निकाल आणि ठरावही ते पुष्कळ वेळां मराठी भाषेत लिहीत असत. त्यांतला एक " सरस्वतिमंडल " पुस्तकांत छापला आहे.

संस्कृत काव्यें व नाटकें मुळांत समजण्याइतकें त्या भाषेचें ज्ञान त्यांस नव्हतें. फारशी भाषा ते इंदुरास शिकले होते; पण त्यांतल्या इष्कबाज कवितांचा त्यांस वीट येऊन त्यांनीं त्या ग्रंथाकडे पुन्हा पाहिलें नाहीं.

मनुष्यस्वभावाचें ज्ञान त्यांस अत्युत्तम होतें. त्यांच्यासारख्या सरळ स्वभावाच्या आणि सन्मार्गवर्ति पुरुषानें आपल्या इंग्रजी कादंबरींत " अंजु नायकिणी " दिवाणखान्यांचा दरवाजा आणि त्यांतल्या छटेल लोकांचें इतकें खुबीदार पण यथार्थ केलेलें वर्णन वाचलें म्हणजे वरील गोष्ट सहज उघड दिसते. ते स्वतः फारसे

खर्चिक किंवा सढळ हाताचे असे नव्हते. तरी प्रसंगोपात्त योग्य खर्च करण्यास ते मागेंपुढें पहात नसत. विशेषतः होतकरू विद्यार्थ्यांस आश्रय देण्यास त्यांस हौस वाटे. जीवनार्थ कलहांत झुंजण्यास कार्यक्षम करण्याच्या कामीं साह्य देण्याचा त्यांस हव्यास होता.

त्यांचें मन मूळचें कोवळें होतें; पण पुढें जगाच्या उग्र कपटपटुत्वाचा पुष्कळ अनुभव आल्यामुळें तें कांहींसें कठोर आणि अविश्वासी झालें होतें. दिसण्यांत आणि असण्यांत असलेलें अंतर अनुभवाअंतीं पूर्णपणें प्रत्ययास आल्यानें, त्याचप्रमाणें जगांत फसविण्याचा व्यापार जारीनें सुरू असलेला कळून ते फार सावध आणि चप्पु झाले होते. वरून त्यांचें आचरण पाहिलें तर तें साधें भोळसरपणाचें भासे; परंतु कोणत्याही बाबतींत चिकित्सा सुरू केली म्हणजे तिचें सर्व निरीक्षण करून त्यांतल्या खांचाखोंचा, पळवाटा, फसण्याच्या वाटा, इत्यादि सर्व प्रकारांची विचक्षणा मार्मिकपणें करण्याचा त्यांचा प्रघात असे. यावरून त्यांचें व्यवहारज्ञान किती प्रखर होतें तें दिसे. सरळ आणि अनुभवशून्य पुरुषास त्यांचें मन कुत्सित आहे असा भास होई. व्यवहारज्ञ मनुष्य मात्र त्यांस असा दोष खास देणार नाहीं.

धर्मसंबंधांत ते आस्तिक होते. परमेश्वरावर त्यांचा भाव होता; परंतु ते कर्मठ किंवा धर्मभोळे नव्हते. या विषयाचा त्यांनीं आस्थापूर्वक असा अभ्यास मुळींच केला नव्हता, त्यामुळें त्यावर त्यांचीं कायमचीं काय मतें बनलीं होतीं हें सांगतां येत नाहीं. धाकट्या पिट्टप्रमाणें या विषयावर त्यांस जें कांहीं वाटे तें सर्व बाहेर बोलून दाखविणें

त्यांस पसंत नसे. परंतु गणेशशास्त्री यांजबरोबर कांहीं दिवस बडोद्यास ते संध्याकाळीं ज्ञानेश्वरी वाचीत असत आणि त्यांच्याशीं या विषयावर वादविवादही करीत; त्यावरून त्यांच्या मनाचा कल अज्ञेय वादाकडे किंवा निरीश्वरपणाकडे कांहींसा असावा, असा एकेकाळीं माझा ग्रह झाला होता. तथापि ते आस्तिक होते; कारण आजारीपणांत ते देवाचें नांव घेत आणि त्याची प्रार्थना कांहीं वेळा करतांना मीं पाहिलें आहे. त्यांच्या बसण्याच्या खोलींत तुकारामाची गाथा ठेवलेली दिसे, आणि ती लहर लागेल तेव्हां ते स्वत: वाचीत किंवा जिवास समाधान नसलें तर मुलांस वाचण्यास लावून ती स्वस्थपणें ऐकत असत. पण त्या विषयावर त्यांचा सतत व्यासंग नव्हता. गणेशशास्त्री कडीपट्टणास निघून गेल्यावर, त्यांचें ज्ञानेश्वरीचें वाचन सुटलें तें सुटलें. तुकोबाचे भक्ति-रसाच्या उकळीनें भरलेले अभंग ऐकले म्हणजे ते पुन्हां पुन्हां वाचण्यास सांगून कांहीं चरण आपल्या तोंडानेंही ते म्हणत. मोरोपंताची केकावलीही वाचण्यास सांगत आणि त्यांतली "कृतांतकटकामलध्वज जरा दिसूं लागली" ही केका मोठ्या कळवळ्यानें आणि पूर्ण तादात्म्य पावून म्हणतांना अनेक वेळां मीं त्यांस पाहिलें आहे. एकंदर विचार करितां त्यांचीं मतें एकेश्वरी पंथाचीं किंवा "युनिटेरियन" या दिशेकडचीं होतीं; पण त्या समाजांत ते कधीं नेहमीं गेले नाहींत. कधीं व्याख्यानप्रसंगीं गेले असले, तर माहित नाहीं.

धर्माचारांत पाहिलें, तर स्नान केल्यावर चार आच-

मनें करण्याचा त्यांचा सांप्रदाय असे; याहून अधिक असें धर्माचरण त्यांनीं कधींच केलें नाहीं. त्यांची स्त्री अति भाविक, कर्मनिष्ठ आणि धर्माचारपरायण असल्यामुळें कधीं कधीं कांहीं धर्मविधींत तिच्याकरितां ह्मणून त्यांस कांहीं कार्यभाग करावा लागे. पण तो सुद्धां ते मोठ्या जुलमानेंच करीत. उघड धर्मबाह्य व विपरीत दिसणारे नामधारी धर्माचार सामान्यजन-विरोध नडत नसेल, तर ते करीत नसत. पण या धर्म-विषयाचें महत्व त्यांस एक तर विशेष वाटलें नसावें, किंवा कार्यबाहुल्यामुळें त्याचा व्यासंग करण्यास त्यांस फावलें नसावें, ह्मणून त्याचा योग्य विचार त्यांच्या हातून घडला नसेल, ही गोष्ट सत्य आहे. पण धर्म-सुधारणेस ते प्रतिकूळ नव्हते, असें या बाबतींत माधव-राव कुंटे याच्यांशीं बडोद्यास बोलत असतां त्यांनीं व्यक्त केलें होतें.

समाजसुधारणेस त्यांचीं मतें पूर्ण अनुकूळ होतीं. बालविवाह त्यांस संमत नव्हता. विधवाविवाह त्यांस फार इष्ट वाटे. स्त्रीशिक्षणास ते पूर्ण अनुकूळ होते. हीं सर्व मतें त्यांनीं आपल्या इंग्रजी कादंबरींत व कांहींशीं जयपाळ नाटकांत दिग्दर्शन रूपानें निर्दिष्ट केलेलीं आहेत. ब्राह्मणांच्या पोटजातींत बेटीव्यवहार सुरू असावा असें त्यांस वाटे. ३०० कुटुंबें या संबंधांत एक-मताचीं असलीं, तर आपण त्यांत सामील होऊं, असें ते एकदां बोलले होते. पण अलीकडील नवीन विद्वानांची यासंबंधांत नुसती तोंडपाटिलकी व स्वतः करण्याची वेळ आली कीं पाय गाळण्याचा प्रघात त्यांस

निंद्य वाटे, यामुळें सुधारणेची पीछेहाट होते, असें एकदां दि० ब० अंबालाल साकरलाल देसाई यांच्याशीं बोलतांना मीं ऐकलें आहे. त्यांनीं आपल्या सर्व मुलांचे विवाह सोळाच्या पुढें आणि मुलींचे दहाच्या सुमारास केले होते. विनायकराव प्रगमनशील-समाजसुधारणा-पक्षाचे पूर्ण अभिमानी होते. त्यांचे वडील चिरंजीव देवाधीन झाले, तेव्हां पुण्यास शुक्लपक्ष व कृष्णपक्ष या तटांचा कडाका उडून राहिला होता. तेव्हां मुलाच्या अंत्यविधिसमयीं महापूज्य ब्रह्मवृंद कांहीं आडकाठी आणील व प्रायश्चित्ताची पंचाईत पडेल, अशी भीति होती. कारण कीर्तन्यांचें घर शुक्लपक्षांत घातलें होतें. अशा प्रसंगीं विनायकरावांनीं त्याच्या शवास मंत्राग्नि देण्यास नड आली तर भडाग्नि द्या, पण त्यास प्रायश्चित्त देऊं नका असें निक्षून स्वतः मरणाच्या दारीं उभे असतांना देखील सांगितलें. यावरून त्यांचा इष्ट मताभिमान पूर्ण व्यक्त होतो.

विनायकरावांचीं राजकीय मतें उदार ( Liberal ) पक्षाचीं होतीं. सांप्रतची अनियंत्रित राजसत्ता त्यांस मान्य नव्हती. लोकपक्षास ते विशेष अनुकूळ असत आणि बहुमताचें समर्थन करीत. राजसेवेत त्यांचा इतका उदय झाला व ऐश्वर्य मिळालें, तरी तिजविषयीं त्यांचा कटाक्षच होता; आणि आपल्या मुलांनीं हिचें तोंड पाहूं नये, अशी त्यांची इतकी अत्युत्कट इच्छा होती कीं मरणापूर्वी थोडे दिवस आपल्या दुसऱ्या मुलास १०००० रुपये भांडवल देऊन त्याच्याकडून एक धान्याचें दुकान काढलेलें त्यांनीं पाहिलें,

तेव्हां त्यांचा जीव थंड झाला. राजसेवेविषयीं त्यांचा अनादर थोडा विलक्षण वाटतो; पण " चरितार्थ-दात्या आयुर्मार्गाविषयीं असाच अनादर प्रायः सर्वत्र वसत असतो " हें डाक्टर गोल्डस्मिथचें विधान अनुभवसिद्ध नाहीं, असें कोण म्हणेल ? इंदूरचे प्रसिद्ध मृदंगवादनपटु नानासाहेब पानसे यांचा आपल्या कलेच्या नैपुण्याबद्दल हिंदुस्थानभर इतका लौकिक होता, त्या कामांत त्यांस पैसाही पुष्कळ मिळाला, राजाश्रय मिळाला, राजदरबारीं मान मिळाला सर्व कांहीं झालें, पण त्यांच्याठायीं या कामाबद्दल इतका अनादर होता कीं, आपल्या एकुलत्या एका मुलानें या हलक्या कामांत पडूं नये, ह्मणून ती कला त्यास न शिकविण्याचा त्यांचा निश्चय होता. पण श्री० तुकोजीराव महाराजांनीं " तुमचें पूज्य नांव या दिशेनें मागें ठेवणें तुमचा धर्म आहे " असा योग्य बुद्धिवाद देऊन त्यांस त्या कलेंत आपल्या मुलाला निपुण करण्यास भाग पाडलें. हाच प्रकार बहुतेक जगांत सर्वत्र आढळतो.

राजकुलीन मोठे लोक, सरदार, दरकदार, मानकरी, वगैरेंच्या सहवासांत विनायकराव पुष्कळ आले. त्यांच्या दिखाऊपणापेक्षां त्यांचे अंतर्गत गुण बिंगें, अंतर्गत खरी स्थिति इत्यादि प्रकार त्यांस चांगले विदित झाले होते. तेव्हां या विषयावर त्यांचें मत काय होतें हें जाणण्याची सर्वांस इच्छा होईल. पण या बाबतींत त्याचा यथार्थ परिस्फोट इष्ट नाहीं आणि तें करणेंही कठीण आहे. कारण, एक तर या विषयावरचीं त्यांचीं मतें त्यांनीं का-

गदावर दाखल केलेलीं नाहींत. त्यांच्या भाषणावर, व वादविवादावर भिस्त ठेऊन जो मनावर ठसा उमटला त्यास अनुसरूनच या प्रकरणावर लिहावें लागणार. तेव्हां तो यथारूपच कागदावर उठेल किंवा त्यांत स्वमताची मिसळ होईल, याची मला खात्री नाहीं. दुसरें, संपत्ति, राजसत्ता, लक्ष्मी यांशीं कशानेंही शमन न पावणाऱ्या क्रोधाचेंही साहचर्य सदैव भरलेलें असतें; त्यामुळें या दिशेनें जाणें भयंकर आहे. तथापि जिज्ञासु वाचकास या प्रश्नाचें थोडेंसें खरें स्वरूप पाहणें असेल, तर त्यास डा० जॉनसन कृत " सॅव्हेजचे चरित्रां " त चरितनायकाचीं विलायतेंतल्या लॉर्डांबद्दलचीं मतें दिलेलीं आहेत त्यांत तें दिग्दर्शन पाहण्यास मिळेल. त्याचा निर्देश विनायकरावांनीं कुटयांपाशीं केलेला मला स्मरतो. या वर्गाबद्दल त्यांचा अनुकूळ ग्रह नव्हता आणि त्यांचा सहवासही त्यांस इष्ट वाटत नसे. त्यांपासून खऱ्या देशोन्नतीची फार थोडी उमेद आहे, असें ते बोलत. त्यांच्या सुशिक्षणाबद्दल त्यांस मोठीशी आशा नव्हती. त्यांच्या दुर्गुणातिशयापुढें त्यांचें वैभवही कांहीं कामाचें नाहीं, असे त्यांनीं कधीं कधीं उद्गार काढलेले आहेत. " या राजमार्गांत ज्यांचें मुखावलोकन केलें, तर सचैल स्नान करावें, त्यांचे पाय धुवावे लागतात " असें ते केव्हां केव्हां त्रासून बोलत. आतां श्रीमंत तुकोजीराव महाराज होळकर, सयाजीराव महाराज गायकवाड, अशा कांहीं मान्य, थोर, राजकर्त्या पुरुषांविषयीं त्यांचा बराच आदरभाव होता हें खरें; पण साधारणतः या एकंदर वर्गाबद्दल वरील मतच त्यांच्या ठायीं दृढ होतें. राज-

गुरुपद सुटून त्यांस दुसरी जागा मिळाल्यावर आणि त्यांच्या पहिल्या जागेवर सर माधवरावांचे चिरंजीव आनंदराव यांची सन १८७३ सालीं योजना झाल्यावर ते ह्मणाले " या कामांतून मी एकदा धडपणें निघालों, यामुळें माझे गंगेंत घोडे न्हाले. "

आतां निःपक्षपातानें विनायकरावांच्या स्वभावांतले दोष व व्यंगेंही सांगणें रास्त व न्याय्य आहे; कारण ते देव होते, असें मीं कोठेंच ह्मटलें किंवा दाखविलें नाहीं. ते जर मनुष्य होते तर निर्दोषता त्यांच्या ठायीं स्थापणें वस्तुस्थितीस अनुरूप होणार नाहीं; परंतु त्यांचे दोषही गुणांचे आनुषंगिकच होते. त्यांचा गंभीरपणा, धिमेपणा, मितभाषीपणा, संकोचवृत्ति, खोलपणा इत्यादिकांचें वर्णन वर दिलेंच आहे. या वृत्तीचेच साथी असे दोष जे खुनशीपणा, मनाची अप्रसन्नवृत्ति, गढूळपणा त्यांचाही अंमल कधीं त्यांच्यावर बसत नव्हता असें नाहीं. एखाद्याविषयीं त्यांचा एकदां वाईट ग्रह झाला म्हणजे मग तो फिरून नीट होणें पुष्कळ वेळां अशक्यच होत असे. मग त्या माणसाचें दर्शनही त्यांस खपत नसे. त्याची भेट घेण्याची ते टाळाटाळ करीत. तो अवचित पुढें आला तर ते त्याच्याकडे पहात नसत. कांहीं तरी पत्र किंवा पुस्तक हातीं घेऊन त्यांत आपण मग्न आहों असें दाखवीत आणि त्याच्या भाषणास "हो, ना," याहून जास्त उत्तर देऊन शब्द व्यर्थ खर्चीत नसत. " जें कांहीं सगळें चकाकित दिसे तें सर्व सोनें नसे " या टीकात्मक लेखांत त्यांचा स्वभाव "खोलच खोल, कुजट, खोंचट, कुत्सित," असा ह्मटला आहे. त्यांत

जरी पुष्कळ अतिशयोक्ति आहे, तरी तो सर्वथैव असत्य नाहीं. त्यांतला मूळांश त्यांच्यांत मुळींच नव्हता असें नाहीं. त्यांचे बंधु अप्पासाहेब कीर्तनें एकदां या मुद्यावर बोलतांना मला ह्मणाले " आमच्या विनायकरावावर दुराग्रहाचा अंमल मुळींच बसत नाहीं असें नाहीं व तो चांगला समूळ निघतही नाहीं. युक्तिवादानंतर आपलें ह्मणणें फारसें खुषीनें ते सोडीत नाहींत; जुलमानें कबूल होतात. त्याचप्रमाणें दुसऱ्याचें तेज आपल्यापुढें विशेष पडूं नये अशा प्रकारचा मत्सरभावही त्यांच्यांत अगदीं अदृश्य आहे असें नाहीं. त्यांचें तेज कधीं कधीं बाहेर येतें, पण तें फार मंद असतें, यांत मात्र संशय नाहीं. केव्हां केव्हां दुसऱ्याचा लेख उगीच फिरवून त्याच अर्थाचा दुसरा मसुदा ते करून देतात " ( या मुद्यावर मतभेदाचा आक्षेप संभवनीय आहे. ) ही टीका त्यांच्या बंधूंनीं केवळ परीक्षण बुद्धीनेंच केली. कारण या उभयतांत परस्पराविषयीं आदरभाव आणि प्रेम हीं फार वसत होतीं. म्हणून त्यांनीं उपरोध बुद्धीनें हें मत देणें संभवनीय नाहीं.

दुसरा दोष तुसडेपणा हाही त्यांच्यांत दिसे. मनुष्यप्राण्याविषयीं सहानुभूति त्यांच्याठायीं बरीच कमी होती असा भास होई. नेपोलियन बोनापार्टाप्रमाणें मनुष्याविषयीं त्यांची हीनवृत्ति प्रसंगोपात्त दिसे. त्यांस कोणाचें प्रेमाकर्षण नीट करतां येत नसे. प्रत्यक्ष त्यांचीं जीवप्राण मुलेंना ! पण तींही त्यांच्याशीं निर्धास्तपणें सलगी करण्यास भीत. त्यांचे वडील चिरंजीव मजपाशीं एकदां ह्मणाले " आमच्या आईबद्दल जशी आमच्या

मनांत प्रेमाची उकळी फुटते तशी आमच्या बाबांबद्दल आमच्या मनांत फुटत नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें. पण काय करूं ! त्यास उपायच नाहीं. जबरीनें ती येणार कशी ! ती स्वभावतः आली पाहिजे." उघडच आहे. ज्या माणसाबद्दल भीति वाटते, त्याच्याबद्दल निर्मळ प्रेम जागृत होणें दुरापास्त होय. आतां या वृत्तीबद्दलची जबाबदारी सर्वतोपरी त्यांच्या स्वभावावरच नाहीं. ती कांहीं परिस्थितीचाही परिणाम होय. त्यांस वैभवस्थिति फार दिवस लाभली होती. त्या स्थितींत त्यांचा अनेक आशाबद्ध, लालची, स्वार्थपर, लोचट अशा जनांशीं संबंध फार आला, त्यामुळें ही वृत्ति बळावली असेल. आणि त्याबद्दल जगाचा पुष्कळ अनुभव घेतलेला पुरुष त्यांस विशेष दोष देईल असें मला वाटत नाहीं. जगाच्या अनुभवाअंतीं मूळची प्रेमळवृत्ति कायम राहणें केवळ दुरापास्त आहे व त्यांत तुसडेपणाचा प्रादुर्भाव न होणें हेंही अशक्यच होय. मग वैभवसंपन्न पुरुषास असा विकार जडला तर त्यांत त्याचा काय दोष ?

एकंदर विनायकरावांच्या स्वभावाचें आकलन केलें तर त्यांचा स्वभाव डॉ. गोल्डस्मिथच्या स्वभावाशीं उलट होता असें दिसतें. मेकालेनें गोल्डस्मिथचें स्वभाववर्णन करून त्याचा मथितार्थ काढला कीं " त्याच्यांत प्रेमभाव जागृत करणारे गुण पुष्कळ होते; पण पूज्यभाव प्रदीप्त करणारे फारसे किंवा मुळींच नव्हते. " विनायकरावांची वृत्ति याच्या बरीच उलट होती. म्हणजे तींत

पूज्यभावजनक गुण अनेक असून प्रेमभावोत्पादक असे त्या मानानें थोडे होते; मुळींच नव्हते असें मात्र नाहीं.

विनायकरावांस वंशपरंपरेनें जहागीर किंवा इनाम मिळणें बरेंच अमान्य होतें. थोरपणा हा स्वगुणावर अवलंबून असावा, वंशावर नसावा, असें त्यांचें मत असे. कारण दर पिढीस अशा जहागिरदारांच्या मूळ पुरुषाचे दिव्य गुण नष्ट होऊन त्याच्या वंशजांत दुर्बलता, दुराचार, दुर्गुण इत्यादिकांचें प्राबल्य होतें. त्यांस जहागिरीची सनद मिळत नाहीं, तर दुराचाराची, ऐषआरामाची आणि अनीतीची सनद मिळते, असें त्यांनीं एकदां माधवराव कुंटयांपाशीं म्हटल्याचें मला स्मरतें. तथापि त्यांस राजगुरूंच्या प्रीत्यर्थ एखादा गांव इनाम मिळावा ही इच्छा होती. ती त्यांच्या ऐहिक वृत्तीची दर्शक होय. ती सफळ न झाल्यामुळें त्यांस वाईट वाटलें नाहीं असेंही नाहीं. ते नेहमीं आपल्या मताप्रमाणेंच चालत, असें मी म्हणत नाहीं.

त्यांस इनामाची किंवा जहागिरीची वाटणी होणें पसंत नव्हतें. ती कोणा एका योग्य पुरुषास मिळून बाकीच्यांनीं स्वावलंबनावर चरितार्थ चालवावा असें ते म्हणत. एकदां ते म्हणाले कीं “ ह्या जहागिरीच्या वाटण्या होतां होतां सर्वच भिकेस लागतात. आमच्या येथें एक जहागिरदार आहे, त्याच्या पूर्वजांस एक हजार बाराशें रुपयांच्या उत्पन्नाचा गांव इनाम मिळाला होता; पण आतां त्यांत ७५ वाटे होऊन त्याच्या वाटणीस सालाचे ३२ रुपये येतात. त्यामुळें त्याच्या नशिबीं शिपायाची चाकरी करणें आलें आहे ! ”

विनायकराव आपलीं मतें फारशीं तोंडाबाहेर काढीत नसत. त्यांचे कनिष्ठ बंधू रा० ब० निळकंठराव कीर्तने यांस वादविवादाची मोठी हौस असे. पण त्यांच्याशींही ते फार मोकळ्या मनानें आपलीं मतें स्पष्ट देत नसत. बहुतेक " हो ना, " यावरच वेळ मारून नेत. त्यांच्या इतर मित्रांशींही सार्वजनिक प्रश्नावर बोलतांना मीं फारसें पाहिलें नाहीं. फक्त गणेशशास्त्री गोळवेलकर व माधवराव कुंटे यांच्याशीं ते अशा विषयांवर बोलल्याचें मला माहीत आहे. कुंटे हे बडोद्यांत दोनदां त्यांच्या घरीं सुट्टींत कांहीं दिवस येऊन राहिले होते. त्यांच्याशीं विनायकरावांची सलगी विशेष होत असे. हा प्रकार कधीं कधीं मोठा मजेचा होई. कुंटे हे इंग्रजी स्वतंत्र राज्यांत वागलेले असून त्यांच्याठायीं मनाचा मोकळेपणा, स्पष्टवक्तेपणा, चिकित्सा, चौकसपणा, टीकापरता, हे प्रकार विशेष दिसत. त्यांची विद्वत्ता, अनेक विषयांत निपुणता, दीर्घोद्योग, अव्याहत व्यासंग, बहुश्रुतपणा, इत्यादि गुण सर्वश्रुत आहेत. त्यांचा दिलदारपणा, साधेपणा, स्वाभिमान हींही फार आश्चर्यकारक होतीं त्यांच्या बरोबरीचे वक्ते तर मुंबई इलाख्यांत थोडेच मिळतील. विनायकरावांचा प्रकार त्याहून वेगळा होता. त्यांचे बरेच दिवस संस्थानांत गेले होते. त्यामुळें त्यांचा स्वभाव गंभीर, मितभाषी, संकोचित, रूक्ष व धिमा बनला होता. "शब्द सत्यार्थाचें गोपन करण्यासाठीं केलेले आहेत" या म्हणीचा प्रभाव त्यांच्यावर बराच बसला होता. अशा स्थितींत कुंटयांपुढें त्यांची थोडी तारांबळ उडे असें भासे. माधवराव एकदां

विषय निघाल्यावर आपला अभिप्राय बेधडक स्पष्टपणें देण्यांत भीड मुर्वत ठेवीत नसत. राजकीय मार्गांतलीं व्यंगें व राज्यव्यवस्थेंतले दुर्गुण यांवर ते उघड टीका करीत. इतक्या स्पष्टोक्तीची विनायकरावांस संवय नव्हती. कुटयांच्या भाषणावर आक्षेप घेण्यास त्यांस संकोच वाटे, आणि त्यांस संमति द्यावी तरी पंचाईत. अशा स्थितींत ते आपल्या स्नेह्याचें भाषण " हो ना " वरच टाळण्याचा यत्न करीत. त्यांनीं फारच पचांत व कचाटींत धरलें तर मात्र ते आपलें मत अधिक स्पष्टपणें देत; पण त्यांच्या टीकेचें खंडन करण्याच्या भरीस ते पडत नसत. बहुतेक त्यांतला सत्यांश ग्रहणच करीत. रियासतींतील फाजील अदबी, मानीपणा, व बापुसाहेब, रावसाहेब, दादासाहेब, अशीं टोपणनांवें हीं माधवरावांस मान्य नसत. एकदां अशाच प्रसंगीं ते ह्मणाले ".मला या साहेबांनीं फारच घोटाळ्यांत घातलें आहे, मला या गृहस्थांचें खरें नांव काय तें सांगा. " तेव्हां विनायकराव त्या गृहस्थांचें नांव सांगून बोलले " तुम्हीं ह्मणतां तें सर्व खरें; पण या संस्थानांत तर त्यावांचून पान हालत नाहीं. तुम्हांला अनुभव आला असता तर यांत काय मजा आहे तें तुह्माला कळलें असतें. " माधवरावांस " आचार्य " या टोपणनांवानें ते हांका मारीत. माधवराव त्यांस " रावबहादुर " ह्मणत. क्वचित् विनायकराव असेंही ह्मणत. संस्थानच्या दुसऱ्या कामगारांसमोर विनायकराव फारसे वादाच्या भरीस पडत नसत; पण दोघेही एकटे असले ह्मणजे मग त्यांच्यांत निर्बंध राहत नसे. त्यांच्याशीं

संस्थानच्या दूषणीय प्रकारांवरही विनायकराव टीका करीत. राजकारणी पुरुषांच्याठायीं सामान्य जनांविषयींच्या अनादरावर एकदां माधवराव बोलले " तुह्मा राजकीय पुरुषांना साधीं माणसें ह्मणजे तिसऱ्या वर्गांतल्या खनिज पदार्थांप्रमाणेंच दिसतात नाहीं खरें ?"

बडोद्यांत एकदा माधवरावांस आग्रहानें व्याख्यान देण्यास सांगून त्या प्रसंगीं विनायकराव अध्यक्ष झाले होते, आणि शेवटच्या सांप्रदायिक भाषणांत त्यांनीं कुंटयांची वक्तृत्वशक्ति, विद्याव्यासंग, दीर्घोद्योग, अश्रांत परिश्रम इत्यादि गुणांची फार तारीफ केली. व्याख्यानविषय सृष्टिसौंदर्यनिरीक्षण असून जें निरीक्षण झालें त्यांत वक्त्यानें गोकाकच्या धबधब्याचें वर्णन फारच सुरेख केलें. त्यांच्या वक्तृत्वप्रवाहांत श्रोते वहात होते किंवा तरंगत होते असा भास झाला! त्यांचें इंग्रजी भाषाप्रभुत्वही वर्णनीय होतें. वाणी अस्खलित, भाषणप्रकार सुबोध, स्वाभाविक व जोरदार, आवाज मधुर, आणि अभिनय प्रसंगास उचित असा होता. तात्पर्य वक्ता हें नांव त्यांस पूर्णपणें साजत होतें.

माधवराव कुंटे यांचा स्वभावही फार साधा, रंगेल, हौशी, लहानांत लहान, थोरांत थोर, असा होता. वाचण्याचा कंटाळा आला आणि मोठें मनुष्य बोलण्यास नसलें तर ते विद्यार्थ्यांशीं आणि मुलांशीं मिसळत असत आणि त्यांच्याशीं खेळत. तेथें भोंवरा फिरविण्यास शिकण्याचीच त्यांची लहर लागली. त्या कामीं पटाईत अशा विद्यार्थ्यांस जवळ घेऊन ते तो भोंवरा फिरवीत. प्रथम त्याची खुबी त्यांस साधेना; पण थोड्याच वेळांत

ते त्या कामांत तरबेज झाले. या कामांत ते तासचे तास घालवीत. कधीं हुक्की लागली तर विद्यार्थ्यांस चांगली माहिती देत आणि स्वानुभवाच्या गोष्टी सांगत, तेव्हां आम्हांस त्यांच्यापाशीं काय ज्ञानाचा समुद्र भरला आहे असें वाटे! कोणतीही गोष्ट अशक्य असें त्यांस वाटत नसे. त्यांच्या सहवासांत विद्यार्थ्यांस भीति वाटत नसे. यावेळीं ते अमदाबाद कॉलेजच्या मुख्याध्यापकाच्या जागेवर होते. आपल्या सहाध्यायी मंडळींविषयीं त्यांस मोठा अभिमान वाटे. त्यासंबंधांत ते बोलले "आमच्या वर्गांतले बहुतेक सगळे नांवारूपाला आले, पण मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं त्यांपैकीं चार पांचजण वारले." आपल्या विद्याव्यासंगाबद्दल ते ह्मणाले, "मी कोशांतून शब्द काढून ते लिहून घेतों आणि पाठ करून टाकतों. पहिल्या पहिल्यानें मीं बर्कचीं भाषणें इतकीं वाचलीं कीं मला तीं बहुतेक पाठ झालीं होतीं. मग मला सभेंत बोलण्याचे वेळीं शब्दांची वाण पडेनाशी झाली." आमच्यांत इंग्रजांच्या बरोबरीनें कर्तृत्वशक्ति आहे, पण त्यांच्या इतका राष्ट्राभिमान व कर्तृत्वजागृति हीं मात्र नाहींत.

या थोर गृहस्थाबद्दल विनायकरावांचे ठायीं मोठा आदर असे. १८८८ सालीं कुंटयांच्या मृत्यूचें वृत्त विनायकरावांच्या तिसऱ्या मुलानें एका पत्रांत लिहिलेलें वाचून त्यांस फार वाईट वाटलें. त्या दिवशीं त्यांचा चेहरा सचित, खिन्न व उदास होता. माधवराव शरिरानें निरोगी व सदृढ दिसत असत. व्यायामही ते पुष्कळ घेत, त्यामुळें त्यांचा शेवट इतक्या लवकर होईल असें या-

टलें नाहीं. आमच्या मानसिक श्रम करणाऱ्या नवीन विद्वानांचा हाडवैरी जो मधुमेह रोग त्यानेंच त्यांचा घात झाला ! आमच्या नवीन विद्वानांस हाच रोग पुष्कळदां गांठतो आणि या जगांतून त्यांस अकालीं ओढून नेतो.

विनायकरावांचे इतर स्नेही व सहाध्यायी ना० माधवराव रानडे, वामनराव मोडक, विठ्ठलराव फाटक तसेच इंदूरचे मित्र रामजी, नाझीमसाहेब, बक्षीसाहेब, बडोद्यांतले जनार्दनपंत गाडगीळ, डॉ. रामभाऊ तळवळकर, डॉ. सर भाटवडेकर, रावजी पुणेकर वगैरे मित्रमंडळी यांच्याशीं सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करतांना मीं त्यांस पाहिल्याचें मला स्मरत नाहीं. प्रसंगीं सरकारी कामें किंवा घरगुती सुखदुःखाच्या गोष्टी त्यांच्याशीं करतांना मात्र पाहिलें आहे. माधवराव कुंट्यांशीं देखील बोलतांना ते पुढाकार घेत होते असें नाहीं; पण त्यांच्या संगतींत आमच्या चरित्रनायकाचा मितभाषिपणा, संकुचित वृत्ति, गांभीर्य इत्यादि प्रकार बरेच कमी होत, यांत संशय नाहीं. आणि त्यामुळेंच मला त्यांच्या मतांचें इतकें विस्तृत दिग्दर्शन करतां आलें. पुण्यासही प्रसंगोपात्त ह्या आपल्या मित्रांचे घरीं ते जात असल्याचें त्यांच्या चिरंजिवांनीं मला एकदां सांगितलें होतें.

आतां त्यांच्या पत्नीबद्दलही या स्थळीं दोन शब्द लिहिले तर ते आप्रसंगीक होणार नाहींत. कारण या मानास त्या पूर्ण पात्र आहेत असें मला वाटतें. त्यांच्या सहवासानें माझ्या सात्विक वृत्ति जितक्या

जागृत झाल्या तितक्या मातेसमान आणि भगिनीसमान असणाऱ्या दुसऱ्या आर्यांगनावृंदाच्या साहचर्यानें झाल्या नाहींत. स्त्रीस्वभावाचें अत्यंत मनोहर आणि रमणीय चित्र त्यांच्या ठायीं वसत होतें. कालिदासानें गृहिणीपदास भूषण ह्मणून वर्णिलेले सर्व गुण त्यांच्या ठायीं मला दिसत. फक्त सपत्नी जनांशीं भगिनीभाव प्रगट करण्यास मार्गच नव्हता, त्यामुळें तो गुण त्यांच्यांत होता असें खात्रीनें सांगतां येणें कठीण आहे. कारण त्यांच्या प्रियपतीचें एकपत्नीव्रत सर्वश्रुत होतें. तेव्हां दुसरी पत्नी करण्याचा विचार फारच दूर ! त्यांचें परस्पर प्रेम अत्यंत उदाहरणीय आणि आनंदजनक होतें. त्यांचा संसार उभयपक्षीं अत्यंत सुखावह झाला विनायकरावांस संसाराची काळजी कशी ती मुळींच वहावी लागली नाहीं. सकाळ संध्याकाळ जेवण्यास मात्र ते घरांत येत. बाकी त्यांचें वाचन बरें आणि ते बरे. " ती घरची लक्ष्मी आहे आणि तिच्या पुण्यानेंच आमच्या विनायकाचें भाग्य इतकें उदयास आलें " असें विनायकरावांची आत म्हणत असे. इंग्रजी कवींनीं सुरस वर्णन केलेल्या " मानवी करुणेच्या दुग्धानें " या स्त्रीचा जातिस्वभाव पोसला व वाढला होता. सर्वभूतानुकंपा या आर्यांगनेच्या ठायीं इतकी वसत होती कीं प्रसंगविशेषीं ती दोषरूपही भासे. त्यांची सहनशीलता अत्यंत आश्चर्यजनक वाटे. उपकारबद्ध आणि कृतघ्न अशा स्वकीयांचे वाक्प्रहार सोसण्यांत त्यांची हद्द होती; पण त्यांचा प्रतीकार त्यांनीं कधीं केलेला मीं पाहिला नाहीं. प्राणिमात्रावर त्यांची अत्यंत दया असल्यानें पात्रापात्र विचार करण्याल त्यांस

अवकाश मिळत नसे; त्यामुळें पुष्कळ वेळां त्यांचें औदार्य अस्थानीं होत असे व त्याबद्दल पुढें त्यांस पश्चात्ताप व क्लेश होत. सर्वांची त्यांस कळकळ वाटे. दुसऱ्याच्या ब्र्याकरितां त्या अश्रांतपणें झटत, तरी त्यांस आपण कांहीं केलें असें वाटत नसे. त्यांची वृत्ति अति सात्विक, स्वभाव अति साधा, धर्मावर अढळ श्रद्धा, कथापुराण श्रवणाची अति आवड, व्रतेंवैकल्यें व उपासतापास करण्याची हद्द (आठवड्यांतून चार निरशनें असावयाचींच ) हे सर्व त्यांच्या आचरणांत उघड दिसत. त्यांस मराठी बरेंच चांगलें वाचतां येत होतें. त्यांच्या अंगीं बहुश्रुतपणाही पुष्कळ होता. दासबोध, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी व हरिवंश असे मराठी धर्मग्रंथ त्यांनीं अनेकवार ऐकले होते, आणि कधीं कधीं वाचलेही होते. चांगलीं नीतिपर सुबोध मराठी पुस्तकेंहीं ऐकण्याचा त्यांस मोठा नाद असे. त्यांचें व्यवहारज्ञानही पोक्त व प्रशंसनीय होतें. जगाचे अनेक आघात सोसावे लागल्यामुळें त्यांची सहनशक्ति वाढली हाती.

केरूनाना छत्र्यांचें स्वभाववर्णन करतांना प्रसिद्ध "टाइम्स ऑफ इंडिया" नामक पत्रकर्त्यानें लिहिलें होतें कीं " नानांच्या सहवासांत राहिलें तर त्यांच्याविषयीं प्रेमभाव आणि पूज्यभाव हीं मनांत उदय पावल्यावांचून रहातच नसत. " तसाच कांहींसा प्रकार या पूज्य स्त्रीचा असे. विनायकरावांच्या हाताखालचा एक अत्यंत दुर्वृत्त आणि निंदक शिक्षक एकदां त्यांच्या संबंधानें बोलला " खरोखर माईच्या सद्गुणांचा अतिरेक झाला आहे. त्यांचें चांगुलपण देवदूतांनाच योग्य. तें ह्या लो-

काच्या कामाचें नाहीं आणि येथें फारसें दिसावयाचेंही पण नाहीं. "

आतां त्या सर्वगुणसंपन्न किंवा सर्वदोषविवर्जित होत्या असें मी प्रतिपादित नाहीं. तसेंच त्यांच्याबद्दल प्रतिकूळ असें कांहींच लिहितां येणार नाहीं असेंही नाहीं; पण त्यांच्या दोषांचा उगमही गुणातिरेकांतच होता आणि त्यामुळें त्या गुणांचें तेज मंद व मलिन होई. आणि हा दोष त्यांच्या स्त्रीस्वभावास अनुरूप होता. स्त्रियांस शोभणारी मानसिक दुर्बलता त्यांच्यांत व्यक्त होई. या जगांत सदाचारी व सहनशील जनांस फारच त्रास सोसावा लागतो. दुराचारी जनास तो लागला तर त्यांत वाईट वाटण्याचें कारण नाहीं. सद्गुणांचा फाजील फायदा घेण्याकडे जगाची फार प्रवृत्ति दिसते. अगदीं अलीकडचें देवमामलेदारांचें उदाहरण सर्वांस माहीतच आहे. त्यांच्या भूतदयेचा दुरुपयोग होऊन त्यांचा स्वतःचा किती छळ होई हें सर्वांस ठाऊक आहेच. थोडीशी मानसिक दृढता असल्यावेरीज या जगांत चित्तास शांति मिळत नाहीं. नाहीं तर सार्वत्रिक दया म्हणजे मानसिक दुर्बलता होऊन बसते आणि ती जेथें तेथें नडते. इंग्रजींत ह्मण आहे "क्रूरतेपेक्षां दुर्बलतेचा दंड अधिक प्रखर असतो " सदसद्विवेकानुरूप वर्तण्यास, दुर्जनांच्या मोहपाशांतून सुटण्यास, ते लगट करूं लागले तर त्यांस मागें ढकलण्यास, त्यांस आपल्यापाशीं येऊं न देण्यास व आपल्या चांगुलपणाचा दुरुपयोग होऊं न देण्यास जी मानसिक दृढता व निष्ठुरता लागते तिचा या सा-

च्चीच्या ठायीं असावा तितका संचय नव्हता ही गोष्ट त्यांची त्यांसही कळे. एकदा त्या मला म्हणाल्या "मी पहिल्या प्रथम सर्वांच्या बऱ्याकरितां मोठ्या हौसेनें झटलें, पण बहुतेकांकडून अपेक्षाचें ठिकरें फुटलेलें पाहून आतां माझी पहिली हौस गेली. आतां मी तें करावयाचें म्हणून करतें इतकेंच ". आपल्या सौजन्याचा दुरुपयोग होऊन आपला छळ झाल्याचें कबूल करून त्या ह्मणाल्या, "त्यापासून दुसरा तर कांहीं लाभ झाला नाहीं, पण माझी आत्मसंयमनाची शक्ति वाढली. " स्त्रीस्वभावजन्य इतर अल्पस्वल्प दोष त्यांच्यांत मुळींच नव्हते असें नाहीं. पण मुळींच दोष विवर्जित अशा आदर्श स्त्रिया जगांत फारशा दिसत नाहींत. या दुःखप्रद, क्लेशप्रद आणि अनित्य अशा जगांत पतिपत्नीचा स्वभाव जितका जुळूं शकेल, व त्यांच्या वृत्ति समसमान असूं शकतील, तितका विनायकराव व त्यांची पत्नी या दोघांत असे. त्यांच्यांत स्वभावभिन्नता मुळींच नव्हती असें नाहीं. तथापि त्यांच्या वैवाहिक स्थितीचें चित्र मनोहर दिसे, यांत संशय नाहीं. त्याचें प्रतिरूप विनायकरावांच्या नाटकांत "माधवराव व रमाबाई व " जयपाळ व प्रभावती " यांच्या प्रवेशांत व भाषणांत उत्तमोत्तम उतरलें आहे. तें त्यांनीं स्वानुभवानेंच काढलें होतें, असा भास त्यांची संसारयात्रा पाहिल्यावर होई. या बाबतींत परमेश्वराची त्यांच्यावर फारच मोठी कृपा होती. त्यांस बाळपणीं झालेला मातृवियोग या गोष्टीनें बराच भरून आला होता. आतां वैभव, संपत्ति इत्यादिकांचें साह्य असल्यानें

त्यांच्या पत्नीच्या औदार्यादि गुणांचा विकास होऊन त्यांचा प्रभाव प्रगट होण्यास मार्ग मिळाला हें खरें. हीच आमच्या चरित्रनायकाची १००।१२५ रुपयांची प्राप्ती राहती तर औदार्य, मनुष्यमात्राची कळकळ इत्यादि सद्गुण जागच्याजागीं मुरले असते. निर्जन वनांत फुलणाऱ्या सुगंधी पुष्पाप्रमाणें त्यांची गति झाली असती. पुष्कळांचे सद्गुण याचप्रमाणें प्रगट होत नाहींत. अहिल्याबाई होळकरीण एकाद्या शेतकऱ्याच्या घरीं भाकऱ्या भाजीत संसारयात्रा पुरी करती, तर तिच्या भूतदयेचें व राज्यकर्तृत्वशक्तीचें काय चीज होतें! झाशीची राणी लक्ष्मीबाई कोणा याज्ञिकाच्या घरीं अग्नीचें पूजन करून जन्म काढती तर तिचें शौर्य व सेनानायकत्व कसें लोकश्रुत होतें ! तात्पर्य, अंगीं गुण असला तरी त्याचें तेज पडण्यास अनुकूळ परिस्थिति पाहिजे. ती त्यांस मिळाल्यामुळे त्यांचे गुण प्रकट झाले. पण पतिनिधनानंतर त्यांचा आणखी एक गुण उदयास आला. तो पूर्वी दिसण्यास मार्ग नव्हता. तो गुण ह्मणजे त्यांचें आत्मसंयमन व प्राप्त स्थितींत समाधान ठेवण्याची शक्ति होय. त्यांच्या आयुष्यांत शेवटचे वज्रप्राय आघात त्यांच्यावर कोसळले; पण त्यांतही आपलें दुःख जनदृष्टीने दूषित होईल म्हणूनच जणूं काय त्यांनीं त्यावर अढळ शांतीचें आवरण घालून तें फारसें लोकनिदर्शनास येऊं दिलें नाहीं. त्यावरून तर माझा त्यांच्याविषयींचा पूज्यभाव दुणावला. त्यांच्यांत प्रेमभावजनक गुण होते, त्या मानानें पूज्यभावोत्पादक होते असें वाटत नाहीं. आणि या

संबंधांत त्यांच्या आणि त्यांच्या पतीच्या स्वभावांत थोडा फरक दिसे; पण त्या वैचित्र्यामुळें त्यांच्या संसारस्थितीस रंगमिश्रण न्यायानें विशेष शोभाच आली. या संसारयात्रेस विनायकरावांच्या शरीरसंपत्तीची उणीव हें मात्र कांहींसें व्यंग होतें. " प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजःप्रवृत्तिः " याची यथार्थता मनावर ठसते.

आतां विनायकरावांच्या ग्रंथकर्तृत्वशक्तीचें थोडेंसें दिग्दर्शन करतों.

विनायकराव १२ वर्षांचे होते, तेव्हां मराठी शाळेंत त्यांनीं निबंध लिहिला होता; त्याची तारीफ महादेवशास्त्री कोल्हटकर व विष्णुबुवा ब्रह्मचारी या दोघां रसिक-शिरोमणींनीं केली होती, हें मागें सांगितलें आहे. आपल्या २० व्या वर्षीं त्यांनीं थोरले माधवराव पेशवे याचें नाटक रचून प्रथम तें त्यावेळच्या नामांकित ज्ञानप्रसारक सभेच्या विद्वान सभासदांसमोर वाचलें. तें ऐकून त्यांतील विद्वन्मुकुटमणि डा. भाऊदाजी, रा० विश्वनाथ नारायण मंडलिक, महादेवशास्त्री कोल्हटकर इत्यादिकांनीं त्यांची मोठी प्रशंसा केली आणि सभेच्या खर्चानेंच प्रथम तें छापून प्रसिद्ध झालें त्याची प्रस्तावना विनायकरावांचे परममित्र प्रो० बाळाजी बापूजी साने यांनीं लिहिली आहे. ही कृति इतक्या प्रमुख विद्वानांच्या स्तुतीस पात्र झाली तेव्हां ती सर्वोत्तम असलीच पाहिजे, हें उघड आहे. माझ्या अल्पमतीसही तसेंच वाटतें. कितीदां वाचलें तरी त्याचा कंटाळा येत नाहीं. उलट त्याची गोडी वाद

नच जाते. चांगल्या ग्रंथास हाच कस लागतो. या नाटकांत वस्तुस्थितीचें व मनुष्यस्वभावाचें चित्र यथास्थित व उत्तम उतरलें आहे ह्मणून तें इतकें मनोहर वाटतें. सर्व पात्रांचीं भाषणें व्यक्तिविशेषाच्या योग्यतेला, मनाला व एकंदर मनुष्यस्वभावाला पूर्ण अनुरूप आहेत. त्यांत मनुष्यस्वभावाचें, मानवी मनोविकारांचें यथातथ्य, मनोहर, चमत्कृतिजनक आणि सन्मार्गवर्ती असें स्वरूप प्रगट झालें आहे. त्यावरून त्याच्या जनकाची स्थिति, मनोवृत्ति आणि अभिरुचि यांचें बरेंच अनुमान होतें. असें अनुमान फार करून चुकत नाहीं. याच नाटकांत दिलेलें मनुष्यस्थितीचें चित्र किती आनंददायक आहे बरें ? त्यापासून किति उदात्त मनोवृत्ति जागृत होतात ? माधवरावांची भूतदया, न्यायप्रियता, निष्कलंक नीतिमत्ता, अकृत्रिम पत्निप्रेम, स्वाभिमान, स्वराज्याभिमान, स्वदेशाभिमान, शौर्य, सेनानायकत्व, राजकार्यकुशलता इत्यादिकांचा ठसा मनावर कसा सुरेख उमटतो ! रमाबाईचें चित्र तरी किती रम्य, यथारूप, कुलांगनांस भूषणदायक असें वठलें आहे ! हा सर्व प्रकार पाहून कोणत्या महाराष्ट्रीयाचा स्वदेशाभिमान आणि सद्वृत्ति हीं उदय पावणार नाहींत ! राघोबादादा भरारीचें शौर्य, स्त्रैणत्व, स्वार्थपरता, राजनीतिच्युतता व भोळसरपणा, इत्यादिकांचा मनावर परिणाम होतो. आनंदीबाईचें कौटिल्य, हृदयशून्यता, मर्यादाभाव इत्यादि प्रकार यथायोग्य आहेत. रामशास्त्री यांचे नैष्ठुर्य, निःस्पृहता, स्पष्टवक्तेपणा व साधेपणा

हींही अत्यंत हृदयंगम वाटतात. सखारामबापूंच्या दूरदर्शीपणाचेंही दिग्दर्शन यथातथ्य आहे. शिंदे, होळकर वगैरे सरदारांचे गुण, राजमंत्र्यांची योग्य सल्लामसलत, राजकार्यचातुर्य त्यांच्या भाषणांत बहुत योग्य प्रकारानें प्रगट झालें आहे. नायकाचा अंतकालीन देखावा किती गंभीर व हृदयभेदक आहे, आणि प्रवेशांतील कल्पकतेचा देखावा किती उदात्त, बोधपर आणि हृदयद्रावक वाटतो ! सारांश, हें नाटक फारच उत्कृष्ट उतरलें आहे यांत संशय नाहीं. तें रचणाऱ्याच्या मनाचें प्रतिबिंब त्यांत दिसतें; आतां याच्या उलट मनोरमा नाटक घ्या. तें वाचून काय कल्पना होते बरें ? आणि ज्यांस त्याच्या कर्त्याचा परिचय होता त्यांस तें किती यथार्थ दिसणार आहे ! तें नाटक वाचून किती हीन मनोविकार जागृत होतात ! त्यांत दुर्गुणांस किती मोहक रूप दिलें आहे! अनभिज्ञ, अनुभवशून्य, अल्पवयस्क वाचकवर्ग त्यानें वेडावून जाऊन त्याची असन्मार्गाकडे प्रवृत्ति न कळत होते. सज्जनांस त्यांतील दुराचारांचें मनोहर वर्णन वाचून किळस येते. जगांत इतकी नीतिच्युतता नाहीं असें मी ह्मणत नाहीं; पण इतक्या मनोवेधक रीतीनें तिचें वर्णन करून सन्मार्गवर्ती जनांच्या मनास बहकविण्यांत आणि त्यास अमर्याद करण्यांत कांहीं लोकहित साधतें असें कोणाही सुज्ञ ग्रंथकारास खास वाटणार नाहीं. उघडच आहे. अनीतीचींच मनोहर उदाहरणें जर डोळ्यांपुढें ठेविलीं तर मग उन्नतीची काय आशा राहिली ? अनभिज्ञजन त्याच्या रंगांत दंग होईल. दुर्गुण टाळतां यावा ह्मणून त्याच्या दुष्प-

रिणामाचें तितक्यापुरतेंच दिग्दर्शन करणें बस्स आहे. त्याच्या रंगांत दंग होण्यासारख्या त्याच्या रूपाविष्करणानें त्याचा वीट येणें मुळींच संभवनीय नाहीं. बेकनच्या नीतिपर निबंधांत म्हटलें आहे, "दुर्गुण सद्गुणाच्या संगतीनें अति मनोहर रूप धारण करितो. सद्गुणापासून त्यास पूर्ण वेगळें केलें कीं त्याचें आकर्षक स्वरूप जाऊन तो तत्काळ तिरस्करणीय वाटावयास लागतो." म्हणून वारांगनेच्या नीतिभ्रष्टतेपेक्षां कुलांगनेची नीतिच्युतता सामान्य जनांस मनोहर आणि चटकदार वाटते. असो. विनायकरावांच्या नाटकाचें सन्मार्गवर्तित्व केवळ निर्विवाद आहे. त्यांतील विनोदही मजेदार आहे. आतां या त्यांच्या प्रथम कृतींत मनुष्यस्वभावाच्या अतिगहन व असामान्य अशा विविध वृत्तींचें रूपाविष्करण किंवा दिग्दर्शन आलें नाहीं हें खरें. विचारगांभीर्य, किंवा अंतःकरणाच्या खाचाखोचांत गुप्त असलेले व प्रसंगविशेषीं मात्र प्रगट होणारे मनोव्यापार यांचा त्यांत फारसा निर्देश नाहीं. पण याच दिशेनें त्यांनीं सतत व्यासंग ठेविला असता, तर अशी गहनताही त्यांच्या पात्रांच्या स्वरूपांत भाषणांच्या द्वारें प्रगट झाली नसती असें नाहीं.

या त्यांच्या कृतींत तरी मनुष्य स्थितीचा बाह्यरंगच चांगला उतरला आहे, आणि अंतरंग जितका रेखला आहे तितका यथार्थ, मनोरंजक, आणि पूर्ण सन्मार्गवर्तीय असा आहे. परंतु मानवस्वभावोदधींत शेक्सपियर किंवा कालिदास यांच्यासारख्या त्यांनीं खोल बुड्या मारल्याचा प्रत्यय मला फारसा आला नाहीं.

विनायकरावांचें दुसरें नाटक जयपाळ सन १८६५ सालीं प्रथम बाहेर पडलें. त्याचें कथानक इंग्रजींतून घेतलें आहे..त्याचा कांहीं भाग तर निव्वळ भाषांतररूप आहे असें विठ्ठलराव कीर्तने एकदां मजपाशीं बोलले होते; पण हें खरें मानलें तरी तें नाटक वाचतांना त्याची मनोरमता कमी वाटत नाहीं. त्याचें कथानक चांगलें आहे. त्यांतलें स्वभाववर्णन मनोहर असून सन्मार्गवर्ती आहे. दुर्गुणाचा प्रभाव जो त्यांत आणला आहे तो अश्लील किंवा अमर्याद नसून पुन्हां त्यांस सन्मार्गावर आणून नाटकाचा शेवटही फार उत्तम बोधकारक केला आहे. कमळजा, सारजा, जयपाळ, प्रभावती, चंद्रकेतु, जयपाळाचा बंधुवर्ग, त्याचे वडील, इत्यादि पात्रांचा स्वाभिमान, स्वातंत्र्यप्रीति वगैरे प्रकार, मानाजीरावाची स्थिति, त्याचें उपकारकर्तृत्व, इत्यादि सर्व गोष्टींचें स्वरूप स्वाभाविक व मनोरंजक वठलें आहे. शेवटचा विदूषक व सूत्रधार यांचा प्रवेश म्हणजे अलीकडच्या प्रासमय नामधारी कवित्वावर चांगला कोरडा आहे. या नाटकावर गुणदोषदर्शक टीका शाळापत्रकांत सन १८६५ सालीं आली असून ती परम मार्मिक टीकाकार कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं लिहिली होती. तिचा उल्लेख प्रस्तुत स्थळीं करणें न्याय्य आहे. कारण त्यांत दाखविलेले दोष विचारार्ह व यथार्थ आहेत. त्यामुळें या नाटकाच्या उत्तमपणास मोठासा धक्का बसतो असें नाहीं. गोल्डस्मिथनें ह्मटलें आहे कीं, " पुष्कळ दोषमय ग्रंथही मनोहर असूं शकेल, व ज्यांत दोष काढण्यास जागा नाहीं

अशी कृतीही निव्वळ निरस व पाणचट असूं शकेल." त्याप्रमाणें या टीकेंत निर्दिष्ट केलेले दोष असूनही हें नाटक चटकदार व मराठी भाषेस भूषणास्पद झालें आहे, ही गोष्ट सर्वमान्य आहे. थोरले माधवराव व जयपाळ या दोन्ही नाटकांस योग्य मान मिळाला आहे. सन १८७५ सालीं इंदुप्रकाशकर्त्यांनीं हीं दोन नाटकें पुस्तकरूपानें एकत्र छापलीं होतीं. रसिक-मुकुटमणी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं शालापत्रक व निबंधमाला या दोन्ही मासिक पुस्तकांत त्यांची स्तुति केली आहे आणि जयपाळाचा अखेरचा प्रवेश उत्कृष्ट उताऱ्यांत दाखल करून त्याचा धन्य-धन्यवाद व गौरव केला आहे, आणि तो यथायोग्य नाहीं असें कोणासही ह्मणतां येणार नाहीं. रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनींही प्रस्तुत चरित्रनायकाच्या नाटकरचनाकौशल्याची व विनोदपरतेची योग्य प्रसंशा करून या दिशेनेंच सतत परिश्रम करण्याबद्दलची सूचना "नॉव्हेल व नाटक" या निबंधाच्या इंग्रजी प्रस्तावनेंत त्यांना केली आहे, त्याचाही या स्थळीं निर्देश करणें इष्ट आहे. त्याचप्रमाणें सन १८९७ सालीं नामदार माधवराव रानडे यांनीं मराठी वाङ्मयाच्या प्रत्येक शाखेंतील ग्रंथसमूहावर जो व्यापक व संकलित लेख लिहिला होता, त्यांत "नाटकें व कादंबऱ्या" या सदराखालीं ज्या अर्वाचीन नामांकित ग्रंथकारांचा नामनिर्देश केला होता त्यामध्यें विनायकरावांस कालानुरोधानें तर पहिलें स्थान दिलें

होतेंच; पण योग्यतेनेंही त्यांचें तें प्रथमपद अद्याप- पर्यंत दुसऱ्या कोणी घेतलेलें नाहीं असा उल्लेख आहे. ( Among the writers of original dramas the first rank is deservedly given to the elder Kirtane who was late Diwan at Indore and Naib Diwan at Baroda. )

इंदुरास असतां विनायकरावांनीं मथुरानामक एक नाटक रचिलें होतें. पण तें पुरें होण्यापूर्वींच त्याचें कथानक एका इंग्रजी नाटकाशीं फार मिळतें आहे असें आढळून आलें ह्मणून तें लिहिणें पुढें त्यांनीं बंद केलें. त्याची हस्तलिखित प्रतही त्यांच्या घरून गहाळ झाली होती. तें नाटक कित्येक स्नेह्यांस वाचून दाखवितांना त्याचा कांहीं भाग मीं ऐकला होता. त्यांत विनोद व हास्यरस पुष्कळ होता इतकेंच आतां मला स्मरतें. याहून त्याविषयीं जास्त लिहिण्यास आतां मार्ग नाहीं.

मराठी ज्ञानप्रसारकांत छापलेल्या त्यांच्या दोन निबंधांबद्दल मागें यथास्थळीं माझें मत आलेंच आहे, याहून या स्थळीं त्याविषयीं विशेष लिहिण्यासारखें कांहीं दिसत नाहीं.

बहादरगडच्या लढाईवर इंग्रजी कविता करण्यास विनायकरावांनीं बडोद्यांत सन १८८१ सालीं आरंभ करून त्याच्या ५०० ओव्या रचिल्या होत्या. त्याचे प्रास अनुप्रास बरोबर असून इंग्रजी भाषा झोकदार व सुबोध आहे. त्यांतले विचारही आल्हादजनक, पोक्त आणि प्रसंगास अनुरूप असे आहेत. ही कविता वाचून

बडोद्याच्या विद्यालयाचे अध्यापक लिटलडेलसाहेब यांनीं वरील आशयाचा आपला अभिप्राय विनायकरावांकडे लिहून पाठविला होता.

"चाळीस वर्षांमागचें पुणें" ही इंग्रजी कादंबरी विनायकरावांनीं इंदुरास असतांना रचण्यास सुरुवात केली होती. पुढें बडोद्यांत त्यांस ती लिहिण्याचा योग आलाच नाहीं. पुढें बडोद्याहून पुन्हा पुण्यास परत आल्यावर त्यांनीं त्याचे ४० भाग पुरे केले. ते भाग इंग्रजी "ज्ञानप्रकाश" पत्रांत स. १८९७ सालीं छापले होते. पण ही कादंबरी अपूर्णच राहिली ती राहिली! ती मला फार उत्तम वाटली. तिची भाषा सरळ व शुद्ध आहे. विचार उत्तम व स्थळवर्णन मनोहर, व स्वाभाविक, मनुष्यस्वभावदर्शन अत्यंत यथारूप, आणि मार्मिक, व ऐहिकस्थितीबद्दलचे विचार पोक्त, भारदस्त, खोल, गंभीर आणि मनोवेधक असे आहेत आणि त्यांचा कल सन्मार्गवर्तित्वाकडे आहे. त्यांत अत्यंत शुद्ध, उन्नत व उदात्त विनोदपरतां ओतप्रोत भरलेली आहे, ती पाहून अत्यंत आल्हाद होतो. ही कृति त्यांच्या अत्यंत परिपक्व बुद्धीचें फळ आहे. ती वाचतांना सहृदय वाचकांना गुदगुल्या झाल्यावांचून राहत नाहींत. महाराष्ट्रीय गृहस्थितीचें असें मनोहर स्वरूप इतकें चांगलें उतरलेलें अन्यत्र कोठें आढळणार नाहीं. कर्नल मेडोज टेलर व कृपाबाई सत्यंधन (अलीकडील प्रसिद्ध एतद्देशीय इंग्रजी कादंबरीकर्त्री) यांच्या ग्रंथांत देखील इतकी मनोहरता अनुभवास येत नाहीं. कारण त्यांची माहिती किती

झालें. तरी अनुभवजन्य नसून बरीच परप्राप्त असल्यामुळें त्यांस या संसारस्थितीचें चित्र इतकें यथारूप रेखतां आलें नाहीं यांत नवल नाहीं. मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे, कीं ही कादंबरी कर्त्याच्या हातून शेवटास पोंचली नाहीं. मराठींत तर अशी कादंबरी मुळींच नाहीं. रा० हरिभाऊ आपटे यांची " पण लक्ष्यांत कोण घेतो " ही कृति पुष्कळ मनोवेधक उतरली आहे, पण या ग्रंथकारास संकलित वृत्त लिहिण्याची हातोटी अद्याप नीट साधली नाहीं. ही न्यूनता त्यांनीं स्वतःही मोकळ्या मनानें कबूल केली आहे. त्यांतला कांहीं कथाभाग वाचतांना फारच लांब चऱ्हाट वळल्यासारखा कंटाळवाणा वाटतो. जेव्हां पानेंच्या पानें उलटावीं तेव्हां कांहीं रम्य भाग सांपडतो. पुन्हा पुनरुक्ति फार. एकाच मुद्यावरचे विचार एकाच ठिकाणीं दिले तर त्याचा इष्ट परिणाम होतो. उदाहरणार्थ, या कादंबरींत वैधव्यस्थितीबद्दलचे उद्गार आले आहेत तेच विनायकरावांनींही आपल्या इंग्रजी कादंबरींत घातले आहेत; पण ते संकलित असल्यानें अधिक हृदयंगम वाटतात. मनुष्यस्थिति आणि मनोव्यापार यांतला अतिरम्य आणि मनोहर भाग ताडून तो ग्रंथांत यथारूप निर्दिष्ट करण्याची विनायकरावांची शैली निःसंशय अप्रतिम होती, यामुळें त्यांच्या कृतींत कंटाळवाणें असें कांहीं वाटत नाहीं. त्यांच्या दुर्गुणवर्णनांत देखील मनास वीट किंवा किळस येण्यासारखा कांहीं प्रकार बिलकूल दृष्टीस पडत नाहीं. त्याविषयीं वाचल्यानें दुर्गुणापासून दूर रहावें

अशी मनाची प्रवृत्ति होते, पण तो चित्ताकर्षक किंवा मनोहर असा कांहीं वाटत नाहीं ही त्यांत मोठी खुबी आहे. आणि ह्मणून त्याच्या वाचनानें समाजनीतीस अपकार होण्याची मुळींच भीति नाहीं.

इंदुरास असतांना विनायकरावांनीं तुकोजीरावमहाराज होळकर यांच्या आज्ञेनें मालकमच्या मध्यहिंदुस्थानच्या इतिहासाचें मराठींत भाषांतर करून छापविलें होतें. त्याची भाषा कांहीं चांगली साधली नाहीं. आणि त्यांत सुधारणा करण्यास बरीच जागा आहे. " थोरले माधवराव पेशवे व जयपाळ " या दोन सर्वमान्य नाटकांच्या कर्त्यानें हें भाषांतर केलें असून तें त्याच्या योग्यतेनुरूप उतरलें नाहीं, याबद्दल मालाकारांनीं आपल्या सर्वमान्य मासिकांत मोठा विषाद दाखल केला आहे; परंतु कोणत्याही थोर ग्रंथकाराच्या सर्वच कृती एकसारख्या सरस निपजतात असें नाहीं; तर त्यांतही कमीजास्तीपणा, उतारचढ हीं प्रायः दिसून येतातच. ही गोष्ट वरील टीकाकारांनीं मनांत आणली असती तर बरें झालें असतें. विनायकरावांच्या सरकारी महत्वाच्या लेखांबद्दलचें मत मागें यथास्थळीं दिलेंच आहे.

विनायकरावांच्या नित्यक्रमाचें थोडेंसें दिग्दर्शन या स्थळीं इष्ट आहे. सकाळीं बहुतेक आठाच्यापुढें शयनस्थानापासून ते उठून बाहेर येत. नंतर शौचमुखमार्जन विधि उरकून चहा घेत. ( शेवटीं शेवटीं तो घेणें त्यांनीं वर्ज्य केलें होतें ). नंतर ११ वाजेपर्यंत सरकारी कामकाजांत त्यांचा वेळ जाई. यापुढें त्यांचें

स्नान, भोजन इत्यादि आटोपून ते कचेरीस जात, ते सायंकाळीं सुमारें आठाच्या अमलांत परत घरीं येत. सायंकाळीं हवा खाण्यास जाण्याचा त्यांचा परिपाठ नव्हता. वेळ मिळाला तर तेथल्या बड्या कामगारांच्या क्रिकेट क्लबांत जात; पण तेथेंही ते फार करून खेळत नसत. प्रेक्षणापलीकडे त्यांचा कार्यभाग नसे. घरीं आल्यावर नवाच्या सुमारास त्यांचा संध्याकाळचा फराळ आटोपला ह्मणजे त्यांचें वाचन चाले. वर्तमानपत्र किंवा कांहीं ग्रंथ वाचण्यांत त्यांचा बारा किंवा वेळेनुसार एक वाजेपर्यंतही काळ जाई. त्यांस बहुतेक स्वतः वाचण्याची यातायात सोसत नसे; त्यामुळें इंग्रजींत वाकब अशा कोणा विद्यार्थी आश्रितांस किंवा मुलांस हें वाचण्याचें काम करावें लागे व तें करतांना त्यांची फार त्रेधा उडे. तीन चार तास सतत वाचण्याचे श्रम ह्मणजे सामान्य नव्हत. ते त्यांच्या घरच्या विद्यार्थीवर्गास पाळीपाळीनें करणें भाग पडे. तेव्हां ज्या मुलाची पाळी असेल त्यास तें काम मोठ्या संकटाचें वाटे आणि त्यांतून धडपणें निभावून बाहेर पडल्यावर त्यास आज मोठें मिळविलें असें वाटे. वाचण्याच्या शेवटीं शेवटीं तर आतां केव्हां पुरे म्हणतात असें त्यास होऊन जाई. विनायकरावांचें अवधान इतकें निर्वेध असे कीं, वाचणाऱ्याच्या तोंडांतून एखादा शब्द चुकीचा निघाला तर ते लागलीच अर्थानुरोधानें ओळखून दुरुस्त करीत आणि त्यास नीट वाचण्याचा इषारा करीत; पण त्याच्यावर ते रागावत नसत. त्याचप्रमाणें त्यांची सहानुभूतिही इतकी प्रबळ होती कीं मुलगा

फार थकला किंवा कंटाळला असें त्यांस वाटलें आणि वाचण्याची तृप्ति झाली नसली, तर त्यास मोठ्या शांतपणें जाण्यास सांगून दुसऱ्या वाचकास बोलावीत. किंवा स्वतः देखील पुस्तक घेऊन वाचन पुढें चालवीत त्यांस तीन वाजेपर्यंत झोंप येत नसल्यामुळें वाचन लवकर संपविणें त्यांस कठीण वाटे. त्यांचा नियमितपणा फारसा अनुकरणीय नव्हता. कोणत्याही एकाद्या कामांत मन गढलें ह्मणजे मग त्यांस वेळेचें भान रहात नसे. कोणताही शारीरिक व्यायाम ते करीत नसत. पायीं चालण्याची त्यांस मुळींच संवय नव्हती ह्मटलें तरी चालेल. नेहमीं गादीलोडाशीं गांठ. त्यामुळें त्यांचें शरीर पुष्कळ स्थूल झालें होतें. व्यायाम घेण्याचा त्यांस पुष्कळांनीं बुद्धिवाद केला, पण ती गोष्ट शेवटपर्यंत त्यांच्या हातून तडीस गेली नाहीं. असा त्यांचा प्रायः नित्यक्रम असे.

आतां त्यांच्या चरित्रांतला अनुकरणीय व उदाहरणीय भाग जो मला वाटतो त्याचें थोडेसें विवरण करतों.

विनायकरावांची कल्पनाशक्ति अत्यंत उज्वळ होती; त्या मानानें त्यांची विवेचनशक्ति व तर्कशक्ति होती असें मला वाटत नाहीं. परंतु ही दुसरी शक्ति त्यांच्यांत पहिलीपेक्षां कमी असली ह्मणजे ती मुळींच नव्हती किंवा अगदीं सामान्य होती असें कोणी समजूं नये. नाटकासारख्या कल्पनात्मक ग्रंथाचे जनक म्हणून जसे त्यांचे गुण प्रगट झाले तशी त्यांची राजकीय कर्तृत्वशक्ति प्रगट झाली नाहीं, इतकेंच सांगण्याचा माझा भाव आहे. ही कर्तृत्वशक्ति सहृदय वाचकांस

कळणार आहे; परंतु तिचें अनुकरण मात्र सर्वांच्या अटोक्यांतलें नाहीं.

विनायकरावांच्या कार्यैकपरतेची मात्र तशी गोष्ट नाहीं. तो गुण जरी मनापासून त्यांस आवडत नव्हता, तरी तो एकदां स्वीकारल्यावर मग त्याप्रीत्यर्थ त्यांनीं आपल्या सर्व मानसिक व कायिक शक्ति खर्च करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. फार तर काय, त्यांच्या सिद्ध्यर्थ त्यांनीं आपलें काव्य, नाटक, वगैरे वाङ्मयाचें इष्ट आणि परम प्रीतीचें स्थान असें ग्रंथवाचनही बहुतेक सोडलें होतें. त्यामुळेंच त्यांना त्या विषम व्यवसायांत इतकें तरी यश आलें. रात्रंदिवस त्याचाच त्यांना निदिध्यास राहिला. त्यामुळेंच त्यांची रात्रीची झोंप मोडली. हा गुण सर्वांस आदराई आहे. आतां त्यापुढें त्यांनीं शारीरिक सुस्थितीची हेळसांड केली हें मात्र अनुकरणीय नाहीं. तेवढें टाळण्यास सर्वांनीं झटलें पाहिजे.

दुसरा त्यांचा अति अमोलिक गुण म्हटला म्हणजे त्यांची अढळ व उन्नत राजकीय नीतिमत्ता हा होय. त्यांच्या सामाजिक नीतिमत्तेप्रमाणेंच त्यांची राजकीय नीतिमत्ता अत्यंत अनुकरणीय, प्रशंसनीय, आणि आदराई होती. राजकार्यमग्न जनांस तर नीतिच्युततेचे प्रसंग पावलोपावलीं येतात. या मोहास दूर सारणें म्हणजे केवढें दुरापास्त काम आहे ! सामान्य जनांस अशा मोहाची नीटपणें कल्पनाही करतां येणें शक्य नाहीं. पुष्कळ सामान्य जनांस आपल्या नीतिमत्तेचा वृथा गर्व वाटतो. पण त्यास मुख्य कारण केवळ पूर्वोक्त प्रसंगाभावच होय; त्यांच्या मनाची दृढता नव्हे.

तरी पुष्कळांच्या लक्ष्यांत ही गोष्ट प्रथम येत नाहीं. गरीब स्थितींत संपत्तिमद झाला नाहीं, किंवा खाण्यास पोटभर मिळण्याचीच मारामार असून त्यास कधीं अजीर्ण झालें नाहीं, तर त्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं. पण जेथें नीतिच्युतीचे मोहकारक योग जमून येतात त्या स्थितींत त्यांस वश न होणें हाच खरा पुरुषार्थ आहे. अशी स्थिति सतत वीस वर्षें असूनही विनायकरावांनीं अशा मोहास दाद दिली नाहीं या-बद्दल ते खरोखर सज्जनांच्या आदरास पात्र आहेत. हा गुण राजकारणी पुरुषांत फार दुर्मिळ आहे. त्या-मुळें राजकीय आयुष्यक्रम पुष्कळांस इष्ट वाटत नाहीं, आणि प्रायः त्याबद्दल सामान्य लोकांत मोठासा आदरही वसत नाहीं. हा गुण सर्वांना विशेषतः राजपुरुषांना फारच अनुकरणीय होय.

तिसरा गुण त्यांची सत्यप्रीति, मनोदेवतेच्या आज्ञे-विरुद्ध पाऊल न टाकण्याचा बाणा, स्वाभिमान, निः-पक्षपातबुद्धि, निःस्पृहता, मतस्वातंत्र्य, व व्यक्तिस्वातंत्र्य या सर्वांचा समुच्चय हा होय. हा गुण सर्वांस वंदनीय व अनुकरणीय होता. यासंबंधांत त्यांची बरो-बरी कोणत्याही पुढारी सुशिक्षित राष्ट्रांच्या नायकाशीं बऱ्याच अंशानें होण्यासारखी आहे. कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रांत असा राजकारणी पुरुष अभिमानास्पद व भूषणास्पद होण्यास योग्य आहे. त्यांचें अनुकरण कोणास उन्नतिदायक व हितावह होणार नाहीं !

चवथा मोठा गुण म्हटला म्हणजे त्यांची स्वार्थत्याग-क्षमता हा होय. हा तर जगांत अत्यंत दुर्मिळ आहे.

दोन हजार रुपये महिन्याच्या प्राप्तीवर लाथ मारणें सामान्य गोष्ट नाहीं. स्वार्थ हा जगांत अत्यंत प्रबळ आहे म्हणूनच अनियंत्रित राज्यसत्ता टिकते. त्याकरितांच ज्याचें तोंड पाहूं नये म्हणून पाठीमागें लोक बोलतात त्याचेच प्रसंग आला कीं पाय धरण्यास मागेंपुढें पाहत नाहींत. मोठमोठे नामांकित पदवीधर, विद्यालयीन सोळा संस्कार झालेले, राष्ट्रीय व्यासपीठावर सुश्राव्य व्याख्यान झोडणारे, राजनीति, सुयंत्रित राज्यव्यवस्था, न्यायप्रीति, न्यायनैष्ठुर्य इत्यादिक विषयांचें सुबोध, सयुक्तिक, आणि सप्रमाण विवरण करणारे नामधारी थोर पुरुष कलुषा कबजी, त्रिंबकजी डेंगळे, सर्जेराव घाडगे अशासारख्या स्तुत्य नररत्नांचा कार्यभाग करून धन्यता मानतात, ती या स्वार्थाकरितांच होय. अशा स्थितींत विनायकरावांचा वरील गुण तर केवळ अमूल्य भासतो ! असे पुरुष जर राजकार्यांत असले तर पुष्कळ स्वेच्छाचारी राजपुरुषांचा अनियंत्रित, क्लेशदायक, व अधमपणाचा असा वर्तनक्रम बराच निर्मूल होऊन अनाथ प्रजेचें हित होईल. विनायकरावांच्या राजकीय जयापेक्षां त्यांचा अपजय त्यांस विशेष शोभा देतो. या दिशेनें त्यांचें पतन केवळ वीरगतीची उपमा पावतें. खरोखर पाहिलें तर ते पदवीधर नव्हते, तरी त्यांची बरोबरी या संबंधात पुष्कळ पदवीधरांस देखील करतां येणार नाहीं. हा गुण आमच्या राजकारणी पुरुषांनीं फार अनुकरणीय आहे असें मला वाटतें. यामुळें त्यांच्याठायीं मोठमोठ्या राजपुरुषांचा आदरभाव वसत होता. श्री० सयाजीराव महाराज गायकवाडांसारखे

थोर पुरुष देखील त्यांच्याशीं मतभेद होऊन त्यांचा संबंध तुटला असतां त्यांस स्वदस्तुरचीं पत्रें बरोबरीच्या नात्यानें लिहीत. असा थोर पुरुष आपल्या देशास भूषण नाहीं असें कोण म्हणेल ?

असो; या ठिकाणीं विनायकरावांचा चरित्रभाग पूर्ण झाला. याहून त्यांचें चरित्र योग्य रीतीनें वाढवितां येत नाहीं. त्यांच्या लेखांचे किंवा ग्रंथांचे किंवा बडोद्याच्या किंवा इंदूरच्या वार्षिक रिपोर्टांचे उतारे देऊन मात्र कांहीं विस्तार करतां येईल; पण तसें करण्यापासून तादृश फायदा नाहीं. विनायकरावांचा पत्रव्यवहारही या कामीं फारसा उपयोगाचा नाहीं. कारण एक तर त्यांत सार्वजनिक विषयांवर फार करून कांहीं विचार नाहींतच. बहुतेक भाग खाजगी मजकुरानें भरलेला असल्यामुळें त्यापासून त्यांच्या चरित्रभागावर फारसा प्रकाश पडण्यासारखा नाहीं. कांहीं भागांवरून त्यांच्या कांहीं गुणांवर एक तऱ्हेचा प्रकाश पडेल; पण त्यापासून राजकीय आकाशांत चमकणाऱ्या कांहीं दिव्य ताऱ्यांवर काळोख पडण्याचीही भीति आहे, आणि तीही मोठ्या नाजुक राजकीय प्रकरणासंबंधानें असल्यामुळें तसें करणें सर्वथा इष्ट नाहीं. जगाचा व्यवहार पाहिला तर असें दिसतें कीं जेथें लक्ष्मी, राज्यसत्ता वगैरे दिव्य तेजांचा वास आहे, तेथेंच न्यायही धांव घेतो आणि व्यवहार दृष्टीनें या तिघांचें साहचर्य फारच क्वचित् तुटतें. अशा स्थितींत हा मार्ग भयंकर आहे आणि त्यामुळेंच कांहीं राजकीय परिस्थितीचें आविष्करणही मोठ्या बेताबातानेंच करावें लागतें.

असो. विनायकरावांसारखे सत्यनिष्ठ, निःस्पृह, बाणेदार, व स्वार्थत्यागी राजकारणी पुरुष आमच्या संस्थानांत फारच थोडे दिसतात, आणि ही अल्प संख्याही दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्याबरोबरच हीं संस्थानें जरी नामधारी आहेत, तरी त्यांच्या अंगचा सजीवपणा कालगतीनें नष्ट होत आहे. अशा स्थितींत प्रस्तुत चरित्रनायकाच्या वर्गांतील मुत्सद्दी प्रगट होण्यास फारशी जागा नाहीं. तथापि शक्य असेल तितकें तरी पूर्वोक्त गुणांचें अनुकरण नव्या पिढींतील राजकीय पुरुष करतील अशी आशा धरून विशाखदत्ताच्या " ऐश्वर्यादनपेतमीश्वरभयं लोकोऽर्थतः सेवते । तं गच्छंत्यनु ये विपत्तिषु पुनस्ते तत्प्रतिष्ठाशया ॥ भर्तुर्ये प्रलयेऽपि पूर्वसुकृतासंगेन निःसंगया । भक्त्या कार्यधुरं वहंति कृतिनस्ते दुर्लभास्तादृशाः ॥ " या श्लोकांतील उपदेशांत हें चरित्र संपवितों.

---

Poona, Printed by Hari Narayan Gokhale at the " Dnyan Prakash " Press, and Published by B. N. Deo, Indore.